कर्नाटक सरकार

समाज विज्ञान

भाग - II

मराठी माध्यम

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

6

इयत्ता सहावी

कर्नाटक पाठ्यपुस्तक संघ (रजि.)
6 वा क्रॉस, मल्लेश्वरम्, बेंगळूरु - 560 003.

अनुक्रमणिका

W3G7E5

पाठ क्रमांक	इतिहास	पृष्ठ संख्या
12	उत्तर भारतातील प्राचीन राजघराणी	1
13	दिल्लीचे सुलतान	34
14	विजयनगरचे साम्राज्य आणि बहामनी राज्य	45
15	मोगल आणि मराठे	64
16	भारतीय वैचारिकता आणि भक्तीपंथ	80
	नागरिक शास्त्र	
17	लोकशाही	94
18	राज्य धोरण मार्गदर्शक तत्त्वे	100
19	मानव हक्क, मूलभूत हक्क आणि कर्तव्ये	106
20	राष्ट्रीय एकात्मता	118
21	राष्ट्रीय चिन्हे आणि राष्ट्रीय दिन	123
	भूगोल	
22	आशिया खंड	132
23	युरोप खंड	156
24	आफ्रिका खंड	178

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

इतिहास

पाठ 12 उत्तर भारतातील प्राचीन राजघराणी

B2V4Y4

पाठाचा परिचय

मौर्य साम्राज्य हे भारतातील पहिले ऐतिहासिक साम्राज्य होते. विविध क्षेत्रात त्यांचे योगदान असामान्य आहे. चंद्रगुप्त मौर्य आणि अशोक हे या वंशातील दोन प्रसिध्द सम्राट होते. यांचे जीवन आणि कार्याचे वर्णन या पाठात केले आहे. कुशाणांचा प्रसिध्द राजा कनिष्काच्या योगदाना बद्दल येथे सांगीतले आहे. नंतर गुप्तकाळातील श्रेष्ठ सम्राट, दिग्विजय मिळविलेले समुद्रगुप्त आणि दुसरा चंद्रगुप्ताच्या काळत विविध क्षेत्रातील अद्‌भुत घटनेंचे वर्णन केले आहे. हर्षवर्धनच्या संकटमय काळात साम्राज्याचे रक्षण करण्याबाबत आणि बौध्द धर्माच्या वाढीसाठी दिलेल्या योगदान बद्दल परिचय करून दिला आहे. सा.श 620 ते 1200 या कालावधीतील कार्कोट, अहोम तसेच रजपूत वंशाचा इतिहास, त्यांचे अर्थिक, सामाजिक, साहित्यिक देणगी सांगितल्या आहेत. त्याबरोबरच रजपूतांचे प्रमुख वंश असलेले गुर्जर, प्रतिहार, चौहान, पाल, गुहिल यांचा उल्लेख आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

सामर्थ्ये

1. मौर्य साम्राज्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य आणि मार्गदर्शक चाणक्य यांच्या बद्दल जाणून घेणे.
2. राजा अशोकाचे जीवन आणि कार्य समजून घेणे.
3. मौर्य राजाची प्रशासकीय व्यवस्था समजून घेणे.
4. कुशाणांचा प्रसिद्ध राजा कनिष्क यांचे कार्य समजून घेणे.
5. गुप्त वंशाचा श्रेष्ठ सम्राट समुद्रगुप्त आणि दुसरा चंद्रगुप्त यांचे कार्य समजून घेणे.
6. गुप्त कालाला सुवर्णयुग असे म्हटले जाते याची कारणे जाणून घेणे.
7. फाहियन आणि ह्यू-एन-त्संग यांनी साहित्यकृतीत केलेले भारताचे वर्णन समजून घेणे.
8. हर्षवर्धनाचे कार्य आणि देणगी समजून घेणे.
9. कार्कोटा राजघराण्याचे योगदान, कर्तृत्व जाणून घेणे.
10. कांही रजपूत वंशाची मुख्य कामगिरी जाणून घेणे.
11. मौर्य, कुशाण, गुप्त आणि वर्धन काळातील कला. साहित्य. विज्ञान समजून घेणे.
12. अहोम राज्य वंशाच्या राजानी केलेल्या कामगिरीच्या कौतुकासह त्यांच्या योगदानाची प्रशंसा करणे.


मौर्य



राष्ट्रध्वज

मुलांनो, आपल्या राष्ट्रध्वजामध्ये एक चक्र आहे. त्याचे नांव काय माहित आहे? ते अशोकचक्र. प्रगतीचे प्रतिक आहे. म्हणून आपल्या राष्ट्रध्वजामध्ये आहे. असे असेल तर हा अशोक कोण? तो कोणत्या घराण्यातील? त्या घराण्याचा इतिहास काय? अशोकाची देणगी कोणती? हे समजून घेऊ.

भारतातील सर्व प्रथम साम्राज्य म्हणजे 'मौर्य साम्राज्य' या साम्राज्याचा संस्थापक चद्रंगुप्त मौर्य होय.



© KKIBS NOT TO BE REPUBLISHED

चद्रंगुप्त मौर्य

चद्रंगुप्त मौर्य हा एक साहसी तरुण होता. नंद वंशाचा राजा धनानंद याने तक्षशिलाच्या विष्णुगुप्ताचा अपमान केला होता. विष्णुगुप्त हा चाणाक्ष आणि कुटनिती मध्ये पारंगत होता. विष्णुगुप्ताला चाणक्य व कौटील्य ही नांवे होती. त्यांनी चंद्रगुप्त मौर्याला युध्दनितीचे शिक्षण दिले आणि सैन्याला सुसज्ज करण्यास मदत केली. तोपर्यंत धनानंदाने प्रजेचा विश्वास गमावला होता. त्यामुळे धनानंदाला सिंहासनावरुन खाली खेचणे सोपे झाले. अशाप्रकारे चंद्रगुप्त 2300 वर्षापूर्वी मौर्य साम्राज्याची स्थापना करून पाटलीपुत्र (सद्याच्या बिहारची राजधानी पाटणा) ही आपली राजधानी केली.

नंतर चंद्रगुप्त मौर्याने प्रचंड सैन्यानिशी वायव्य भारताकडे कूच केली. मॅसेडोनीयाचा राजा अलेक्झांडर याने पूर्वी जिंकलेला प्रदेश त्याचा सेनापती सेल्यूकस पहात होता. चंद्रगुप्त मौर्याच्या सैन्याने सेल्युकसचा दारुण पराभव केला, त्यामुळे सेल्यूकस तहासाठी पुढे आला. अफगाणिस्तान, बलूचिस्तान आणि सिंधच्या पश्चिमेकडील प्रदेश देऊन आपल्या मुलीशी चंद्रगुप्त मौर्या बरोबर विवाह लावून दिला त्याबदल्यात चंद्रगुप्ताने सेल्युकसला 500 हती भेट म्हणून दिले. सेल्यूकसने मेगॅस्थनिसला चंद्रगुताच्या दरबारात राजदूत म्हणून पाठविले मेगॅस्थनिसने येथे आलेले अनुभव 'इंडिका' या ग्रंथात लिहिले.

विष्णुगुप्त (कौटिल्य) हे चंद्रगुप्त मौर्याचे प्रधानमंत्री बनले त्यांनी रचलेले अर्थशास्त्र हे राज्य कारभाराच्या व्यवस्थेला मार्गदर्शन करणारे आहे. लोक प्रसिध्द अशी ही कृती म्हैसूरच्या 'ओरिअंटल ग्रंथालयाच्या हस्तलिखित संग्रहालयात सर्वप्रथम सापडली. याचा शोध आर. शामशास्त्री नावाच्या विव्दानाने लावला.

चंद्रगुप्त मौर्याने जैन धर्म स्विकारला. आपल्या उतारवयात त्याने राज्यकारभार आपला मुलगा बिंदूसारच्या हाती दिला आणि जैनमुनींबरोबर कर्नाटकात आला. आजच्या हासन जिल्हयातील श्रवणबेळगोळ येथे सल्लेखन नावाचे कठीण उपोषण केले आणि देहत्याग केला. बिंदूसारने सुमारे 25 वर्ष राज्यकारभार केला.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

सम्राट अशोक

बिंदुसारानंतर त्याचा मुलगा अशोक गादीवर आला जगाच्या इतिहासात त्याला विशिष्ट स्थान आहे. 'सर्व प्रजा माझ्या मुलांसारखी आहे' असे म्हणणारा, प्रजेला महत्व देणारा पहिला राजा सम्राट अशोक होय.

अशोकाचे शिलालेख: संपूर्ण भारतीय उपखंडात अशोकाचे शेकडो शिलालेख विखुरलेले आहेत. हे शिलालेख प्रामुख्याने ब्राम्हीलिपी आणि प्राकृत भाषेत पहायला मिळतात. कर्नाटकातील 9 ठिकाणी अशोकाचे 17 शिलालेख पहावयास मिळतात यातील रायचुर जिल्हयातील 'मस्की' शिलालेख महत्वाचा आहे. कारण या शिलालेखात सर्वात प्रथम अशोकाचे नांव आढळले. आतापर्यंतच्या शिलालेखात देवनामप्रिय, प्रियदर्शी एवढेच होते. मस्की येथील शिलालेखात 'देवनामप्रिय, प्रियदर्शी अशोक' असे लिहिलेले आहे. त्यामुळे अशोकाला 'देवनामप्रिय, प्रियदर्शी, 'असे नांव पडले-अशोकाच्या शिलालेखांवरून त्यांचे जीवन कर्तृत्व, साम्राज्याची व्याप्ती याविषयी माहिती मिळते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



अशोकाचे शिल्प कनगनहळ्ळी



अशोकाचा शिलालेख, सन्नती

तुम्हाला माहिती असू द्या

❖ आजपासून 180 वर्षापूर्वी जेम्स प्रिन्सेप नावाच्या ब्रिटीश अधिकाऱ्याने अशोकाचे शिलालेख पहिल्यांदा वाचले. या अगोदर ते कोणीही वाचले नव्हते. सहा शतकाच्या अगोदर दिल्लीचा सुलतान फिरोजशहा तुघलक याने अशोकाचे शिलालेख वाचण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी झाला.

कलिंग युद्ध: राजा अशोक गादीवर आलेल्या आठव्याच वर्षी कलिंग राज्यावर युध्दाचे सावट आले. ही अशोकाच्या जीवनातील महत्वाची घटना होय. कलिंग राज्य सद्याच्या ओडिशा राज्याचा भाग, यावर अशोकाने युध्द केले होते. युद्धात हजारो लोकांना आपले प्राण गमवावे लागले. एक लाख लोक जखमी झाले. दीडलाख शत्रू सैनिक बंदिस्त (युध्दकैदी) झाले रणांगणातील मृत्यू आणि जखमींच्या वेदना या दृश्यांनी अशोक भारावून गेला परिणामी त्याचे मन बदलले. त्या क्षणापासून त्यांने युद्ध सोडण्याचा ठाम निर्णय घेतला. अशाप्रकारे मनपरिवर्तन झालेला जगाच्या इतिहासात दुसरा सम्राट नाही. युध्दाच्या मार्गाऐवजी धर्माचा मार्ग अवलंबणाऱ्या सम्राट अशोकाचा 'महाशय' म्हणून गौरव केला जातो आहे.



शिल्पकलेतील युध्दाची दृष्ये (कनगनहल्ली)

© KTBS NOT TO BE REPUBLISHED


कृती: कर्नाटकात अशोकाचे शिलालेख सापडलेल्या ठिकाणांची यादी करा.

धर्म प्रसार: अशोक बौद्ध धर्माकडे आकर्षित झाला आणि तो स्विकारला. त्याने लोकांना धर्माचा संदेश दिला. आई, वडिल, गुरु आणि वडिलधाऱ्यांच्या आज्ञेत राहिले पाहिजे. करुणा, औदार्य आणि सत्यतेने भरलेले असावे. हिंसा क्रोध मत्सर या गोष्टींचा त्याग केला पाहिजे असे ते म्हणाले. अशोकाने पाटलीपुत्र येथे तिसरी बौध्द परिषद चालविली त्यांनी बौध्द स्तूप बांधले बुध्दांच्या तत्वांचा प्रचार करण्यासाठी त्यांनी परदेशात राजदूताना पाठविले.

मौर्यांची प्रशासकीय पद्धत: राजा हा प्रशासकीय यंत्रणेच्या मुख्यस्थानी होता. सर्व अधिकार त्याच्या हातात होते. राजाला सल्ला देण्यासाठी मंत्रीमंडळ होते. प्रशासनाच्या विभागावर लक्ष ठेवण्यासाठी उच्च अधिकारी होते. त्यामध्ये 'धर्ममहामात्र' नावाचे विशेष अधिकारी होते. ते जनतेमध्ये चांगल्या वागणुकीचा

प्रचार करत होते. अनाथ, विधवा आणि वयोवृद्धांची निगा राखण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. राज्यकारभार करण्यास अनुकूल होण्यासाठी विशाल साम्राज्याची अनेक प्रांतामध्ये विभागणी करण्यात आली होती. मौर्य राजवटीचा पुढील अनेक राजवंशावर प्रभाव पडला.


वास्तु आणि मूर्तिशिल्प: अशोकाच्या काळातील काही वास्तू आणि शिल्पकला आजही पाहायला मिळतात. ते म्हणजे स्तूप व स्तंभ प्रमुख आहेत. त्यापैकी मध्यप्रदेशातील सांचीचा स्तूप आणि सारनाथचा स्तंभ प्रसिद्ध आहे. सारनाथ स्तंभावरील चारमुखी सिंह हे आपले राष्ट्रीय प्रतिक आहे.



अशोकाच्या काळातील शिलालेख (ब्राह्मीलिपी)



सांचीचा स्तूप-मध्यप्रदेश



अशोकाच्या काळातील, एकशिलास्तंभ




सिंहमुद्रा - आपले राष्ट्रचिन्ह

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

कुशाण

सुमारे 2000 वर्षाच्यापूर्वी गांधार (सध्याचे अफगानिस्तान) या प्रदेशांमध्ये कुशाण या राजवंशाचा राजा राज्य चालवीत होता. कालांतराने भारताचा काही भाग कुशाणांच्या अधिपत्याखाली आला. कुशाण वंशातील राजांमध्ये कनिष्क हा प्रसिद्ध राजा होता. त्याने दीर्घकाल युद्धे केली आणि साम्राज्याचा विस्तार केला. उत्तर भारतात त्याचे राज्य अफगाणिस्तानापासून बिहारपर्यंत पसरले होते.




@KRBS NOT TO BE REPUBLISHED

कनिष्क: बौद्ध धर्माचा अनुयायी होता. त्याने सम्राट अशोकाप्रमाणे अनेक स्तूप बांधले. त्याने बौद्ध प्रचारकांना देश-विदेशात पाठविले एवढेच नव्हे तर काश्मीरम ध्ये चौथी बौद्ध महासभा पार पाडली. कनिष्काने आपण अधिकारावर आलेल्या आठवणीसाठी शके (शालीवाहन शके) वर्ष सुरू केले. हे भारत सरकारचे अधिकृत कॅलेंडर वर्ष आहे.

कला आणि वास्तुशिल्प: कनिष्काने अनेक स्तूप बांधले. त्याने पुरुषपूर (आजचे पेशावर) येथे स्तूप निर्माण केले. त्याचा बुरुज 13 मजल्यांचा होता व 400 फूट उंच होता, त्या काळात हे एक आश्चर्य मानले जात असे.



गांधार शैलीतील बुद्ध, पेशावर



कनिष्काचे मस्तकाचा भाग नाश पावलेले शिल्प

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

कनिष्क हा कलेचा भोक्ता होता. त्याने विविध देशातील कलाकारांना आश्रय दिला. परिणामी विविध कला शैली मिळून गांधार आणि मथुरा या नव्या शैली उदयास आल्या.

मथुरा येथे कनिष्काची दगडाची प्रतिमा सापडली आहे. त्याचे शिर नष्ट झाले आहे. खालील भागावर कनिष्काचे नाव कोरलेले आहे. कुशाणांची अनेक नाणी मिळालेली आहेत. त्यानी भारतात सर्वात पहिला सोन्याची नाणी चलनात आणली.

साहित्य: कनिष्काने विद्वान आणि साहित्यीकांना आश्रय दिला होता. त्यामध्ये 'साहित्यरत्न' किताब मिळविलेला अश्वघोष प्रमुख होता. याने 'बुद्धचरित' हा ग्रंथ संस्कृतमध्ये लिहिला.

नागार्जुन हा कनिष्काच्या दरबारातील एक महान तत्वज्ञ आणि शास्त्रज्ञ होता. वसुमित्र हा एक विद्वान आणि काश्मिरमध्ये भरलेल्या चौथ्या बौद्ध महासभेचा (परिषदेचा) अध्यक्ष होता. चरक हा कनिष्काचा समकालीन वैद्य होता. असे सांगितले जाते. त्याने 'चरक संहिता' हा ग्रंथ लिहिला.

नवीन शब्द:

राजदूत - एका देशातून दुसऱ्या देशात पाठविला जाणारा प्रतिनिधी.
साम्राज्य - सर्वात विस्तृत राज्य.
गुप्तहेर - गुप्तपणे माहिती गोळा करणारा.
शिलालेख - दगडावर (शिळेवर) कोरलेला लेख.
स्तूप - बुद्धाच्या शरीराचे अवशेष (दात, हाडे इत्यादी) कलशात ठेवून. त्या कलशाभोवती बांधलेली अर्धगोलाकृती बांधकामाची रचना.

तुम्हाला माहिती असू द्या

- अशोकाने आपले बौद्ध राजदूत केवळ भारतातील राज्यामध्ये नव्हे तर भारता बाहेरील देशांमध्ये बर्मा-(म्यानमार), श्रीलंका, ईजिप्त, पश्चिम आशिया आणि पूर्व युरोपमध्ये पाठविले. अशोकाचा मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा हे श्रीलंकेला गेले. कर्नाटकातील म्हैसूरु (त्याकाळातील महिषमंडल) येथे महादेव व उत्तर कन्नड जिल्ह्यातील बनवासी येथे रक्षीत नावाचे धर्मप्रचारक आले होते.
- वास्तुकला म्हणजे इमारत निर्माण करण्याची कला आणि मूर्ती शिल्पकला म्हणजे मूर्ती घडविण्याची कला अशोकाच्या काळात लाकडे आणि विटा यांच्या बदल्यात दगडाच्या वापराला सुरुवात झाली. यामुळे मौर्यांची वास्तुशिल्प आणि मूर्ती शिल्पकला आजही टिकून राहिलेली आहे.
- अशोकचे शिलालेख कर्नाटकातील रायचूर, कोप्पळ, चित्रदूर्ग, बळ्ळारी आणि कलबुर्गी जिल्ह्यामध्ये मस्की (रायचूर जिल्हा) येथील शिलालेखात अशोकाला 'देवनामप्रिय' आणि 'प्रियदर्शी' असे संबोधले आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

- ❖ 2300 वर्षाहून अधिक जुनी मौर्य शासनाची मूलभूत वैशिष्ट्ये आजच्या भारतीय प्रशासनातही आढळतात. प्रशासनाचे सध्याचे स्तर असे आहेत. केंद्र, राज्य, विभाग जिल्हे, तालुके, होबळी आणि गाव.
- ❖ आयुर्वेद पद्धती ही एक लोकप्रिय वैद्यकीय चिकित्सा प्रणाली आहे. (UNO) विश्वसंस्थेनेही याला मान्यता दिली आहे. इतर देशांमध्ये त्याची लोकप्रियता वाढत आहे.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. सेल्यूकसने चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारात पाठविलेला राजदूत _____.
2. 'सर्व प्रजा माझ्या मुलासारंखी आहे' असे सांगणारा सम्राट _____
3. आपले राष्ट्रचिन्ह _____.
4. कनिष्काने अधिकारावर आलेल्या आठवणीसांठी _____ वर्ष सुरु केले.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

5. मौर्य साम्राज्याची स्थापना कोणी केली?
6. मौर्यांच्या राजधानीचे नाव सांगा.
7. कौटिल्याने लिहिलेला ग्रंथ कोणता?
8. मेगॅस्थेनिसने लिहिलेल्या ग्रंथाचे नाव काय?
9. ''धर्म महामात्र'' करत असलेली कार्ये कोणती?
10. कनिष्काने बौद्ध महासभा कोठे घेतली?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

III. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

11. कलिंग युध्दाचे महत्व लिहा.

IV. खालील 'अ' आणि 'ब' यादीलील शब्दाच्या जोडया जुळला:

अ	ब
1. अशोक	(अ) कनिष्कपूर
2. कनिष्क	(आ) बुध्दचरित
3. अश्वघोष	(इ) कलाकेंद्र
4. गांधार	(ई) देवनामप्रिय



उपक्रम:

- मौर्यांची वास्तूशिल्प आणि मूर्ती शिल्पांची चित्रे व माहिती गोळा करा आणि अल्बम तयार करा.
- कर्नाटकातील अशोकाचे शिलालेख सापडलेल्या ठिकाणांची यादी करा.

©KTRS NOT TO BE REPUBLISHED

गुप्त घराणे

मौर्यानंतर गुप्तांनी आपले साम्राज्य स्थापन केले. हे भारतातील महत्वाचे राजघराणे होय. पाटलीपुत्र ही गुप्तांची राजधानी होती. या घराण्यातील समुद्रगुप्त आणि दुसरा चंद्रगुप्त हे प्रसिद्ध राजे होय.

समुद्रगुप्त

महापराक्रमी समुद्रगुप्त व त्याच्या दिग्विजयाबद्दल प्रयाग (अलाहाबाद) येथील स्तंभावरील शिलालेखावर विवरण मिळते. हा शिलालेख समुद्रगुप्ताच्या दरबारतील कवी हरिसेन यांनी रचला होता. त्यानुसार समुद्रगुप्ताने उत्तर भारतातीळ नऊ राजांचा पराभव केला. त्याचे प्रचंड शक्तीशाली सैन्य पाहून इतर राजे स्वतःहून शरण आले. दूरवर असलेल्या अफगाणिस्तानातील कुशाण राजे आणि गुजरातमधील सत्रपराजे (शक) यांनी समुद्रगुप्ताचे वर्चस्व मान्य केले.

नंतर दक्षिण भारतीय मोहिम समुद्रगुप्ताने हाती घेऊन दक्षिणेतील 12 राजांचा पराभव केला. कांचीचा राजा त्यापैकी एक होय. या मोहिमेच्या आठवणीकरिता अश्वमेध यज्ञ केला.



समुद्रगुप्ताच्या काळातील नाणी

समुद्रगुप्त हा शिक्षणाचा पुरस्कर्ता होता. स्वतः एक कवी आणि संगीतकार होता म्हणून त्यांने 'कवीराज' ही पदवी धारण केली. तो विणा वाजवित असलेले चित्र नाण्यावर आहे. वसूबंधू हा श्रेष्ठ बौद्ध विद्वान त्याचा मंत्री होता. समुद्रगुप्ताच्या काळातील सुवर्ण नाणी त्यांच्या साम्राज्याची समृद्धी, सामर्थ्य आणि वैभव दर्शवितात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

दुसरा चंद्रगुप्त

समुद्रगुप्ताचा मुलगा आणि उत्तराधिकारी दुसरा चंद्रगुप्त हा युद्धकलेमध्ये निपुण होता. त्याने गुजरातमध्ये तीन शतकाहून अधिक काळ राज्य करणाऱ्या सत्रपांचा (शक) चंद्रगुप्ताने पराभव केला. ही एक मोठी लष्करी कामगिरी होती. त्याला विक्रमादित्य ही पदवी मिळाली. चंद्रगुप्ताने नवीन सोन्याची नाणी काढली. त्यांच्या दरबारात महाकवी कालिदासासह इतर नामवंत विद्वान होते.



दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळातील नाणी

साम्राज्याने आर्थिक क्षेत्रात मोठी प्रगती साध्य केली. साहित्य, मूर्तिशिल्प, वास्तुशिल्प, चित्रकला, विज्ञान आणि गणित क्षेत्रात अभूतपूर्व कामगिरी केली.

फाहियान: फाहियान हा चीन देशाचा बौद्ध भिक्षूक होता. बौध्द धर्माचे जन्मस्थान पाहण्यासाठी तो तळमळीने प्रवास करून भारतात आला. तो दुसऱ्या चंद्रगुप्ताचा काळ होता. भारतातील अनुभव त्याने त्याच्या 'घो-को-की' या ग्रंथात लिहिले. त्याच्यामते गुप्त साम्राज्यामध्ये अपराध क्वचित घडत होते. लोकाभिमुख प्रशासन होते. देशातील वाहतूक व्यवस्था सुरळीत होती असे त्यांनी सांगितले आहे.

फाहियान यांनी अनेक वर्षे भारतात प्रवास करून बौद्ध स्थळांना भेटी दिल्या. अनेक धर्मग्रंथ घेऊन तो मायदेशी परतला. येथील धर्मग्रंथाचे त्याने चिनी भाषेत भाषांतर केले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

गुप्तांचे योगदान


संस्कृत साहित्य: गुप्तकाळात संस्कृत साहित्य भरभराटीस आले. कालिदास हा गुप्तकाळाचा महाकवी. तो जगातील महान नाटकारांपैकी एक होय. दुसऱ्या चंद्रगुप्ताचा दरबार सजविणाऱ्या नऊ महान 'नवरत्नांपैकी' तो एक होता. कालिदासाने चार काव्ये आणि तीन नाटके रचली. 'अभिज्ञान शाकुंतल' हे त्यांचे महान नाटक होते. 'कविकुलगुरू' म्हणून त्याचा गौरव केला जातो.

'मृच्छकटीक' लिहिलेले शुद्रक आणि 'मुद्राराक्षस' लिहिलेले विशाखादत्त हे त्या काळातील इतर नाटककार होत. विष्णूशर्मा यांच्या 'पंचतंत्र' या कथेचाही या काळात समावेश केला होता. अमरसिंहचा 'अमरकोश' हा शब्दकोश एक दुर्मिळ ग्रंथ आजही वापरात आहे.


देवालय वास्तुशिल्प: आमच्या देशात देवालयांची निर्मिती गुप्तकाळामध्ये सुरु झाली. मध्यप्रदेशातील सांचीचे मंदिर भारतातील सर्वात प्राचीन मंदिरांपैकी एक आहे. मध्यप्रदेशातील भितरगाव आणि देवगढ येथे गुप्तांची महान मंदिरे आहेत. देवगढाच्या दशावतार मंदिरातील विष्णूची मूर्ती सुंदर आहे.

स्तूप आणि चैत्यालये: सारनाथ येथील 128 फुट उंच असलेले 'धमेख स्तूप' ही गुप्तकाळातील सुरेख निर्मिती आहे.

चित्रकला : गुप्तांच्या काळातील दगडात कोरून बनविलेले बौद्ध विहार आणि गुहा, अजंठा आणि एलोरा येथे आहेत. अजंठाच्या गुहामध्ये भित्ती आणि छतावरील भित्तीचित्रे जगप्रसिद्ध आहेत.



सांची येथील देवालय,
सांची-गुप्त काळ



धमेख स्तूप,
सारनाथ



अजिंठा गुहा,
महाराष्ट्र

© KSBS NOT TO BE REPUBLISHED

विज्ञान, गणित आणि खगोल शास्त्र:

गुप्तकाळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती साधली होती. पाटलीपुत्रचे, आर्यभट्ट हे गुप्तकाळातील महान गणित शास्त्रज्ञ होते. 'आर्यभटीय' हा त्यांचा महानग्रंथ होय. त्यांनी ग्रहणाचे कारण शोधून काढले. त्यांनी बीजगणित आणि त्रिकोणमितीमध्ये मोठे योगदान दिले. त्यांनी हे कार्य केवळ 23 व्या वर्षाचे असताना केले. 'ब्रह्मगुप्त' हा त्या काळातील आणखी एक गणित तज्ञ होता. श्रेष्ठ खगोलशास्त्रज्ञ 'वराहमिहिर' हे याच काळातील होते.



आर्यभट



मेहरौली लोखंडी खांब

धातु शास्त्र:

गुप्तकाळात धातू शास्त्राने लक्षणीय प्रगती केली. दिल्ली जवळील मेहरौली येथील लोखंडी खांब याचे उदाहरण आहे. हा 1500 वर्षे जुना आहे परंतु गंजलेला किंवा झीज झालेला नाही. याच काळातील आठ फूट उंच तांब्याची बुद्धमूर्ती नालंदामध्ये आहे.

आयुर्वेद: गुप्त काळातील वाग्भटाने चरक संहितेचे सार तयार केले. तो म्हणजे 'अष्टांग हृदय संहिता' हा आयुर्वेदाचा मुख्य ग्रंथ आजही वापरात आहे. प्राचीन भारतातील शस्त्रक्रिया ही बरीच प्रगत होती. शल्य चिकित्सकानी 127 प्रकारची शस्त्र चिकित्सा उपकरणे वापरली. शरीरातील साठलेले मुत्रखडे ते काढत होते. औषध म्हणून पारा प्रथम वापरण्याचे श्रेय भारतीय वैद्याना जाते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्द:

खगोलशास्त्र - ग्रह, नक्षत्र अशा अवकाशीय घटकांचे अध्ययन करणारे शास्त्र

तुम्हाला माहिती असू द्या

- गुप्त साम्राज्य सुमारे 1600 वर्षापूर्वी स्थापन झाले आणि त्यांनी सुमारे 200 वर्षे राज्य केले.
- कालिदासाची नाटके: अभिज्ञान शाकुंतल, मालविकाग्निमित्र आणि विक्रमोर्वशिय; काव्ये: रघुवंश, कुमारसंभव, ऋतुसंहार व मेघदूत ही होत.
- गुप्त काळातील देवालये प्रारंभी चौकोनाकृती पायावर बांधली जात असत. गाभारा आणि ओसरी मात्र असायचे.
- भित्ती म्हणजे भिंत. भिंतीवर काढलेल्या चित्राना भित्तिचित्र असे म्हणतात. भित्तिचित्रे अजंठा येथील बौद्ध गुहांमध्ये चितारलेली आहेत. सामान्य कुंचल्याच्या सहाय्याने व नैसर्गिक उपलब्ध रंगांनी ही चित्रे चितारलेली आहेत. शतकानुशतके या गुहा अनभिज्ञ होत्या. 1819 साली या गुहांचा शोध लगाला.
- मेहरौली येथील लोखंडी स्तंभाचे वजन सहा टन आणि उंची 23 फूट आहे. 19 व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत कोणत्याही युरोपियन लोहाराला देखील असा लोखंडी खांब बनविता आलेला नाही.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. गुप्तांची राजधानी _____.
2. कविराज ही पदवी मिळविलेला गुप्तांचा राजा _____.
3. 'मुद्राराक्षस' कृतीची रचना केलेले _____.
4. 'कविकुलगुरु' ही पदवी धारण केलेले महाकवी _____.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

5. अलाहाबाद (प्रयाग) येथील स्तंभाच्या शिलालेखात कोणत्या सम्राटाचे वर्णन आढळते?
6. गुप्त राजवटीत भारताला भेट देणारा चिनी प्रवासी कोण होता?
7. कालिदासाने लिहिलेल्या कोणत्याही एक नाटकाचे नाव लिहा.
8. 'मृच्छकटिक' कोणी लिहिले?
9. अमरसिंह यांनी रचलेला शब्दकोश कोणता?
10. गुप्त काळातील प्रसिद्ध गणित तज्ञाचे नाव काय?

III. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

11. समुद्रगुप्ताच्या योगदानाचे वर्णन करा?
12. संस्कृत साहित्याला गुप्तांच्या देणगीबद्दल वर्णन करा.

IV. खालील 'अ' आणि 'ब' यादीलील शब्दाच्या जोडया जुळवा:

अ	ब
1. कविराज	(अ) घो-को-की
2. विक्रमादित्य	(आ) खगोलगास्त्रज्ञ
3. फाहियान	(इ) समुद्रगुप्त
4. मेहरौली	(ई) दुसरा चंद्रगुप्त
5. वराहमिहीर	(उ) लोखंडी खांब

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम:


- भारतातील प्राचीन वास्तूशिल्प आणि मूर्तीशिल्पाच्या चित्रांचे माहितीसह संग्रह करा.
- समुद्रगुप्त, दुसरा चंद्रगुप्त, विक्रमादित्य, कालिदास, आर्यभट्ट, वराहमिहिर आणि वाग्भट यांची जीवन चरित्रे वाचा.

वर्धन

गुप्त साम्राज्याच्या ऱ्हासानंतर उत्तर भारतात अनेक स्वतंत्र राजवंश उदयास आले. पुष्यभूती वंश त्यापैकी महत्वाचे होते. या वंशावर राज्य करणाऱ्या राजा पैकी प्रभाकरवर्धन, राज्यवर्धन आणि हर्षवर्धन प्रख्यात होते. हर्षवर्धन बद्दल काही गोष्टी जाणून घेऊया.

हर्षवर्धन

हर्षवर्धन गादीवर आला तेंव्हा तो सोळा वर्षाचा होता. त्यावेळी त्याच्या आयुष्यात अनेक घटना घडल्या. हर्षवर्धनाचे वडील प्रभाकरवर्धन यांच्या मृत्यूनंतर त्याचा मोठा भाऊ राजवर्धन गादीवर आला. हर्षवर्धनाची बहिण राजश्रीचा विवाह मौखारी घराण्यातील गृहवर्मन याच्याशी झाला. माळवाच्या दुष्ट राजाने गृहवर्मनला ठार केले व राजश्रीला कनोज येथे कैद करुन ठेवले. तेव्हा राजवर्धनाने कूच करुन माळवा सैन्याचा पराभव केला. गौड देशाच्या शशांकाने राजवर्धनला ठार मारले. अशा संकटात हर्षवर्धन गादीवर आला.



© MTES NOT TO BE REPUBLISHED

तेव्हा नजरकैदेतून सुटका करुन घेऊन विंध्यपर्वताच्या जंगलात भटकत असलेल्या विधवा बहिणीचा त्याने शोध लावला. नंतर गृहवर्मनचे मौखारी राज्यही हर्षवर्धनच्या अधिपत्याखाली आले. त्याने मौखरीच्या कनोज शहराला आपली राजधानी बनविली नंतर आपला भाऊ राजवर्धनच्या मृत्यूला कारणीभूत असलेल्या शशांकाविरुध्द युध्द केले. पुढे त्याने मोठे सैन्य तयार करुन, काश्मीर व सिंध प्रदेश जिंकले. दक्षिण भारतावर आक्रमण केले. दक्षिणेत नर्मदा नदीच्या काठी पोहचलेल्या हर्षवर्धनाला चालुक्य घराण्यातील कन्नड राजा इम्मडी पुलकेशीने हाकलून लावले. एकंदरित हर्षवर्धनाने उत्तर भारतावर सुमारे 40 वर्षे राज्य केले. चिनीप्रवासी हयु-एन्-त्संग हर्षवर्धनाचा जवळचा मित्र होता.

साहित्य: हर्षवर्धन हा फक्त योद्धाच नव्हता, तो कवीही होता. त्यांने संस्कृतमध्ये 'प्रियदर्शिका', 'रत्नावळी' आणि नागानंद अशी तीन नाटके रचली बाणभट्टा सारख्या कविला आश्रय दिला. बाणभट्टाने हर्षवर्धनावर 'हर्षचरित' ही कृती लिहिली. शिक्षण प्रेमी असलेल्या हर्षवर्धनाने प्राचीन नालंदा विश्वविद्यालयाला उदारपणे देणगी दिली.

धर्म: हर्षवर्धन सर्वधर्म सहिष्णू होता. म्हणजे तो सर्व धर्मांचा आदर करत होता. मूळचे शैव धर्मी असले तरी बौध्द धर्माला खूप आदर दिला. कनौज व प्रयाग येथे धर्म परिषदेचे आयोजन केले.

@MES NOT TO BE REPUBLISHED

हयू-एन-त्संग


हयू-एन-त्संग

हूय-एन-त्संग (Hiuen Tsang) हा प्रसिद्ध चिनी प्रवासी सुमारे 1400 वर्षापूर्वी तो भारतात आला. त्यांनी 15 वर्षे भारतात फिरुन बौध्द साहित्याचा अभ्यास केला. त्याने नालंदा विश्वविद्यालयातही शिक्षण घेतले. हर्षवर्धनाच्या दरबारात अनेक वर्ष राहीला. 'सि-यु-की' (पश्चिमेकडील राज्यांचे दाखले) (Records of Western Kingdom) या प्रवासवर्णनात भारतातील अनुभवांची नोंद केली.

नालंदा विश्वविद्यालय: सद्याच्या बिहार राज्यातील नालंदा विश्वविद्यालय हे गुप्तांच्या काळात सहा शतकाहुन अधिक काळ जगप्रसिध्द होते. हे प्राचीन भारतीय विश्वविद्यालय. जपान, चीन या सारख्या परदेशातून हजारो विद्यार्थी येथे शिकण्यासाठी येत असत. येथे आठ महापाठशाळा (मोठया अध्यापन शाळा) आणि तीन मोठी ग्रंथालये होती. बौध्द धर्म हा अभ्यासाचा मुख्य विषय असला तरी वेद, योग, वैद्य व इतर विषयही शिकविले जात. कालांतराने अनेक आक्रमणे झाल्यामुळे विद्यापिठातील पुस्तके जाळली गेली. महान पंडीत मारले गेले या सर्व कारणांमुळे प्रतिष्ठा खालावली गेली. हयु-एन्-त्संग याने बरीच वर्षे या विद्यापिठात घालविली होती.



नालंदा विश्वविद्यालय (बिहार)

NOT TO BE REPUBLISHED

हे तुम्हाला माहिती असू द्या

❖ नालंदा विद्याकेंद्रात शिक्षण, निवारा किंवा अन्न यासाठी कोणतेही शुल्क नव्हते. यासाठी 100 गावांचा महसूल गोळा करून राखीव ठेवला होता. हर्षवर्धन हे या विद्यापीठाचे आश्रयदाते होते. येथील विद्यार्थ्यांचे जीवन शिस्तबद्ध होते. येथे श्रेष्ठ विद्वान अध्यापक शिकवीत होते.

अभ्यास

I. रिकाम्या जागा योग्य शब्दानी भरा.

1. हर्षवर्धनाचा मित्र असलेला चिनी प्रवासी _____.
2. हयु-एन्-त्संगच्या प्रवास वर्णन पुस्तकाचे नांव _____.
3. नालंदा विश्वविद्यालय सद्या _____ राज्यात आहे
4. हर्षवर्धनाला नर्मदा नदीच्या तिरावर पराभूत केलेला कन्नड राजा _____.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

5. हर्षवर्धनाच्या भाऊ व बहिणीचे नांव सांगा.
6. हर्षवर्धनाची राजधानी कोणती?
7. हर्षचरित ग्रंथ कोणी लिहिला?
8. हर्षवर्धन यांनी लिहिलेल्या नाटकांची नावे लिहा.
9. प्राचीन भारतातील प्रसिद्ध विश्वविद्यालय कोणते? आणि ते कोठे आहे?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

काश्मीरचे कार्कोटा राज्य


ललितादित्य

जगातील राजघराण्यांनी प्रशंसा करावी असे एक आदर्श राज्य निर्माण केले. तसेच अशक्यप्राय गोष्ट साध्य केलेल्यापैकी एक काश्मीरचे कार्कोट राजघराणे होय. राजा दुर्लभवर्धन याने सा.श.625 मध्ये स्थापन केलेले. कार्कोट घराणे हे त्यावेळच्या भारतातील सर्वात बलाढय साम्राज्यापैकी एक होते. कार्कोट साम्राज्य जे 230 वर्षे (सा.श. 625-855) अस्तित्वात होते. त्याने हिमालय आणि त्याच्या पायथ्याशी असलेल्या प्रदेशात प्रभाव टाकला इतकेच नव्हे, तर त्याने मध्य आशियामध्ये देखील आपल्या साम्राज्याचा विस्तार केला. पारस्पोर किंवा परिहासपूर ही राजधानी केली. कार्कोट हे सूर्योपासक होते. काश्मीरचे गतवैभव सांगणारे प्रसिद्ध मार्तंड 'सूर्य मंदिर' ही त्यांची सुंदर कलाकृती आहे.

ललितादित्य हा कार्कोट वंशातील लक्षवेधून घेणारा आणि अत्यंत प्रभावी राजा सा.श. 724 मध्ये गादीवर आला. त्यांच्या 36 वर्षाच्या कारकिर्दीतील साम्राज्य आजच्या उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि बिहार पर्यंत पसरले होते. हा काळ कार्कोट वंशाचा 'सुवर्ण काळ' म्हणून ओळखला जातो. कारण ललितादित्य यांनी कला आणि संस्कृतीला उत्तम प्रोत्साहन दिले.

कार्कोटचा काळ हा काश्मीरच्या शैव धर्माचा सर्वात गौरवशाली काळ मानला जातो. वसुगुप्ताचे शैवसूत्र याच काळात तयार झाले. प्रख्यात तत्वज्ञ कवी अभिनव गुप्त हे कार्कोटकाचे समकालीन होते. शैव सूत्रांच्या त्रिक व कौल परंपरा या काळात शिखरावर पोहोचल्या. प्रसिद्ध कवी 'कल्हण' ललितादित्याच्या दरबारात होता.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

रजपूत

रजपूत त्यांच्या साहस आणि पराक्रमासाठी ओळखले जातात. ते स्वतःला क्षत्रीय समजत ते आपली ओळख सूर्यवंशी आणि चंद्रवंशी म्हणून करुन देत असत.

रजपूत कुळांनी उत्तर भारतात जवळपास 500 वर्षे राज्य केले आहे. तो एक भव्य काळ म्हणून ओळखला जातो. आक्रमण करण्यासाठी म्हणून भारतात आलेले, अरब, तूर्क, अफगाणी आणि मोगल यांना धैर्याने लढा देणारे हेच होत.

रजपूतांचे गुण

भारताच्या इतिहासात रजपूतांना विशेष स्थान आहे. गोरक्षण, अनाथ, दुर्बल आणि स्त्रियांचे रक्षण करणे आपला धर्म आहे असे समजत. शरण आलेल्यांचे रक्षण करत आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाबद्दल गाथा गाऊन. स्फूर्ती घेत असत.

स्त्रिया आपल्या पतीला युध्दामध्ये गमावल्यावर अपमानित होऊन जगण्यापेक्षा मरण पत्करलेले बरे असे समजून सामुहिक आत्मसमर्पन करीत असत. या परंपरेला 'जोहार' म्हणतात.

कला आणि वास्तुशिल्प

रजपूत काळातील वास्तूशिल्प, साहित्य आणि कला समृद्ध आहे. यांची कला कुसरी केलेली मंदिरे, सुंदर राजवाडे, भव्य तटबंदीचे किल्ले आज ही पहावयास मिळतात. अशा हस्तकलाचे नमुने येथे आहेत.

खजुराहो (मध्य प्रदेश): खजुराहो येथील जग प्रसिद्ध खंडेराय महादेव मंदिर येथे 85 मंदिरे असून त्यातील आता 22 मंदिरे शिल्लक आहेत.

दिलवारा मंदिर (राजस्थान): अबू पर्वतावरील दिलवारा येथील अमृत शिला मंदिरातील सूक्ष्म कलाकृती जगप्रसिद्ध आहेत.

© KRBS NOT TO BE REPUBLISHED




खंडेराया महादेव मंदिर खजुराहो



दिलवारा मंदिर, माउंट अबू

कोणार्क (ओरिसा): कोणार्क मधील अद्वितीय 'सूर्य मंदिर' हे सूर्यदेवाच्या रथाप्रमाणे असणारे भारतातील भव्य असे मंदिर आहे. रथाच्या 24 चाकावर सुंदर कोरीव काम केलेले आहे.

भुवनेश्वर (ओरिसा): भुवनेश्वर मधील लिंगराज मंदिर हे 1000 वर्षाहून जुने आहे. या मंदिराचा गोपूर (शिखर) 180 फूट उंच आहे.



सूर्य मंदिर, कोणार्क




लिंगराज मंदिर, भुवनेश्वर

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ग्वालियर (मध्य प्रदेश): भव्य आकाराच्या ग्वालियर किल्याला 'भारतातील किल्यांच्या हारातील मोती' म्हणून संबोधले जाते. राजा मानसिंगने आपल्या आवडत्या मृगनयना राणीकरिता दोन मजली राजवाडा बांधलेला आहे. बाहेरील तटाच्या भिंतीवर कोरलेल्या अनेक मूर्तीमध्ये जैन धर्माचे पहिले तिर्थंकार वृषभनाथाची (आदिनाथ) मूर्ती फार उंच आहे.



ग्वालियर किल्ला



हवामहल, जयपूर

जयपूर (राजस्थान): जयपूरला 'गुलाबी शहर' म्हणतात. कारण तेथील बांधकामांच्या भिंतींचा रंग गुलाबी आहे. जयपूर हे जगातील सुंदर शहरापैकी एक आहे. पाच मजली हवामहल हे जयपूरचे प्रेक्षणीय स्थळ आहे.

उदयपूर (राजस्थान): भारतातील रमणीय शहर उदयपूर मधील राजवाडा हा राजस्थानातील सर्वात मोठा राजवाडा आहे.

चिकनी चित्रे: रजपूतांनी भिंतीवरील चिकनी चित्रांना प्रोत्साहन दिले. (चिकनी चित्र म्हणजे नाजूक चित्रित केलेला लघुपट) कलाकारांनी देवालय, राजवाडा, भिंती आणि पुस्तकात अलंकार केलेल्या चित्रांची रचना केली आहे.




राजवाडा, उदयपूर



रजपूत काळातील भिंतीवरील चिकनी चित्र

साहित्य: रजपूतांच्या काळामध्ये संस्कृत साहित्याचा विकास झाला. गुजराथी, हिंदी, राजस्थानी भाषाची अभिवृद्धी झाली. 'चांद बर्दायी' यांनी लिहिलेली 'पृथ्वीराजरासो' ही हिंदी साहित्य कृती त्या काळातील एक प्रसिद्ध साहित्य कृती होती. रजपूत राजामधील अनेक राजे स्वतः विद्वान होते. त्यानी कवीना आश्रय दिला. 'गीतगोविंद' लिहिणारे कवी जयदेव, कवी सेन यांच्या दरबारात होते. रजपूतानी नालंदा, काशी, विक्रमशीला, उज्जैन अशा अनेक प्राचीन शिक्षण केंद्राना प्रोत्साहन दिले.

NOT TO BE REPUBLISHED



रजपूत आणि समकालीन राज्ये (975-1200)

कृती: भारतातील प्राचीन शिक्षण केंद्राबद्दल अधिक माहिती संग्रहित करून आंतरजाळ्याद्वारे (इंटरनेट) अहवाल लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

रजपूत घराणे

भारताच्या इतिहासात अनेक रजपूत वंशानी महत्वाची भूमिका बजावली आहे. त्यापैकी

- ❖ गुर्जर प्रतिहार
- ❖ पाल
- ❖ चौहान
- ❖ गुहिल यांची कामगिरी महत्वाची आहे.

- **गुर्जर प्रतिहार:** नागभट्ट हा गुर्जर प्रतिहार घराण्याचा प्रसिद्ध राजा होता. गुर्जर प्रतिहार राजे आपला राज्यकारभार मध्य प्रदेशातील अवंती (उज्जैन) येथून चालवत होते. अरबांच्या आक्रमणापासून भारताचे रक्षण करण्याचे श्रेय त्याला जाते, अशाप्रकारे त्याने विशाल साम्राज्य स्थापन केले.

  याच वंशाचा भोज हा एक श्रेष्ठ राजा होऊन गेला. तो साहित्यिक होता. त्या काळातील प्रसिद्ध शहर कनोज वरती आक्रमण करुन ते जिंकून घेतले. बंगालच्या पाल यांचा पराभव केला. त्यांचे राज्य पाहिलेला अरब प्रवासी सुलेमान सांगतो, भोज हा एक श्रेष्ठ राजा होता. तो अरबांचा शत्रू होता. त्यांच्याकडे उत्तम असे घोडदळ होते.

- **पाल घराणे:** पालानी सुमारे चार शतके राज्यकारभार केला. धर्मपाल हा या वंशाचा श्रेष्ठ राजा होय. याच्या काराकिर्दीत पाल घराणे हे उत्तर भारतातील श्रेष्ठ घराणे म्हणून प्रसिद्ध होते. प्रसिद्ध शहर कनोजवर याने मिळविलेला विजय हे याचे विशेष कार्य होय. मूळचा कर्नाटकाचा असलेल्या विजयसेनने पालांचा शेवट केला व सेन वंशाची सुरुवात केली.

  पालानी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्याचबरोबर हिंदू धर्माला प्रोत्साहन दिले. त्यांनी शिक्षण प्रसारात विशेष आवड दाखवली. उदंडपूर विक्रमशील विद्यालयांची स्थापना यांच्याच काळात झाली.

- **चौहान घराणे:** तिसरा पृथ्वीराज हा चौहान घराण्यातील प्रसिद्ध राजा होय. त्यांची राजधानी दिल्ली होती.

NOT TO BE REPUBLISHED © MTBS

पृथ्वीराज चौहान तसेच कनोजचा राजा जयचंद्रची मुलगी संयुक्ता यांच्या प्रेमाच्या स्वारस्यकथा त्यावेळच्या अनेक ग्रंथामधून वर्णन केल्या आहेत. संयुक्ता ही अतिशय सुंदर राजकुमारी होती. राजा जयचंद्र आणि पृथ्वीराज चौहान यांच्यात पूर्वापार वैर होते. जयचंद्राने मुलीच्या लग्नाचे स्वयंवर ठेवले होते. पण त्यासाठी पृथ्वीराज चौहानला आमंत्रण दिले नव्हते. पृथ्वीराज चौहान आणि संयुक्ता एकमेकावर प्रेम करत होते. त्यामुळे पृथ्वीराज चौहानचा अपमान करण्यासाठी जयचंद्राने त्याचा पुतळा पहारेकऱ्या प्रमाणे महालाच्या प्रवेश द्वारापाशी ठेवला होता.

स्वयंवरामध्ये संयुक्ताने सर्व राजकुमाराना सोडून पृथ्वीराज चौहान च्या पुतळ्याच्या गळ्यात हार घातला. जवळच स्वयंपाक खोलीत लपलेल्या पृथ्वीराज चौहानने हे पाहिले. लागलीच त्याने सुयुंक्ताला घोडयावर बसवून पळवून नेले व स्वतःच्या महालात तिच्याशी लग्न केले. या घटनेपासून दोन्ही राजघराण्यातील संबंध अधिकच बिघडले.

पृथ्वीराज चौहानने मंहमद घोरीच्या आक्रमणांना विरोध केला. स्वतःच्या रजपूत राजाना एकत्र केले. पण कनौजचा राजा जयचंद्र त्यामध्ये सामील झाला नाही. पृथ्वीराजाने युद्धामध्ये हारलेल्या मंहमद घोरीला दया दाखविली. पुढच्याच वर्षामध्ये झालेल्या युद्धामध्ये पृथ्वीराजचा पराभव झाला. आपत्तीच्या वेळी त्याने घोड्यावरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. पण त्याला शत्रू सैनिकानी पकडले. महमंद घोरीने त्याला ठार केले. दिल्ली मंहमद घोरीच्या हाती आली. येथूनच दिल्ली सुलतानाच्या सत्तेला सुरुवात झाली.

पृथ्वीराज चौहान त्याच्या शौर्य आणि धैर्यासाठी ओळखला जात असे, 'पृथ्वीराजरासो' या हिंदी महाकाव्यात चांद बर्दाई या कवीने त्याच्या पराक्रमाचे वर्णन केले आहे.


विजयस्तंभ, चित्तोडगड

- **गुहील:** रजपूतामध्ये गुहील हे वीर परंपरेचे वंशज होते. या वंशातील राजा खोम्मणाने अरबांच्या आक्रम णापासून, आपल्या राज्याचे रक्षण करून 'बप्पारावळ' ही पदवी धारण केली. या घराण्यातील पराक्रमी राणा कुंभ याने दिल्ली सुलताना विरुद्ध लढून राज्याचे रक्षण केले. राज्याच्या सुरक्षतेसाठी त्याने 32 किल्ले बांधले.

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

चित्तोडगडचा प्रसिद्ध विजयस्तंभ ही प्रसिध्द शिल्पकलाकृती होय. राणासंग अथवा राणा संग्रामसिंह गुहील घराण्याचा आणखीन एक प्रसिद्ध राजा होता तो 100 लढायां करणारा शूरवीर राजा होता. त्यांच्या शरीरावर 80 जखमा झाल्या होत्या त्याने दिल्लीच्या सुलतानाविरुद्ध अनेक लढाया केल्या.

आर्थिक स्थिती:

- गुप्त काळापासून सरकारी नोकरी करणाऱ्याना जमिनी दान दिल्या जात होत्या. ती पुढे जमिनीदारी पद्धत बनली. या पद्धतीमुळे सर्व सामान्य शेतकऱ्यांची अडचण झाली.
- नगरामध्ये व्यापारी आणि कारागीरांची वस्ती होती. वैश्य लोक व्यापार आणि आर्थिक देवाणघेवाण करत होते.
- परकीय व्यापार चालू होता मसाले पदार्थ, कापूस, रेशमी वस्त्रे, सुंगधी द्रव्ये आणि हिरे यांची भारतातून निर्यात होत असे. घोडे मध्य आशिया व अरब देशातून आयात केले जात होते.
- रजपूतानी त्यांच्या कराचा बराचसा भाग किल्ले आणि देवस्थानाच्या बांधकामावर खर्च केला. त्यामुळे लोकांना रोजगार मिळाला.

सामाजिक स्थिती:

- रजपूत काळात व्यवसायानुसार वेगवेगळी वर्ग व्यवस्था होती.
- महिलांना समाजात आदराचे स्थान होते. स्त्रिया साहित्य, नृत्य, संगीत, चित्रकला, आणि कलाकुसरतीच्या कार्यात निपूण होत्या.
- रजपूत राजे हे पुण्यक्षेत्रामध्ये स्नान करणे हे पवित्र समजत असत ब्रम्हदेवाचा वास असलेले 'पुष्कर' (अजमेर जवळ) हे एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र बनले. येथे दरवर्षी भरणारी मोठी उंटाची जत्रा आज ही जग प्रसिद्ध आहे.


© KTBS NOT TO BE REPUBLISHED



'उंटाचा मेळा' पुष्कर

अहोम राजवंश

अहोम राजवंशाने भारताच्या सध्याच्या आसाम प्रदेशावर 598 वर्षे (सा.श. 1228-1826) राज्य केले. या राज घराण्याचा संस्थापक शान राजकुमार सुकपा होता. यांचे वंशज पट्काय डोंगर पार करून आसाममध्ये स्थायिक झाले. आसाम मध्ये राजाला 'कओपू' असे ही म्हटले जात असे. मंत्रीमडळातील मत्र्यांच्या संमतीने (मंत्रीमंडळातील विविध पदे बुर्हगोहेन, बोर्गोहेन, बोर्बरूवा, बोर्फूखान, बोर्फाट्रोगोहेन) राजाची नियुक्ती करण्यात येत असे. राजाला हटवण्याचा अधिकार हा मंत्रीमंडळाला होता.



अहोम राजाचे प्रतिक

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



सुकापा

अहोमांच्या 600 वर्षाच्या कारकिर्दीत तीन प्रमुख राजे होऊन गेले. सुकापा - अहोम राज्याचा संस्थापक. सुहुंग मुंग - याने राज्याचा विस्तार केला. सुपाथ्का- राज्य प्रगतीपथावर नेले. या व्यतिरीक्त अहोम साम्राज्याचा प्रसिद्ध सेनापती लसित बोर्फुखान म हापराक्रमी म्हणून ओळखला जातो.

अहोम राण्या: अहोम राजाप्रमाणे राण्यांनी राज्याम ध्ये महत्वाची भूमिका बजावली. महाराणीला बोर कुवरी इतर राण्याना पार्वतीय कुवरी, राजदंगीय कुवरी, तमुली कुवरी म्हणत असत. सहसा राण्या अहोम कुलीन घराण्यातील होत्या. राजाच्या मृत्यूनंतरही राण्या राज्याचा कारभार सांभाळत होत्या. नाण्यांच्या दोन मुखावर अनुक्रमे राजा आणि राण्यांची नावे छापलेली होती.

मुघलांच्या सोबत लढाया: भारतात मुघलांचे वर्चस्व बलाढय असताना सुध्दा ईशान्य भारतात आपले प्रभुत्व स्थापन करू न शकल्याचे कारण म्हणजे अहोम राजघराणे होय. अहोम राज्यांवर सा.श. 1615 ते सा.श. 1682 या काळात मुघलांनी अनेक वेळा स्वारी केली आणि काही भाग जिंकून घेतला. राजा चक्रध्वज सिंघ याने आपला मंत्री लसिथ बोर्फूखानच्या नेतृत्वाखाली आक्रमण करून मुघलांचा पराभव केला आणि सर्व प्रदेश पुन्हा ताब्यात घेतला. या संघर्षाचा परिणाम म्हणजे गुवाहटी अहोम साम्राज्याचा भाग बनला.

© IASTBS NOT TO BE REPUBLISHED

अहोमचे नौकादल: अहोम युद्धात स्वतःचे नौसेना ब्रम्हपुत्रा नदीच्या पश्चिम दिशेला ठेवून शत्रूला परतवून लावत होते. युद्धनौका बांधण्यात ते तरबेज होते. नौकायुद्धात ते अप्रतिम होते. युद्ध तंत्रातील गनिमीकाव्याचे त्यांना ज्ञान होते. त्यामुळे मुघल राजाना त्यांना जिंकणे सहज साध्य झाले नाही.

काल गणना (सा.श.)

कार्कोट राजवंश - सा.श. 625-855

रजपूताचा काळ - सा.श. 650-1200

अहोम राजवंश - सा.श. 1228-1826

अभ्यास

I. रिकाम्या जागा योग्य शब्दानी भरा.

1. कार्कोट वंशाचा प्रसिद्ध राजा _____.
2. गीतगोविंद लिहिलेले कवी _____.
3. अहोम राजवंशाने _____ प्रदेशावर राज्य केले.
4. गुर्जर प्रतिहार वंशाचा राजा भोजच्या दरबारात भेट दिलेला अरब प्रवासी _____.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

5. रजपूतांचे गुणधर्म कोणते?
6. रजपूतांच्या तीन प्रसिद्ध वास्तुशिल्पाची नावे सांगा. ती कोठे आहेत?
7. 'पृथ्वीराज चौहान' यांच्या विषयी टिपा लिहा.

@MTBS NOT TO BE REPUBLISHED

8. बाप्पारावळ कोण होता?

9. राणा संग्रामसिंहावर टिपा लिहा.

10. रजपूतांच्या सामाजिक स्थितीवर टिपा लिहा.



उपक्रम:

- रजपूतानी बांधलेली मंदिरे, राजवाडा आणि किल्ले यांची चित्रे (भावचित्रे) गोळा करा.
- रजपूत काळातील प्रसिद्ध वास्तूशिल्प केंद्रे नकाशात दाखवा.
- प्राचीन काश्मीरमधील कवी, विद्वान आणि त्यांच्या साहित्य कृतींची यादी तयार करा.
- लसिथ बोर्फूखान यांचे चरित्र वाचा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 13 दिल्लीचे सुलतान

D5N7T7

पाठाचा परिचय

11 - 12 व्या शतकामध्ये तुर्कीयांच्या सैन्याने भारतावर वारंवार आक्रमण केले. ही आक्रमणेच दिल्लीच्या सुलतानाच्या राजवटीस (सा.श. 1206-1526) कारणीभूत ठरली. या पाठामध्ये दिल्लीच्या सुलतानाचा राज्यकारभार, धोरण त्यांच्या काळातील सामाजिक, आर्थिक स्थिती आणि वास्तुशिल्पकला, साहित्य यामध्ये त्यांनी दिलेल्या योगदानासंबंधी माहिती देण्यात आली आहे.

सामर्थ्ये

1. 11-12 व्या शतकात झालेला ऐतिहासिक उत्कर्ष दिल्लीच्या सुलतानांच्या राज्य स्थापनेस कारणीभूत ठरला हे समजून घेणे.
2. सुलतानांच्या राज्यकारभाराचा, भारतीय समाज, आर्थिक व संस्कृतीवर पडलेला प्रभाव समजून घेणे..
3. दिल्लीच्या सुलतानांच्या काळातील ऐतिहासिक स्थळे नकाशात दाखविणे.

@MTBS NOT TO BE REPUBLISHED

आपल्या देशावर 8 व्या शतकापासून अनेक वेळा परकीयांनी आक्रमण केले. हे परकीय भारताच्या वायव्य सरहद्दीतून आले होते. संपत्तीची लूट, राज्याचा विस्तार आणि इस्लाम धर्म प्रसार हा त्यांच्या आक्रमणाचा प्रमुख उद्देश होता.

- **अरबांचे आक्रमण:** भारतावर सर्व प्रथम अरब लोकांनी आक्रमण केले. त्यांनी ख्रि. श. 712 मध्ये सिंध व मुलतान प्रांत आपल्या ताब्यात घेतला व त्या प्रदेशात इस्लामचा पाया घातला परंतु काश्मिरच्या कार्कोट वंशाच्या प्रतिकारामुळे अल्पशा कालावधीतच अरबांचे अतिक्रमण थंडावले.

- **तुर्काचे आक्रमण:** सुमारे तीन शतकानंतर तुर्कीमध्ये जन्मलेल्या महंमद गझनी याने भारतावर आक्रमण केले. हा अफगाणिस्थानातील गझनी नावाच्या छोट्याशा राज्याचा सुलतान होता. त्यांने भारतावर 17 वेळा स्वाऱ्या केल्यामुळे भारतातील अनेक ऐश्वर्य संपन्न शहरे आणि धार्मिक स्थळे उध्वस्त केली. यामध्ये मथूरामध्ये असलेले प्रसिद्ध श्रीकृष्ण मंदिर आणि गुजरातमधील सोमनाथ मंदिर यांचा समावेश होतो.



महंमद गझनी

देशाच्या स्वातंत्र्यानंतर उध्वस्त झालेल्या सोमनाथ मंदिराची पुनर्बांधणी सा.श. 1951 मध्ये करण्यात आली. भारताचे पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले.



सोमनाथ मंदिर, गुजरात

© MBS NOT TO BE REPUBLISHED

- **महंमद घोरी:** 12 व्या शतकाच्या उत्तरार्धात अफगाणिस्तानच्या महंमद घोरी याने भारतावर आक्रमण करून भारतातील सिंध व पंजाब प्रांत आपल्या ताब्यात घेतला. त्याने आक्रमण पुढे चालू ठेवले. दिल्लीचा राजा पृथ्वीराज चौहान याने महंमद घोरीचा तराईच्या पहिल्या युध्दात दारूण पराभव केला. पण पृथ्वीराजाने त्याला फाशी दिली नाही. दुसऱ्याच वर्षी पुन्हा त्यांच्यामध्ये झालेल्या घनघोर युध्दात पृथ्वीराजाचा पराभव झाला. त्याला महंमद घोरीने ठार मारले व दिल्ली महंमद घोरींच्या हाती पडली. घोरीने जिंकलेला प्रदेश त्याचा सेनापती कुतुबुद्दीन ऐबक याच्याकडे स्वाधीन केला. तेथून कुतुबुद्दीन दिल्लीचा सुलतान म्हणून राज्य करू लागला.



महंमद घोरी

गुलाम वंश

घोरीने जिंकलेला प्रदेश आपला सेनापती कुतुबुद्दीन ऐबक याच्याकडे हस्तांतरीत केला. घोरीच्या मरणानंतर दिल्लीचा सुलतान म्हणून तो स्वतंत्र राज्य करू लागला.

दिल्लीवर राज्य केलेले 5 वंश:

- ❖ गुलाम वंश
- ❖ खिलजी वंश
- ❖ तुघलक वंश
- ❖ सय्यद वंश
- ❖ लोदी वंश

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कुतुबुद्दीन ऐबक: कुतुबुद्दीन हा सुरुवातीला महंमद घोरीचा गुलाम होता. त्यामुळे त्याना 'गुलाम वंश' म्हणतात. त्याने शत्रुला जिंकून तुर्कांचे राज्य बळकट केले. त्याने मिळविलेल्या विजयाची आठवण म्हणून दिल्ली येथील मेहरौली येथे कुतुबमिनार बांधण्यास सुरुवात केली. इल्तमशच्या काळात तो बांधून पूर्ण झाला.



कुतुबुद्दीन ऐबक



सुलताना रजिया

दिल्लीच्या सुलतानांच्या काळात अधिकाराची सूत्रे आपल्या हाती घेतलेली एकमेव महिला म्हणजे सुलताना रजिया ही होय. ही वीरांगणा आपल्या राज्याचा न्यायनिवाडा करत पुरुषांना लाजवेल अशी रणांगणे तिने गाजविली. परंतु स्थानिक सरदारांना महिलेचे वर्चस्व सहन झाले नाही. त्यामुळे त्यांनी तिचा वध केला.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



कुतुबमिनार, दिल्ली

खिलजी वंश


अल्लाउद्दिन खिलजी

गुलाम वंशानंतर खिलजी वंश अधिकारावर आला. खिलजी वंशातील अल्लाउद्दीन खिलजी हा प्रबळ सुलतान होऊन गेला. त्यावेळी राज्यकार भार सैनिकांच्या हाती होता.

धोरण: अल्लाउद्दीनने राज्यकारभार, सैन्य व आर्थिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या. अत्यावश्यक वस्तूंच्या व्यापारावर नियंत्रण ठेवले. मादक पदार्थांचे सेवन आणि जुगार याचा निषेध केला, असे करणाऱ्यावर क्रुरपणे दंड केला.

सैन्याचे आक्रमण: संपूर्ण भारत जिंकून आपल्या अधिपत्याखाली आणावा, अशी अल्लाउद्दिन खिलजी याची महत्वाकांक्षा होती. सुरवातीला त्याने आपल्या सैन्यांच्या जोरावर उत्तर भारतावर ताबा मिळविला. पुढे दक्षिण भारतावर ताबा मिळविण्यासाठी आपला गुलाम मलीक कपूर नावाच्या सरदारला मोठ्या सैन्यानिशी पाठविले. मलिक कपूरने दक्षिण भारतातील चार राज्ये जिंकून घेतली व त्यांची राजधानी लुटली.

मलीक कपूरने जिंकलेली राज्ये: महाराष्ट्राचे यादव (राजधानी देवगिरी) आंध्राचे काकतीय (वारंगलू) कर्नाटकातील होयसळ (व्दारसमुद्र) आणि तामिळनाडूचे पांड्य (मदुराई).

त्यानंतर मलिक कपूरने आपल्या सैन्याचे आक्रमण पुढे रामेश्वर पर्यंत चालू ठेवले. या दरम्यान त्याने अनेक देवालयांची अपार संपत्ती लुटली. धनसंपत्ती मोठ्या प्रमाणात जमा केली. दक्षिण भारतातून दिल्लीला इतक्या जास्त प्रमाणात संपत्तीचा ओघ यापूर्वी कधीही गेला नव्हता.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



अलाई दरवाजा, दिल्ली

अल्लाउद्दीन खिलजी यांनी अमीर खुस्त्रो, अमीर हसन इत्यादी पारशी कविना प्रोत्साहन दिले. दिल्लीमध्ये सिरी नावाच्या किल्याची निर्मिती केली. 'अलाई दरवाजा' ही त्याची भव्य रचना होय.

अल्लाउद्दीन खिलजीचा शेवट फार दु:खद झाला. राजवाड्यात दंगा झाला. शेवटी मलीक कपूरने अधिकाराच्या जोरावर अल्लाउद्दीनला ठार मारले व स्वतः राजगादीवर बसला. नंतर तुघलकांची सत्ता आली.

तुघलक

तुघलक घराण्यामध्ये महंमद बिन तुघलक हा प्रमुख सुलतान होऊन गेला. हा अत्यंत विव्दान होता परंतु अत्यंत रागीट व घाईगडबडीने निर्णय घेत असे. व्यवहार कौशल्य कमी होते, असे विचित्र गुण त्याच्याकडे होते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



महमद बिन तूघलक

राज्यकारभारातील प्रयोग: आपल्या राज्यकारभारात सुधारणा घडवून आणण्यासाठी त्याने अनेक प्रयोग केले. त्यामध्ये प्रमुख म्हणजे राजधानीचे स्थलांतर राजधानी दिल्ली ऐवजी भारताच्या मध्यभागी असलेल्या देवगिरी येथे केल्यास ते आपल्या साम्राज्याचे मध्यवर्ती ठिकाण होईल, असे त्याचे मत होते. दिल्लीहून 700 मैल दूर असणाऱ्या देवगिरीला 'दौलताबाद' असे नाम करण करून दिल्लीतील सर्व लोकांनी तेथे जावे असा सक्तीचा आदेश दिला. परंतु स्थलांतरासाठी गेलेल्या लोकांचे अपार कष्ट झाले. अनेक लोक वाटेतच मरण पावले. त्यांने केलेली चूक त्याला समजली आणि लोकांना पुन्हा दिल्लीला परत जायचे आदेश दिले परंतु या कष्टातून जगलेले काही थोडेच लोक दिल्लीला परत जाऊन पोहचले.

महंमद बिन तुघलकाने हाती घेतलेली दुसरी एक सुधारणा म्हणजे चांदीच्या नाण्याऐवजी तेवढ्याच किंमतीची तांब्याची नाणी चलनात आणली. परंतु तांब्याची नाणी छापण्याचा अधिकार सरकारलाच आहे. अशी राजाज्ञा केली नाही. परिणामी अनेक लोकांनी तांब्याची नाणी छापण्यास सुरुवात केली. त्या नाण्यांच्या बदल्यात सरकारला चांदीची नाणी देणे साध्य झाले नाही. शेवटी तांब्याची नाणी रद्द करण्यात आली. एकूण लोकांकडून राजाची फसवणूक झाली. या प्रयोगामुळे राज्याची आर्थिक स्थिती बिकट झाली.

महंमद बिन तुघलकाच्या राज्य कारभाराला कंटाळलेल्या असंतुष्ठ लोकांनी बंड पुकारले. सिंध लोकांचे बंड मोडून काढत असताना तीव्र तापाने त्याचा मृत्यू झाला.

गुलाम वंश, खिलजी आणि तुघलकानंतर सय्यद आणि लोदी वंशानी दिल्लीवर अल्पकाळ कारभार केला. लोदी वंशाचा शेवटचा राजा इब्राहीम लोदी याचा मोगल राजा बाबरकडून पानिपतच्या पहिल्या युद्धात पराभव झाला. या प्रमाणे मोगल साम्राज्याचा पाया घातला.

दिल्लीच्या सुलतानांची देणगी

राज्यकारभार: दिल्लीच्या सुलतानांच्या राज्यात बहुसंख्येने हिंदू लोक असले तरी राज्यकारभार तुर्कीयांच्या पद्धतीनुसार चालत असे. लष्करी सत्ता हा राज्याच्या पाठीचा कणा होता. सुलतान हे निरंकुश होते. बल्बन हा सुलतान स्वत:ला अल्लाचा प्रतिनिधी मानत असे. तो स्वत:ला सर्वस्व समजत असे. दिल्लीच्या सुलतानांना स्थानिक राजांच्या प्रबळ विरोधाला सतत तोंड द्यावे लागत असे. त्यामूळे अधिकार जाण्याची भिती सुलतानाना सतावित होती.

अर्थव्यवस्था: शेतकऱ्यांच्या जमिनीवरील कर अत्यंत विपरीत होते. महंमद बिन तुघलकाने आपल्या काळात जमिनीवरील कर अधिक वाढविले होते. त्याशिवाय त्याने निर्दयपणे त्याची वसुलीही केली. परिणामी शेतकऱ्यांनी बंड पुकारले.

विणकाम हा येथील लोकांचा प्रमुख उद्योग होता. शहरात बांधकाम व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालत असे. त्यामुळे अनेक लोकांना रोजगार उपलब्ध होत होता.

सुलतान हे प्रामुख्याने युद्धासाठी वापरणारे घोडे आयात करत असत.


© KTRS NOT TO BE REPUBLISHED

अल्लाउद्दीन खिलजी हा गुलामाची किंमत ठरवत होता. तसेच त्याकाळी गुलामाची बाजारात खुलेआम विक्री होत असे. सुलतानांच्या अधिपत्याखाली गुलामांची संख्या ही आश्चर्यकारक होती. अल्लाउद्दीनकडे 50,000 गुलाम होते. तर फिरोजशहाकडे तुघलकाच्या अधिपत्याखाली 1,80,000 गुलाम होते.

वास्तुशिल्प आणि साहित्य: दिल्ली सुलतानाच्या काळातील प्रमुख वास्तुशिल्प म्हणजे प्रसिद्ध कुतुबमिनार (71 मी उंच), अलाई दरवाजा हे सुंदर व्दार, कुव्वत-उल- इस्लाम मशीद आणि सिरी किल्ला ही होत.


अमीर खुस्रो

याच काळात उर्दू भाषा प्रचलित झाली. अमीर खुस्रो आणि अमिर हसन हे त्या काळातील प्रसिद्ध पर्शियन कवी होते. अमीर खुस्रो हा एक प्रसिद्ध संगीतकार होता. तबला, सतार या संगीत वाद्यामध्ये तो पारंगत होता. त्याने स्वतःची अशी वेगळी ओळख निर्माण केली होती. जयशी नावाच्या उर्दू कविने 'पदमावत' हे सूफी काव्य लिहिले. रामानंद, कबीर, रोहीदास, मीरा हे सर्व या काळातील संत होत.


कबीरदास


मीराबाई

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

कालगणना (सा. श.)

- सिंध प्रांतावर अरबांचे आक्रमण - सा.श. 712
- महंमद गझनीच्या स्वाऱ्या - सा.श. 1000 - 1026
- तराईचे युद्ध (महंमद घोरी आणि पृथ्वीराज चौहान यांच्यातील) - सा.श. 1191 - 1192
- दिल्लीच्या सुलतानांची कारकीर्द - सा.श. 1206 - 1526
- कुतुबुद्दीन ऐबक - सा.श. 1206 - 1210
- रजिया सुलतान - सा.श. 1236 - 1240
- अल्लाउद्दीन खिलजी - सा.श. 1296 - 1316
- महंमद बिन तुघलक - सा.श. 1325 - 1351
- पानिपतची लढाई आणि मोगल साम्राज्याचा उदय - सा.श. 1526

नवीन शब्द:

मिनार - उंच खांबाचे गोपूर / उंच खांबाचे टॉवर.

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. पहिल्या तराईच्या युध्दात पृथ्वीराज चौहान कडून _____ हा पराभूत झाला.
2. अल्लाउद्दीन खिलजीने दिल्लीमध्ये _____ या किल्ल्याची निर्मिती केली.
3. पानिपतच्या पहिल्या युध्दात _____ याने इब्राहिम लोदीचा पराभव केला.
4. गुलाम वंशाचा संस्थापक _____.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

5. दुसऱ्या तराईच्या युध्दात महमद घोरीने कोणाविरुध्द विजय मिळविला?
6. कुतुबमिनार कोणी बांधला?
7. दिल्ली सुलतानांच्या काळात राज्यकारभार केलेली एकमेव महिला कोण?
8. दक्षिण भारतावर स्वारी केलेला अल्लाउद्दीन खिलजीचा सरदार कोण?
9. महमद बिन तुघलकाने राजधानी कोठून कोठे स्थलांतरित केली?
10. 'स्वतःला देवाचा प्रतिनिधी मानणारा' दिल्लीचा सुलतान कोण?

III. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

11. महंमद गझनीच्या स्वाऱ्यांचे परिणाम लिहा.
12. कुतुबुद्दीन ऐबकाची कामगिरी लिहा.
13. अल्लाउद्दीन खिलजीने राज्यकारभारात केलेले विविध प्रयोग कोणते? त्यांचे परिणाम सांगा.
14. महंमद बिन तुघलकाने केलेले राज्यकारभारातील प्रयोग असफल का झाले?
15. दिल्लीच्या सुलतानाच्या काळातील राज्याची सामाजिक आणि आर्थिक स्थिती कशी होती?
16. दिल्लीच्या सुलतानांनी वास्तुशिल्पकला व साहित्याला दिलेले योगदान कोणते?

@KEBS NOT TO BE REPUBLISHED

IV. खालील 'अ' आणि 'ब' गटाच्या जोड्या जुळवा.

अ	ब
1. जयशी	अ. अलाई दरवाजा
2. दौलताबाद	आ. सितार
3. अल्लाउद्दीन खिलजी	इ. पद्मावत
4. अमीर खुस्रो	ई. देवगिरी



उपक्रम:

- दिल्लीच्या सुलतानाच्या काळातील वास्तुशिल्प कलांची चित्रे वर्णनासह संग्रह करा.
- नकाशात दिल्ली सुलतानाच्या काळातील ऐतिहासिक स्थळे ओळखा.

@MTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 14 विजयनगरचे साम्राज्य आणि बहामनी राज्य

Q2A2I3

विजयनगर साम्राज्य

पाठाचा परिचय

दिल्लीच्या सुलतानांच्या लष्करी मोहिमेमुळे दक्षिण भारतातील साम्राज्ये म्हणजे सेउना (महाराष्ट्र), होयसळ (कर्नाटक), काकतीय (तेलंगणा) आणि पांडय (तामिळनाडू) या साम्राज्यांचा नाश झाला. मजबूत राजकीय अधिकाराशिवाय संस्कृती आणि सामाजिक जीवन कोसळले. अशा संकटकाळात विजयनगर साम्राज्याचा उदय झाला. विजयनगर साम्राज्याने दक्षिण भारतातील हिंदू धर्म आणि संस्कृतीचे रक्षण आणि पोषण केले आणि तीन शतके (सा.श. 1336-1646) मोठ्या वैभवाने भरभराट केली.

या पाठात विजयनगर साम्राज्यातील प्रमुख सम्राटांचे यश आणि साम्राज्याच्या अवनतीला कारणीभूत अशा रक्कस तंगडी लढाई (सा.श. 1565) आणि त्याचे परिणाम सांगितले आहेत. याशिवाय साहित्य आणि कलेसाठी साम्राज्याच्या योगदानाचे देखील वर्णन केले आहे.

विजयनगर साम्राज्याच्या स्थापनेनंतर (सा.श. 1336) अल्पकाळातच बहामनी राज्य (सा.श. 1347) उदयास आले. कृष्णा नदीने या दोन्ही राज्यांसाठी समान सीमा तयार केली. कृष्णेच्या उत्तरेला बहामनी राज्य तर दक्षिणेला विजयनगर साम्राज्य होते. उत्तरेला कृष्णा आणि दक्षिणेला तुंगभद्रा यांच्यामधील सुपीक जमीन म्हणजे रायचूर दोआब. दोआब मिळविण्यासाठी दोन्ही साम्राज्ये सतत लढत होती. कालांतराने बहामनी राज्यांच्या सुलतानांमध्ये सत्तेसाठी संघर्ष सुरू झाला. परिणामी, राज्याचे पाच शाही राजवंशांमध्ये विभाजन झाले (सा.श. 1489). त्या प्रदेशात पाच शाही घराणी उदयास आली. त्यामध्ये विजयपूरची आदिलशाही प्रमुख होती.

या पाठात बहामनी राज्याचा सुलतान फिरोज शहा आणि त्याचा प्रसिद्ध मंत्री महमंद गवान यांच्या कार्याचे विवरण केले आहे. यासोबत बहामनी राज्य आणि आदिलशाहीच्या अविस्मरणीय अशा योगदानाचे वर्णन केले आहे.

© BSCERT NOT TO BE REPUBLISHED

सामर्थ्ये

1. विजयनगरच्या राजांनी केलेल्या योगदानांचा अर्थग्रहण करणे.
2. त्या काळातील साहित्यकृती, संगीत, वास्तु शिल्प आणि मूर्ती शिल्पकलेच्या महानतेचे कौतुक करणे व त्यांचे संरक्षण करणे.
3. विजयनगर सम्राटांनी धर्म आणि संस्कृतीचे जतन आणि पोषण करण्यासाठी केलेल्या महत्वपूर्ण कार्याचे कौतुक करणे.
4. नकाशात त्या साम्राज्यातील मुख्य स्थळासंबंधित महत्वाची ठिकाणे ओळखणे.
5. फिरोज शहा आणि महमंद गवान यांचे योगदान समजून घेणे.
6. बहामनी आणि विजापूर सुलतानांच्या साहित्य, कला आणि वास्तु शिल्पकलेतील महान योगदानाचे कौतुक करणे.
7. नकाशात बहामनी राज्याशी संबंधित महत्वाची ऐतिहासिक ठिकाणे ओळखणे.



विजयनगर साम्राज्याचे राष्ट्रचिन्ह - वराह

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

विजयनगर साम्राज्याचा नकाशा पहा. साम्राज्य किती विशाल आहे? त्या काळात ते जगातील सर्वात मोठ्या साम्राज्यांपैकी एक होते.

दिल्लीच्या सुलतानांच्या लष्करी मोहिमेमुळे दक्षिण भारतातील अनेक समृद्ध राज्ये नष्ट झाली. या भागातील धार्मिक, आर्थिक आणि सामाजिक जीवन अधोगतीकडे वळले होते. या अशा काळात विजयनगर साम्राज्याची स्थापना झाली आणि हिंदू धर्म आणि संस्कृतीला प्रोत्साहन मिळाले. सर्वधर्मसमभाव या तत्वाचे समर्थन करून सुमारे तीन शतके राज्य केले. बळ्ळारी जिल्ह्यातील हंपी ही विजयनगर साम्राज्याची राजधानी होती. हे 1336 मध्ये तुंगभद्रा नदीच्या दक्षिण तिरावर स्थापन झाले.


कृष्णदेवरायांच्या काळातील विजयनगर साम्राज्य
(सा.श. 16वे शतक)
अहमदनगर
चौल
दाभोळ
कल्याण
बीदर
ओरंगल्लू
कलबुरगी
विजयपूर
कोंडपल्ली
ताळीकोटे
तंगडगी
रायचूरू
रक्कसगी
बेळगावी
गोवा
विजयनगर
अंकोला
ताडपत्री
केळदी
लेपाक्षी
श्रृंगेरी
तिरूपती
मंगळूर
बेंगळूरू
वेलुरू
श्रीरंगपट्टण
पांडीचेरी
अरबी समुद्र
बंगालचा उपसागर
मदूराई
उ
हिंदी महासागर
SKETCH MAP NOT TO SCALE
© MTBS NOT TO BE REPUBLISHED

हरीहर आणि बुक्क

संगमच्या पुत्राने तुंगभद्रा नदीच्या दक्षिण तीरावर विजयनगर साम्राज्याची स्थापना केली.

हरिहर, बुक्क, कंपन, मारप्पा आणि मुदप्पा हे संगम बंधू होत. या साम्राज्यावर संगम, साळुव, तुळुव आणि अरविडू या राजवंशाच्या राज्यानी येथे राज्य केले. 'वराह' हे विजयनगरचे राष्ट्रचिन्ह होते. कुलदैवत श्रीविरुपाक्ष. 'हिंदूराय सूरत्राण' ही राजाची पदवी आहे.

हरिहर आणि बुक्क विजयनगरचे पहिले दोन राजे होते. हरिहराने हंपी येथे नवीन राजधानी बांधण्यास सुरुवात केली.

हरिहरच्या कारकिर्दीत बहामनी राज्याची स्थापना झाली. तेंव्हापासून विजयनगरचे राजे आणि बहामनी सुलतान यांच्यात वारंवार युद्धे होत असत.

@KTPS NOT TO BE REPUBLISHED

प्रौढदेवराय (दुसरा देवराय सा.श. 1424-1446)

संगम वंशातील प्रसिद्ध राजा प्रौढ देवरायाचा कालखंड विजयनगरच्या साम्राज्यात महत्वपूर्ण कालखंड होता. साम्राज्याची किर्ती सर्वत्र पसरली. साम्राज्यात अंतर्गत समाधान व समृद्धी स्थिरावली. व्यापार बहरला.

प्रौढदेवरायाने सरहद्दीतील नेत्यांचे बंड दाबले. सुलतानांशी लढा दिला आणि साम्राज्याचा विस्तार केला. घोडदळी मोहम्मदांना सैन्यात भरती केले. पर्शियाचा राजदूत अब्दुल रजाक याने "संपूर्ण भारतात प्रौढदेवरायासारखा राजा नाही", असे सांगत "राजाची फौज लाखोंच्या संख्येने आहे" असे म्हटले आहे.

दुसरा देवराय एक सक्षम राजा, शूर योद्धा आणि विद्वान होता. हंपीचे मनमोहक असे हजार रामस्वामी मंदिर यांनीच बांधविले. सर्वधर्म सहिष्णूता ही देवरायांची धर्मनिती होती. यांनी राजधानीत मशिदी बांधविल्या. यांच्या काळात यांनी जैन आणि वैष्णवांची देवालये निर्माण केली. वीरशैव पंथात वाढ झाली. कन्नड आणि संस्कृत भाषेत विपुल अशा साहित्याची रचना झाली.

साळूव वंश (सा.श. 1485-1505)

सा.श. 1485 मध्ये अधिकारावर आलेला साळूव नरसिंह दुर्बल होता त्यामुळे संगम वंशातील तिसऱ्या विरुपाक्षने राजधानी ताब्यात घेऊन 6 वर्षे राज्यकारभार केला.

तुळुव वंश (सा.श. 1505-1567)

साळुव नरसिंहाची मुले असक्षम असल्यामुळे सेनापती असलेल्या तुळुव नरसनायकाच्या अधिपत्याखाली आली. त्याचा 1509 मध्ये मृत्यु झाल्यानंतर त्याचा भाऊ कृष्णदेवराय अधिकारावर आला.

कृष्णदेवराय (सा.श. 1509-1529)

तुळुव वंशाचा राजा कृष्णदेवराय हा एक थोर सम्राट आणि शूर राजा होता. त्याच्या कारकिर्दीत साम्राज्याच्या सीमा उत्तरेला कृष्णा नदीपर्यंत आणि पूर्व, पश्चिम आणि दक्षिणेला समुद्र किनाऱ्यापर्यंत विस्तारल्या होत्या.



कृष्णदेवराय आपल्या पत्नींसह - कांस्यशिल्प

कामगिरी: कृष्णदेवराय एक सक्षम राजा होता. त्याने साम्राज्याच्या कमाईचा एक चतुर्थांश हिस्सा धर्मादाय आणि समाजकल्याणावर खर्च केला. त्यांच्या काळात शेती आणि व्यापार समृद्ध झाला. वस्तू सुध्दा स्वस्त होत्या.

कृष्णदेवराय हे संस्कृत आणि तेलगू या दोन्ही भाषांचे विद्वान जाणकार होते. त्यांनी तेलगूमध्ये 'अमुक्त मौल्यद' आणि संस्कृतमध्ये 'जांबवती कल्याण' या साहित्य कृतीची रचना केली. 'कन्नड-राज्य- रमारमण' ही त्यांची पदवी होती.

रामराया

प्रदीर्घ काळ वैभवशाली राज्य करणाऱ्या विजयनगर साम्राज्याची सत्ता कृष्णदेवरायाच्या मृत्यूनंतर दुर्बल झाली. साम्राज्याला परत वैभवाच्या शिखरावर नेऊन किर्ती मिळवून देण्याचे श्रेय कृष्णदेवरायाचा जावई रामराय याला जाते. तो एक सक्षम सैनिक आणि उत्तम राज्यकर्ता होता.

NOT TO BE REPUBLISHED @KSEBS

रक्कस - तंगडीची लढाई

कारणे: कालांतराने बहामनी राज्य कमकुवत होऊन पाच राज्यांमध्ये विभागले गेले. या राज्यांच्या सुलतानानी रामरायाला त्यांच्या अंतर्गत लढाईत सहभागी होण्यास आमंत्रित केले. रामरायाने याचा फायदा घेतला आणि आपल्या साम्राज्याच्या सीमा कृष्णा नदीच्या उत्तरेपर्यंत वाढवल्या. यामुळे सुलतान त्याच्याशी युध्द करण्यास प्रवृत्त झाले. शिवाय, सुलतानांना विजयनगरच्या समृध्दीचा हेवा वाटत होता. तोपर्यंत लढाईत गुंतलेले सुलतान आपले राजकीय मतभेद विसरून एकत्र आले. त्यांनी विजयनगर विरुद्ध युध्दाची घोषणा केली. या युद्धाला रक्कस तंगडीची लढाई म्हणतात. दक्षिण भारताच्या इतिहासातील ही सर्वात विनाशकारी लढाई होती. कृष्णा नदीच्या काठावरील रक्कसगी आणि तंगडगी या गावांच्यामध्ये युध्दाचे मैदान होते.

वय वर्ष ऐंशी असतानाही रामरायाने सैन्याचे नेतृत्व केले आणि शत्रूचा धैर्याने सामना केला. पहिल्या फेरीत विजयनगरनेच बाजी मारली पण नंतर विरुद्ध बाजूने अचानक आलेल्या तोफांच्या गोळ्यांनी विजयनगरच्या सैन्याला पांगविले. याशिवाय रामरायाच्या मुस्लिम सेनापतींनी त्यांचा विश्वासघात केला आणि आपल्या सैन्यासह शत्रू सैन्यात सामील झाले. रामराया मारला गेला. त्याचे सैनिक रणांगणातून पळून गेले.

रामरायाचा धाकटा भाऊ तिरुमला राजधानीकडे धावला आणि हत्तीवर लादलेल्या अफाट शाही संपत्तीसह आंध्र प्रदेशातील पेनुगोंडा येथे पळून गेला. राजधानीला रक्षक नसल्याने ते शत्रूंच्या हाती पडले. सुलतानांच्या सैन्याने विजयनगरची संपत्ती लुटली. उत्तरार्धात अरविडू घराण्याने पेनूगोंडा, चंद्रगिरी आणि शेवटी वेल्लोर या स्थळांना राजधानी करत अरविडू वंशाचे शासन सा.श. 1646 पर्यंत चालविले.

परिणाम: विजयनगर साम्राज्याच्या ऱ्हासानंतर दक्षिण भारतात अनेक महत्वाचे राजकीय बदल घडले. साम्राज्याचा उत्तरेकडील भाग विजयपूर आणि गोलकोंडा राज्यांचा एक भाग बनला. कर्नाटकात केळदी, म्हैसूर आणि चित्रदुर्ग येथील सरदार स्वतंत्र झाले.

© KBS NOT TO BE REPUBLISHED

प्रवाशांना दिसणारे राजधानीचे वैभव:

राजधानी हंपीला भेट देणारे अनेक विदेशी पर्यटक तेथील भव्यता आणि आर्थिक समृद्धी पाहून मंत्रमुग्ध झाले. त्यांनी त्याची मनापासून प्रशंसादेखील केली.

- पोर्तुगीज प्रवासी डोमिंगो पायीस याने राजधानीबद्दल असे लिहिले आहे "पृथ्वीवर यासारखे दुसरे शहर असू शकत नाही. ज्यामध्ये सर्व प्रकारच्या वस्तूंची विपूलता आहे". मोती, हिरे, माणिक, पाचू, नीलम आणि महागडे कापड इत्यादी विविध प्रकार तेथे सहज उपलब्ध होत असत अशी नोंद त्यांनी केली आहे.
- राजधानीला भेट देणारे पर्शियाचे (इराण) राजदूत अब्दुल रझाक यानी देवरायांच्या उदात्त स्वभावाची प्रशंसा केली. "विजयनगर सारखे दुसरे वैभवशाली शहर डोळ्यांनी पाहिले नाही आणि कानांनी ऐकले नाही" असे ते उद्‌गारले.

समाज अर्थव्यवस्था आणि संस्कृती:

समाज: ग्रामसभेत सर्व जातीच्या सदस्यांना प्रतिनिधित्व दिले जात असे. शहरांमध्ये हंजमान नावाची मुस्लिम संघटना अस्तित्वात होती. त्यांच्या प्रतिनिधींना नगर विधानसभेत उच्च स्थान देण्यात आले.

राणीच्या अंत:गृहात स्त्रिया हिशोब करणे, द्वारपालचे काम करणे, राजाराणींची सेवा करणे इत्यादी कामे करत. सार्वजनिक प्रदर्शन भाग घेणाऱ्या महिला कुस्तीपट्टू विजयनगरात होत्या. राजधानीत महानवमीच्या पार्श्वभूमीवर लोकप्रिय असणारा नवरात्री उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जात होता.

अर्थव्यवस्था: शेती हा बहुतांश लोकांचा व्यवसाय होता. विजयनगर हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे केंद्र होते. जगभरातून अनेक व्यापारी येथे येत असत. दुकानांमधून मोती व रत्ने राशींनी विकली जात असत असे वर्णन विदेशी पर्यटकांनी केले आहे. साम्राज्याच्या पश्चिम आणि पूर्व किनारपट्टीवरील विविध बंदरामधून वस्तूंची आयात व निर्यात केली जात असे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

धर्म: सर्व धर्मांना साम्राज्याकडून प्रोत्साहन मिळाले. राज्यकर्त्यांनी लोकांना कोणत्याही अडथळ्याशिवाय त्यांच्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य दिले होते. विजयनगरात मुस्लिमांसाठी मशिदी बांधल्या. त्यांना सैन्यात दाखल केले गेले. पोर्तुगीजांसोबत व्यापार वृद्धी करणाऱ्या विजयनगरच्या राज्यकर्त्यांनी ख्रिश्चन धर्मालाही प्रोत्साहन दिले.

साहित्य: विजयनगर साम्राज्याच्या काळात संस्कृत, तेलगू आणि कन्नड साहित्य समृद्ध झाले. कन्नडमधील श्रेष्ठ कवी कुमारव्यास, चामरस आणि रत्नाकरवर्णी हे याच काळातील होत. विजयनगरचा काळ हा तेलगू साहित्यासाठी 'सुवर्णकाळ' होता.

कुमारव्यास (नारणप्पा) हे रसभरित भावनांचे कवी होते. त्यांनी 'कर्नाटक भारत कथा मंजिरी' लिहिली. चामरसाचे 'प्रभूलिंगलीले' हे अल्लमप्रभूंचे चरित्र आहे. हे एक उल्लेखनीय कार्य आहे. रत्नाकरवर्णी यांचे 'भरतेश वैभव' हे आकर्षक शैलीत लिहलेले साहित्य आहे.

संगीत: विजयनगर सम्राटांनी नृत्य, चित्रकला आणि संगीत यांना विशेष प्रोत्साहन दिले. 'कर्नाटक संगीत' हे नाव त्या काळापासून दक्षिण भारतीय संगीत प्रणालीसाठी वापरले जाऊ लागले. संतांनी भक्तीचा मार्ग सांगण्यासाठी संगीताचा वापर केला. या मार्गाला 'दासपंथ' असे संबोधले जाऊ लागले. दासांमध्ये पूरंदरदास आणि कनकदास हे प्रमुख होते.

लाखो किर्तनांची रचना करणारे पुरंदरदास 'कर्नाटक संगीताचे पितामह' ठरले. कनकदास हे सामान्य कुटुंबात जन्माला आलेले कवी. 'मोहन तरंगिणी', 'रामधान्य चरित्र', 'नळ चरित्र' आणि 'हरिभक्तीसार' ह्या त्यांच्या प्रमुख कृती होत.

कृती: कर्नाटकात भक्तीपंथाचा प्रचार करणाऱ्या हरिदासांबद्दल अधिक माहिती गोळा करा आणि सुमारे एक पानाचा निबंध तयार करा.

शिल्पकला: विजयनगर काळात इमारतींच्या बांधकामात ग्रॅनाइटचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असे. दक्षिण भारतातील सर्व मंदिरांसाठी उंच मनोरे (राया - गोपूर) आणि सुंदर कल्याण मंटप बांधले गेले. अशा शेकडो वास्तूंच्या बांधकामामुळे हजारो लोकांना रोजगार मिळाला.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

हंपी: हंपीमध्ये अनेक सुंदर मंदिरे आहेत. हजार रामस्वामी मंदिर, विजय विठ्ठलस्वामी मंदिर, कृष्णस्वामी मंदिर आणि अच्युतराय मंदिर ही त्यापैकी काही आहेत. जेव्हा विठ्ठल मंदिराच्या लहान खांबाना थाप मारली जाते तेव्हा आपल्याला संगीताचे सात सूर ऐकू येतात.



हजार रामस्वामी मंदिर, हंपी

- शृंगेरीचे विद्याशंकर मंदिर, रामेश्वरचे हजार स्तंभ असणारे मंदिर आणि मुडबिद्री (त्रिभुवन तिलक चुडामणी) चे हजार स्तंभ असलेली बसदी हे विजयनगर काळातील आहेत.



विद्याशंकर मंदिर, शृंगेरी

© KTBS NOT TO BE REPUBLISHED


एकशिला शिल्पकला: याच काळात भव्य एकशिला मूर्ती तयार करण्याची शैली प्रचलित झाली. हंपीमधील त्या प्रकारची शिल्पे- सासिवेकाळू गणेश (मोहरीचा गणपती), कडलेकाळू (वाटाणा) गणेश आणि लक्ष्मी नरसिंह. विठ्ठलस्वामी मंदिरासमोरील एकशिला रथ अतिशय सुंदर आहे. हे गरुडाचे देवालय आहे. कारकळ आणि वेण्णूर येथील बाहुबलीच्या अखंड मूर्ती शिल्पकलेच्या उत्कृष्ट कौशल्याची साक्ष देतात.



सासिवेकाळू गणेश
(मोहरीचा गणपती), हंपी



लक्ष्मी नरसिंह, हंपी



दगडी रथ, हंपी

बहामनी राज्य

विजयनगर साम्राज्याच्या समकालीन असलेल्या बहामनी साम्राज्याची स्थापना सा.श. 1347 मध्ये झाली. दक्षिणेला कृष्णा नदीपर्यंत राज्याची सीमा होती. प्रारंभी कलबुरगी, त्यानंतर बिदर ही त्यांची राजधानी होती. या साम्राज्याचा संस्थापक अल्लाऊद्दीन हसन गंगू बहामन शहा हा होय.

बिदर शहर हे कर्नाटकाच्या उत्तरेकडील भागात वसलेले ऐतिहासिक ठिकाण आहे. सुमारे शतकभर बहामनी सुलतानांची राजधानी म्हणून त्याची भरभराट झाली. पुढील चित्रात बिदरचा भव्य किल्ला पहा.

© MTB NOT TO BE REPUBLISHED



किल्ला, बिदर

बहामनी राज्याचा नकाशा पहा. त्यात आधुनिक कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश या राज्यांचा समावेश होता.

बहामनी आणि विजयनगर ही शेजारची राज्ये आहेत. बहुतेकदा त्यांच्यात अंतर्गत संघर्ष चालूच असायचा.

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

फिरोजशाह

बहामनी वंशातील श्रेष्ठ राजा फिरोजशहा हा होय. हा न्यायवादी, उदार आणि देवभक्त होता.

लेखक म्हणून बहुभाषा विद्या पारंगत प्राप्त फिरोजला भूमिती आणि धर्मशास्त्राची माहिती होती. त्याने दौलताबाद (महाराष्ट्र)येथे आकाश निरीक्षण केंद्राची स्थापना केली. याने राजधानी कलबुर्गीचे सौंदर्य वाढविले. शिवाय आपल्या नावाने भिमा नदीच्या काठी 'फिरोजाबाद' नावाच्या नवीन नगराची निर्मिती केली. याच्या काळात राज्यात आलेल्या सुफीसंत बंदेनवाज यांना काही गावे इनाम म्हणून दिली. बंदराच्या विकासाला विशेष प्राधान्य दिले. यांच्यापासून विदेशी व्यापारास प्रोत्साहन मिळाले.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

महंमद गवान

बहामनी राज्याच्या इतिहासात इतर सुलतानापेक्षा जास्त प्रसिद्धी महंमद गवान यांना मिळाली. मूळतः पर्शियन असलेल्या तिस-या महंमदने सुलतानाचा प्रधानमंत्री म्हणून निस्वार्थ सेवा बजावली.

कामगिरी

- गवान युद्धनिपूण असल्याकारणाने साम्राज्याचा विस्तार केला.
- राज्याचा कारभार इस्लाम नियमांना अनुसरून होता.
- त्याने महसूल आणि पोस्ट कचेरी उत्तमरित्या चालविल्या.
- त्याने जमिनीचा कर, जमिनीचे उत्पन्न आणि पाण्याची सुविधा यावर आधारित कर ठरविला होता.
- लोकांना त्रासदायक असलेले कर रद्द केले.
- स्वतः विद्वान असलेल्या महम्मद गवानने बिदरमध्ये मदरसा (महाविद्यालय) स्थापन केली. त्याने इस्लाम धर्म आणि कायदा शिक्षणाला प्रोत्साहन दिले.
- येथे खगोल शास्त्र, गणित, इतिहास इ. अध्ययन चालू होते.
- विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण आणि विद्यार्थी वसतीगृहांची सोय होती.
- मदरसांच्या ग्रंथालयामध्ये सुमारे 3000 हस्तपुस्तके होती.

एकूणच बहामनी राज्याचा महंमद गवान हा श्रेष्ठ राज्यकर्ता होता. एवढे असूनसुद्धा राज्याचे सरदार गवानच्या कार्याबद्दल मत्सर वाटून घेत होते. आतमध्ये चाललेला हा कलह शेवटी त्याच्या मृत्यूला कारणीभूत ठरला. गवानच्या समाधीवर 'निस्वार्थी गवानचा खून झाला' असा उल्लेख आहे.

महमंद गवान नंतर अधिकारासाठी अंतर्गत कलह होऊन राज्याचे विभाजन झाले. नवीन पाच शाही घराणी उदयास आली.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ती पाच राज्ये म्हणजे:

- विजापूरची आदिलशाही
- बीदरची बरीदशाही,
- गोवळकोंड्याची कुतुबशाही
- अहमद नगरची निजामशाही
- विरारची इमद शाही

यांपैकी पहिल्या दोन राज्यांच्या राजधान्या कर्नाटकात होत्या.

समाज: बहामनी राज्य इस्लामिक कायद्याने चालत होते. सुलतान हा फक्त प्रशासनाचा प्रमुख नसून मुख्य न्यायाधीश, सैन्य प्रमुख आणि धार्मिक प्रमुख देखील होता. त्याला पृथ्वीवरील देवाचा प्रतिनिधी मानले गेले.

प्रशासनातील बहुतांश उच्च पदांवर मुस्लिमांची नियुक्ती केली जात होती. अधिकाऱ्यांना जहागीरी (जमिनीची भेट) देण्यात येत होती. हिंदू जहागीरदार संख्येने कमी होते.

पारंपरिक हिंदू प्रथेनुसार जमिनीच्या उत्पन्नाचा एक षष्ठांश भाग कर म्हणून सुलतान जमा करत असे. तांदूळ, गहू, जोंधळा आणि डाळी हे प्रमुख आहार धान्य होती.

राजघराण्यातील सदस्य आणि सरदार आनंदी जीवन जगत होते. सर्वसामान्यांची परिस्थिती चांगली नव्हती. राज्यात जैन आणि ख्रिश्चन समुदाय देखील होते. सुफी संप्रदाय खूप शक्तीशाली होता.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

बहामनी राज्याचे सांस्कृतिक योगदान

साहित्य: बहामनी सुलतानाने परदेशी विद्वानांना राजाश्रय दिला होता. यांच्या काळात पर्शियन, अरेबिक, ऊर्दू साहित्याचा विकास झाला. बंदेनवाज नावाचे प्रसिद्ध सूफी संत आणि ग्रंथकार या काळातीलच होते. यांनी आणि विदेशी विद्वांनानी विकसित केलेली भाषा 'दख्खनी' म्हणून प्रसिद्ध होती. पुढे हीच भाषा उर्दू भाषेच्या विकासासाठी कारणीभूत ठरली.

वास्तूशिल्प: बहामनीचा इतिहास हा वास्तुशिल्प कलेसाठी प्रसिद्ध आहे. त्यांनी कलबुर्गी, बिदर आणि इतर ठिकाणी बांधलेल्या इमारतीत हिंदू-मुस्लिम शैली दिसून येते. ही 'दख्खनी शैली' म्हणून परिचीत आहे. बहामनीनी निर्माण केलेली पहिली इमारत म्हणजे कलबुर्गीची 'जामा मशीद' होय. ही महमद शहा यानी बांधली. लहान लहान घुमटानी बांधलेले येथील सभांगण आकर्षक आहे. कलबुर्गीच्याजवळ सुलतानाची समाधी आहे. ती मोठ्या आकाराची समाधी आहे. बंदेनवाज समाधी ही आणखी एक होय. बिदरची सोळाखांब मशीद आणि किल्ल्याच्या आतील सुंदर राजमहल प्रसिद्ध आहे. या इमारती अलंकारिक, शिल्पकृती,लाकडाचे कोरीव काम यांनी सज्ज आहेत. बिदरच्या जवळ असलेल्या अष्टुरच्या बारा समाधी सुंदर आहेत. बहामनी काळातील अत्यंत प्रमुख कृती म्हणजे गवानची मदरसा होय. त्याची लांबी 76 मी. (250फूट) असून 3 मजली अशी रचना आहे. मदरसाच्या आत असणारी मशीद अजूनही सुस्थितीत आहे. पाच शतकांच्या अगोदरची मदरसा इमारत आपला मागील इतिहास आजही सांगते.



गवानचा मदरसा, बिदर

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

विजयपूरची आदिलशाही


शाही घराण्यापैकी विजयपूरची आदिलशाही प्रमुख होती. आदिलशाहीने कर्नाटकमध्ये दोन शतके इतका काळ राज्य केले.



इब्राहिम रोजा, विजयपूर

दुसरा इब्राहिम: दुसरा इब्राहिम हा विजयपूरच्या श्रेष्ठ सुलतानापैकी एक होय. यांच्या काळात राज्याच्या नुसत्या सीमाच वाढल्या नाहीत तर समृद्धीही वाढली होती. व्यापार आणि आर्थिक व्यवहार वाढले होते. इब्राहिम हा धर्मसहिष्णू होता. त्यांनी अनेक हिंदू विद्वानांना, कवीना तसेच संगीतकारांना राज्याश्रय दिला होता. स्वतःच्या राजमहलातील दत्त मंदिराची दुरुस्ती करून पूजेची व्यवस्था केली. हिंदू-मुस्लिम सांस्कृतिक एकतेसाठी इब्राहिमने बरेच श्रम घेतले. 'किताब-इ-नवरस' नावाचे एक उर्दू पुस्तक लिहिले. तसेच हिंदू संगीत मुसलमानामध्ये लोकप्रिय करण्यासाठी प्रयत्न केले. या संगीताच्या कृती हिंदू देवता सरस्वती, गणपती, भैरव इत्यादीच्या स्तुती पासून सुरु होतात. तो स्वतः एक उत्तम संगीतकार होता. भव्य इमारत 'इब्राहिम रोजा' यांनीच बांधली.

इब्राहिमचा उत्तराधिकारी असणाऱ्या महम्मद अदीलशहाने विजयपूरमध्ये अद्‌भूत अशा 'गोलघुमटची' निर्मिती केली. 'असर महल' ही त्यांची आणखी एक सुंदर कलाकृती आहे.



गोलघुमट, विजयपूर

महम्मद अदिलशहा नंतर विजयपूरचे राज्य दुबळे बनले. दक्षिण भारतातील मोगलांची आक्रमणे व विजयपूर राज्याला मराठ्यांनी दिलेला प्रतिकार ही यामागची कारणे होत. औरंगजेबाने विजयपूर ताब्यात घेतल्यावर आदिलशाही राजवट संपुष्टात आली.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

वास्तुशिल्प

कर्नाटकाच्या वास्तुशिल्प इतिहासात आदिलशाही वास्तूना महत्वाचे स्थान आहे. त्यांच्या रचना- राजवाडे, किल्ले, मशिदी आणि थडगी.

- **विजयपूरचा किल्ला** - ही एक भव्य कलाकृती असून यांस 96 बुरुजे आहेत व 6 मुख्य प्रवेशद्वार आहेत. राजवाड्यांपैकी **'गगनमहाल'** भव्य आहे. **असर महालात** रंगीबेरंगी चित्रे असणाऱ्या खोल्या आहेत.
- विजयपूर येथील जुम्मा मशिद आकर्षक आहे.

आदिलशाही वास्तूंमध्ये समाधीच्या कलाकृती अत्यंत प्रभावी आहेत. इब्राहिम रोजा या दुहेरी संरचनेत एक इमारत मशीद आणि दुसरी कबर आहे. रोजाचे वर्णन दख्खनचे ताजमहाल असे केले जाते. रोजापेक्षाही उत्तम रचना करण्यासाठी महम्मद अदिलशहाने गोलघुमट या समाधी मंदिराची रचना केली. त्यांच्या संरचनेच्या म ध्यभागी एक प्रचंड घुमट आहे. घुमटाच्या आत आवाजाची गॅलरी आहे. आवाजाची पुनरावृत्ती करण्याच्या घुमटाच्या वैशिष्टामूळे आधुनिक वास्तूविशारद आश्चर्यचकित झाले आहेत. गोलघुमट ही जगातील चौथ्या क्रमांकाची व भारतातील सर्वात मोठी रचना आहे. हे जगातील वास्तुशास्त्रातील आश्चर्यांपैकी एक आहे.

कालगणना (सा.श.)

विजयनगर

विजयनगर साम्राज्याची स्थापना	- सा.श. 1336
साम्राज्याच्या कारकिर्दीचा काळ	- सा.श. 1336 - सा.श. 1646
कृष्णदेवरायाचा काळ	- सा.श. 1509 - सा.श. 1529
रक्कस तंगडीची लढाई	- जानेवारी 23, 1565

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

बहामनी

बहामनी राज्याचा काळ	- सा.श. 1347 - सा.श. 1489
बिदरमध्ये मदरशाची स्थापना	- सा.श. 1461
आदिलशाहीचा काळ	- सा.श. 1489 - सा.श. 1686
इब्राहिम रोजाची निर्मिती	- सा.श. 1626
गोलघुमटाची निर्मिती	- सुमारे सा.श. 1650

नवीन शब्द

फकीर - मुस्लिम साधू

बुरुज - वाड्यावर बांधलेला घुमट

फारसी - पर्शियन देशाची भाषा

दख्खन - दक्षिण भारतीय प्रदेश

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. विजयनगर साम्राज्याचे प्रतिक _____
2. बहामनी साम्रज्याचा संस्थापक _____
3. कर्नाटक संगीत पितामह असे _____ यांना म्हणतात.
4. गोलघुमट _____ शहरामध्ये आहे.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

5. आदिलशाही राजांपैकी श्रेष्ठ राजे कोण होते?
6. गोलघुमट का प्रसिद्ध आहे?

7. विजयनगर राजांपैकी सर्वात श्रेष्ठ सम्राट कोण होता?
8. हंपीची मुख्य मंदिरे कोणती?
9. कुमारव्यासांच्या कृती कोणत्या?
10. कृष्णदेवरायांच्या कृती सांगा.
11. विजयनगरला भेट दिलेल्या विदेशी पर्यटकांची नावे सांगा.



उपक्रम:

- बहामनी राज्य व आदिलशाहीच्या वास्तूशिल्पांच्या चित्रांचा विवरणासहीत संग्रह करा व अल्बम तयार करा.
- भारतात असणाऱ्या हिंदू, ख्रिश्चन आणि मुस्लिम संस्कृतीच्या खूणा असणारे मंदिर, चर्च आणि मशीद तसेच इतर स्मारकांच्या चित्रांचा संग्रह करा व एक अल्बम तयार करा.
- पुरंदरदास आणि कनकदासांची एक दोन किर्तने तसेच 'गदुगिण भारत' या पद्याच्या चार ते पाच ओळींचा संग्रह करा व गटाने म्हणा.
- कर्नाटकातील भक्ती पंथातील हरीदास यांच्या शिकवणीचा संग्रह करा तसेच त्यांच्याबद्दल एक पान निबंध लिहा.
- विजयनगर साम्राज्याच्या प्रमुख स्मारकांच्या चित्रांचा संग्रह करा व विवरण लिहा.
- हंपी येथे शैक्षणिक प्रवासाचे आयोजन करा प्रवासानंतर तुमचा अनुभव निबंध रूपात लिहा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 15 मोगल आणि मराठे

T1F9P2

पाठाचा परिचय

बाबरने सा.श. 1526 मध्ये भारतावर आक्रमण करून दिल्लीच्या सुलतानांची सत्ता संपविली आणि मोगल साम्राज्याची स्थापना केली. या पाठामध्ये अकबर आणि औरंगजेबाच्या कारकिर्दीविषयी माहिती देण्यात आली आहे. तसेच मोगलांचा राज्यकारभार आणि सांस्कृतिक योगदानांची माहिती दिलेली आहे. शेवटी या साम्राज्याच्या ऱ्हासाला कारणीभूत असलेली कारणे सांगितली आहेत. एकूणच हा दोन शतकांचा काळ प्रमुख राजकीय शक्ती म्हणून मोगलांनी मिरवला. साहित्य आणि कला क्षेत्रामध्ये यांचे योगदान याविषयी माहिती दिलेली आहे.

या पाठात शिवाजी महाराज यांचे बालपण, त्यांचे आदर्श, 'व्यक्तीमत्व' मोगल साम्राज्य आणि विजयपूर राजांच्या पराभवाच्या कथा, मराठा साम्राज्याची स्थापना, राज्यकारभार यांची माहिती दिली आहे.

सामर्थ्ये

1. अकबरांची उदारनिती आणि कामगिरी समजून घेणे.
2. औरंगजेबाची संकुचित वृत्ती, देशातील बंड आणि ऱ्हासाला कशी कारणीभूत झाली ते समजून घेणे.
3. साहित्य आणि कलेमध्ये मोगल सम्राट कसे श्रीमंत होते, हे जाणून घेणे.
4. मोगल साम्राज्यातील ऐतिहासिक स्थळे नकाशावर ओळखणे.
5. शिवाजी महाराजांचे जीवन, साहसी गुण आणि त्यांचे कार्य समजून घेणे.
6. नकाशात शिवाजी महाराजांच्या संबंधित ऐतिहासिक स्थळे ओळखणे.

© KSBS NOT TO BE REPUBLISHED

हे स्मारक तुम्ही ओळखता का?



ताजमहल, आग्रा

हा जगप्रसिद्ध ताजमहल आहे. संगमरवरी दगडापासून रचना केलेले हे भव्य वास्तूशिल्प मोगलांची सर्वात मोठी देणगी आहे.

बाबर हा मोगल घराण्याचा संस्थापक होता. सुरुवातीला त्याने अफगाणिस्तानच्या काबूल या छोट्या प्रदेशावर राज्य केले होते. समृद्ध अशा भारतावर आक्रमण करण्याची तो वाटच पहात होता.

बाबर हा मंगोल वंशाचा होता. मोगल शब्दाची उत्पत्ती 'मंगोल' या शब्दापासून झाली आहे. बाबरने भारतात गुलाबाची ओळख करून दिली.

दिल्लीचे सुलतान दुर्बल झाल्यामुळे बाबरने दिल्लीवर आक्रमण करून तो भाग आपल्या अधिपत्याखाली आणला. तरी तो यावरच समाधानी झाला नाही. कारण येथील रजपूत आणि अफगाण राजांनी त्याला प्रबळपणे विरोध केला. बाबर एक शूर योध्दा होता. आपल्या युद्धकौशल्य आणि उत्तम शस्त्रास्त्रांच्या जोरावर विरोधकांना धैर्याने तोंड देऊन पळवून लावले.

बाबरने दिल्ली, आग्रा आणि आजुबाजूचा प्रदेश तीन युद्धामध्ये जिंकून आपले साम्राज्य स्थापन केले, पण तो अल्पावधीतच मरण पावला. त्यानंतर त्याचा मुलगा हुमायून गादीवर आला.

© KEBS NOT TO BE REPUBLISHED

हुमायुन: हुमायुनने सुरुवातीला आपल्या शत्रूंना युद्धात हरविले पण अफगानचा सरदार शेरशा सुरी याच्याकडून त्याला पराजय स्वीकारावा लागला. राज्य गमावल्यानंतर त्याने पर्शियाला पलायन करून तेथे 15 वर्षे वास्तव केले. अफगाण दुर्बल झाल्यावर हुमायूनने पुन्हा भारतावर आक्रमण करुन दिल्ली ताब्यात घेतली. पण तो अल्पशा कालावधीतच मरण पावला.

अकबर: हुमायूनचा मुलगा अकबर हा भारतावर साम्राज्य स्थापन्याची आकांक्षा घेऊनच भारतात आला होता. त्यासाठी त्याने रजपूत राजाना स्वत:ला मदत करण्यास सांगण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी काहीनी अकबरला साथ दिली. परंतु मेवाडचा राजा राणा प्रतापसिंह याने अकबरला विरोधच केला. तो स्वाभिमानी तसाच महाशूरही होता. पुढे त्याच्याबरोबरच अकबरचे हळदीघाट (राजस्थान) येथे महाभयंकर युद्ध झाले. या युध्दात राणा प्रतापसिंहाचा पराभव झाला तरीसुद्धा शेवटच्या क्षणापर्यंत त्याने आपली मान खाली वाकवली नाही.



अकबर

© MTBS NOT TO BE REPUBLISHED



राणा प्रतापसिंह

चेतक नावाच्या आपल्या आवडत्या घोड्यावर बसलेल रणांगणावर लढणारा भव्य अश्वारूढ कास्यपुतळा देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हळदी घाट येथे स्थापन करण्यात आला. अशा स्वदेशाभिमानी राणा प्रतापसिंहानी भारतीयांचे लक्ष वेधले आहे.

अकबराने पुढे अनेक वर्षांचा काळ सैनिकांच्या संगतीत घालविला. त्याचा परिणाम म्हणून गुजरात, बंगाल, काश्मीर, काबूल इ. प्रदेश जिंकून मोठ्या साम्राज्याची स्थापना केली.


अकबराची कामगिरी

राज्यकारभार: अकबर हा उत्तम राज्यकर्ता तसेच विशाल अंतकरण असलेला राजा होता. उत्तम राज्य चालविण्यासाठीचे सर्व चांगले गुण त्याच्याकडे होते. तो क्रुर राज्यकर्ता नव्हता. बहुसंख्य प्रजा हिंदू असल्याने त्यांची मने जिंकणे आवश्यक असल्याची जाणिव त्यांना होती. हिंदूना उच्च पदे दिली. मंगोल मुस्लिम राज्य कर्त्यांनी हिंदूवर लादलेला 'जिसिया' (जिझिया) कर तसेच यात्रा कर रद्द केला. अकबराने गोहत्या तसेच सती पद्धत बंद केली. बालविवाहाला विरोध केला. अकबराची भू-कर पद्धत सर्वसामान्यांना आवडली होती. भू- कर पध्दत (महसूल पध्दत) राजा तोडरमल या मंत्र्याने शोधून काढली व यशस्वीपणे राबविली.

धार्मिक निती: अकबर हे धार्मिक सहिष्णू होते. स्वत:ची नवीन राजधानी फत्तेपूर सिक्री येथे इबादत खाना नावाचे एक प्रार्थना मंदिर बांधले. तेथे मुस्लिम पंथातील प्रमुखाबरोबर धार्मिक विचारांची चर्चा केली. हिंदू, जैन, बौध्द, पारसी, ख्रिश्चन इत्यादी धर्म प्रमुखांना येथे बोलावून त्यांचे विचार समजून घेत असे. या चिंतनाचे फळ म्हणजे अकबराने 'दिन-ए-इलाही' नावाचा नवा पंथ स्थापन केला. त्यामध्ये सर्व धर्मातील उत्तम अंशाचा स्विकार केलेला होता. परंतु केवळ हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या लोकांनी त्याचा स्विकार केला.

कृती: दिन-ए-इलाही पंथाचा स्थापना झाली पण त्याची लोकप्रियता वाढली नाही. चर्चा सत्र आयोजित करून माहिती गोळाकरा.

© BTBS NOT TO BE REPUBLISHED



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कलेचे पोषण: अकबराने साहित्य कलेला प्रोत्साहन दिले. फैजी अबुल फजल आणि बिरबल हे त्यांच्या दरबारी असलेले श्रेष्ठ कवी होत. अमर संगीतकार तानसेन त्यांच्या दरबारातील शोभा वाढवत असे. वास्तूशिल्प आणि चित्रकलेलाही अकबराने दिलेले प्रोत्साहन कौतुकास्पद आहे.

अकबरानंतर आलेल्या जहाँगीर आणि शहाजहानने त्यांची बरीचशी निती अवलंबली होती. शहाजहानने आग्रा येथील प्रसिद्ध ताजमहाल, दिल्लीचा प्रसिद्ध लाल किल्ला, आणि भव्य राजमहल बांधून प्रसिद्धी मिळविली.

औरंगजेब: शहाजहानचा मुलगा औरंगजेब हा शेवटचा प्रसिद्ध मोगल सम्राट होय. त्याने 50 वर्षांचा सुदीर्घ काळ राज्यकारभार केला. साम्राज्याचा अधीक विस्तार केला. तरीसुद्धा त्याचा फार लवकर शेवट झाला.

धार्मिक धोरणे: औरंगजेब हा संप्रदायवादी मुसलमान होता. तो मद्यपान द्यूत व संगीतापासून दूर होता.

औरंगजेबाने अकबराची उदारनिती सोडून दिली. 'जिझिया कर' पुन्हा लावला. त्यांनी हिंदूच्या यात्रा, शिकवणी व चालीरितींचा निषेध केला. त्याच्या हुकूमाने अनेक मंदिरे उध्वस्त झाली. या कृतीमूळे राजकीय अस्थिरता पसरली.

शीखांचे दंगे: औरंगजेबाच्या धार्मिक धोरणाने शीख, मराठा आणि जाटरसुद्धा भडकले. शीख गुरु तेज बहादूर यांची दिल्ली येथे क्रूरपणे हत्या करण्यात आली. त्यांचा मुलगा गुरु गोविंद सिंग यांने संपूर्ण शीख समुदायाला वीरदिक्षा दिली. दिक्षा घेतलेल्याना सिंग (सिंह) असे संबोधण्यात आले. ते पंच 'क' चे पालन करायचे 'क' म्हणजे केश (लांब केस) कंगा (कंगवा) कृपाण (हत्यार) कच्छे (छोटी विजार) आणि कंकण (लोखंडाचे कड) वापरत असत. हे आचरण शीखामध्ये आजही आहे.

NOT TO BE REPUBLISHED © KSBS

दंगे: उत्तर भारतामध्ये शीख आणि रजपूतानी औरंगजेबाचा कडाडून विरोध केला. दक्षिणे मध्ये शिवाजी महाराजांनी बंड पुकारले. ही भांडणे (दंगे) दिर्घकाळ चालत राहिल्याने औरंगजेबाची सत्ता, संपत्ती, सैनिक आणि राज्याचा बराचसा भाग त्याला गमवावा लागला. त्यामुळे त्याची प्रतिष्ठा कमी झाली. साम्राज्याचे बरेच प्रदेश स्वतंत्र झाले. दख्खनच्या युद्धात तो आर्थिक आणि दैहिकरित्या बराच खचला होता. त्यामुळे तो दख्खनमध्येच मरण पावला. याच्या अस्ता बरोबरच मोगलांची राज्यावरची पकड कमी झाली.



गुरू गोविंदसिंह



सुवर्ण मंदिर, अमृतसर

मोगलांचा राज्यकारभार: मोगल सम्राटाकडे सर्व नागरिक तसेच सैनिकी अधिकार होते. न्यायदान करताना यांचा निर्णय हा अंतिम असायचा.

साम्राज्याचे प्रांत (सुभा), जिल्हा (सरकार) आणि तालुका (परगणा) असे भाग होते. नगरामध्ये कोतवाल नावाचा अधिकारी कायदा आणि सुव्यवस्था पहायचा.

महसूल पद्धत: अकबराचा मंत्री राजा तोडरमलने भू- कर पद्धत ठरविली होती. त्यामुळे पिकाऊ जमिनीच्या आधारावर महसूल जमा केला जायचा.

सांस्कृतिक देणग्या

साहित्य: मोगलांनी पर्शियन साहित्याला विशेष प्रोत्साहन दिले. अकबराच्या दरबारात अबुल फजल, निजामुद्दीन आणि बदौनी नावाचे प्रसिद्ध इतिहासकार होऊन गेले. अकबरनामा ही अबुल फजल ची मुख्य कृती होय. मोगल राजकुमार 'दारा शुको' श्रेष्ठ विद्वान होता. त्याने भगवत गीतेचे भाषांतर केले. हिंदी साहित्यालाही राजाश्रय मिळाल्याने ती समृद्ध झाली. 'रामचरित मानस' ही तुलसीदासांची प्रमुख कृती याच काळात तयार झाली.

वास्तुशिल्प: दिल्ली मधील हुमायूनची समाधी अकबराच्या सुरुवातीच्या काळातच बांधण्यात आली. त्याने फत्तेपूर सिक्री (आग्रा जवळ) येथे नवीन राजधानी निर्माण केली. राजधानीत भव्य असे राजमहल, मशिदी आणि मंटप देश विदेशातील प्रवाशांना आकर्षित करतात. येथील जामा मशिदीचे प्रवेशद्वार (बुलंद- दरवाजा) भारतामध्ये अती उंच असून त्याची उंची 40 मी. इतकी आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



हुमायूनची समाधी, दिल्ली

'मोतीमहल' हा आग्रा किल्ल्याच्या आत शहाजहानने बांधलेला एक भव्य राजवाडा आहे. त्याची राणी मुमताज हिच्या स्मरणार्थ ताजमहल बांधण्यात आला. ताजमहल हा मोगल वास्तुशिल्प कलेचा अद्‌भूत नमुना आहे. दिल्लीचा प्रसिद्ध लाल किल्ला शहाजहाननेच बांधला.

@KTRS TO BE REPUBLISHED



किल्ला, आग्रा



लाल किल्ला, दिल्ली

चित्रकला: मोगलांच्या काळात नवीन चित्रकला संप्रदाय जन्माला आला. त्याला 'चिकणी' असे म्हणतात. अकबराच्या दरबारात शंभरपेक्षा जास्त चित्रकार होते. जहांगीरच्या आश्रया खाली चित्रकला परिपक्व झाली. मात्र संप्रदायवादी असलेल्या औरंगजेबाने चित्रकलेला प्रोत्साहन दिले नाही.

संगीत: अकबराच्या काळात संगीत कलेला प्रोत्साहन देण्यात आले. त्या काळातील संगीतकारांचे सात भागात विभागणी करून गट तयार केले होते. दिवसाला एक गट अशाप्रकारे संगीत सभा चालवली जायची. 'तानसेन' हा अकबराच्या काळातील अमर संगीतकार होता. जहाँगीर तसेच शहाजहानच्या काळात सुद्धा संगीताला प्रोत्साहन मिळाले. तरीसुध्दा औरंगजेबाने संगीताचा निषेध केला, पण लोकांच्या हृदयातील संगीताची आवड मात्र कमी करू शकला नाही.

मोगल साम्राज्याचा ऱ्हास

औरंगजेबाच्या काळात मोगल साम्राज्य दुर्बल झाले. त्याची काही कारणे खालील प्रमाणे आहेत.

- सरदार भ्रष्ट झाले होते.
- सिंहासनाचा उत्तराधिकारी होण्यासाठी बराच अंतरकलह माजला होता.
- प्रांताधिकाऱ्यांनी याचा फायदा उठवत स्वतंत्र राज्यकारभार सुरू केला.
- सर्वात मुख्य कारण म्हणजे भारताचे इस्लाम धर्माच्या राज्यात परिवर्तन करण्यास औरंगजेबाला सर्व थरातून कडाडून विरोध झाला.
- शीख, रजपूत आणि मराठ्यांबरोबर दीर्घकाळ सुरु असलेल्या संघर्षामुळे साम्राज्याची शक्ती कमी झाली.
- या काळात नादीरशहा नावाच्या पर्शियन राजाने दिल्लीवर आक्रमण केले. त्या लढाईत त्याचा विजय झाला. मोगलांनी 200 वर्षापासून जमा केलेली धनसंपत्ती त्याने लुटली. जगप्रसिद्ध कोहीनूर हिरा आणि शहाजहानचे 'मयूरसिंहासन' तो घेवून गेला. मोगलाचा खजिना त्याने रिकामा केला.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

मराठे

छत्रपती शिवाजी महाराज

उत्तर भारतातील मोगलांच्या पराकोटीच्या काळामध्ये दख्खन प्रदेशात मोगलांच्या विरोधात मराठे सत्तेवर आले. मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज हे होय.



छत्रपती शिवाजी महाराज

शिवाजीचे बालपण

शिवाजी महाराजांचा जन्म पुण्याजवळील शिवनेरी किल्ल्यावर झाला. शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे भोसले हे विजयपूरच्या आदिलशहाच्या दरबारात सरदार या उच्च पदावर होते. त्यामुळे शिवाजीचे पालन पोषण आई जिजाबाई यांनी केले. रामायण, महाभारत इत्यादी, काव्यपुराणातील वीरकथा आपल्या मुलाला सांगून त्याच्यामध्ये धर्मरक्षण, देशाभिमान इ. मनोभावना रुजविल्या. गुरु दादोजी कोंडदेव व तानाजी मालुसरे यांनी शिवाजी महाराजांना युद्धकला, शस्त्रास्त्र विद्या शिकविली. प्रारंभी शिवाजी महाराजांनी मराठ्यांना व पश्चिम घाटातील मावळ्यांना एकत्रित जमवून त्यांना गनिमी युद्धनितिचे शिक्षण देवून आपले मावळे तयार केले.

NOT TO BE REPUBLISHED © MSBSHSE

शिवाजी महाराजांची कामगिरी: शिवाजी महाराजांनी वयाच्या 19 व्या वर्षी विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यात असलेला तोरणा किल्ला जिंकून घेतला. त्यानंतर रायगड, सिंहगड, प्रतापगड इत्यादी किल्ले एकेक करून जिंकून घेतले. त्यामुळे क्रोधित झालेल्या विजापूरचा सुलतान आदिलशहाने शिवाजी महाराजांना जीवे मारण्यासाठी



वाघनखे नावाचे शस्त्र

आपला सेनापती अफझलखान याला पाठविले अफझलखानने शिवाजी महाराजांना वेढा घातला व तह करण्यासाठी जेरीस आणले. यावेळी दोघांमध्ये तह झाला व तहाच्या बोलणी वेळी शिवाजी महाराजांना कपटाने मारावे असे खानाने ठरविले होते. परंतु शिवाजी महाराजांनी चपळाई व प्रसंगावधानाने अफझलखानचा वध केला.

शिवाजी आणि अफझल खान यांची भेट झाली तेव्हा एकमेकांना आलिंगन देतेवेळी अफझल खानने शिवाजी महाराजांच्या पाठीत खंजीर खुपसणार इतक्यात शिवाजी महाराजांनी चपळाईने वाघ नखांनी त्याचा कोथळा फाडला.

मोगल सेनेचा पराजय: शिवाजी महाराज दिवसेंदिवस प्रबळ होत असल्याची बातमी औरंगजेबाच्या कानापर्यंत पोचली. त्यामुळे औरंगजेबाने आपला सेनापती शाहिस्तेखान याला दख्खन प्रदेशात शिवाजी महाराजांच्या बंदोबस्तासाठी पाठविले. परंतु शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानचा पराभव केला.

शाहिस्तेखानाने पुण्याच्या राजमहालात मुक्काम केला. दोन वर्ष झाली तरी त्याला शिवाजी महाराजांना पकडणे शक्य झाले नाही. शिवाजी महाराजानी एके रात्री वेष पालटून खान रहात होता तेथे हल्ला केला. खान तेथून पळून जात असताना शिवाजी महाराजानी त्याची बोटे छाटली. शाहिस्तेखानने भयभीत होऊन पुण्यातून पलायन केले.

दख्खनसाठी राजा जयसिंह: यानंतर पुढील वर्षीच शिवाजी महाराजानी मोगलांच्या ताब्यात असलेल्या सुरत शहराला वेढा घातला आणि तेथील अपार संपत्ती लूट केली. यामुळे संतप्त झालेल्या औरंगजेबाने काहीही करून शिवाजी महाराजांचा पराभव करायचा असा निश्चय करून आपला प्रमुख सेनापती राजा जयसिंह याला दक्षिणेत पाठविले. शिवाजी महाराज व राजा जयसिंह यांच्यातील युद्धात शिवाजी महाराजांचा पराभव झाला आणि त्यांच्यामध्ये तह झाला. तहानुसार अनेक किल्ले मोगलांना द्यावे लागले. यासाठी महाराजांना औरंगजेबच्या भेटीसाठी दिल्लीला बोलविण्यात आले. यावेळी औरंगजेबने शिवाजी महाराजांना कैद करून आग्रा

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

येथे नजर कैदेत ठेवले, परंतु शिवाजी महाराजांनी युक्तीने यातून आपली सुटका करून घेतली व सुखरूप आपल्या राजधानीत येऊन पोहोचले.

पुढील दोन वर्षात शिवाजी राजांनी आपले स्थान पुन्हा भक्कम केले. तहात मोगलाना दिलेले सर्व किल्ले पुन्हा जिंकून घेतले. सुरत शहरावर पुन्हा हल्ला करून अपार संपत्ती लुटून स्वराज्यात आणली.

शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक: शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक राजधानी रायगडावर अत्यंत दिमाखात झाला. 'छत्रपती' ही पदवी धारण केली. आपले स्वराज्य 'हिंदवी स्वराज्य' असल्याची घोषणा केली. नंतर शिवाजी महाराजांना जिंजी, वेल्लूरू, म्हैसूर, प्रातांचा विशाल प्रदेश जिंकून अपार संपत्ती जमविली, पण मराठ्यांचे हे वैभव पाहण्यास शिवाजी फार काळ जगले नाहीत.

शिवाजी महाराजांचा राज्यकारभार

राज्य कारभारासाठी आठ प्रधानांचे एक मंडळ स्थापन केले होते. या अष्टप्रधान मंडळाच्या प्रधानमंत्र्याला 'पेशवा' असे म्हणत.

- **महसूल पद्धत:** शेतक-यांना शेतीसाठी बियाणे आणि खत खरेदी करण्यासाठी सरकार कर्ज देत असत. शेतजमिनीला सिंचनाची सोय करण्यात आली होती. तसेच उत्पादनाचा एक तृतीयांश भाग महसूल म्हणून गोळा करण्यात येत असे.
- **सैन्यदल:** शिवाजी महाराजांनी सैन्यदलावर विशेष भर दिला सैन्यदलामध्ये पायदळ, घोडदळ, नौदल आणि तोफखाना होता. शिवाजी महाराजांचे सैन्य शिस्तीसाठी प्रसिद्ध होते. ब्राह्मण आणि गायींना लुटत नसत.
- **किल्ले:** शिवाजी महाराजांनी गनिमी युद्धनीती वापरली. गनिमी युध्दकला हा किल्ले बचावासाठी त्यांच्याकडे उत्तम पर्याय होता. त्यांच्याकडे 240 किल्ले होते. त्या किल्ल्यांपैकी त्यांनी 111 किल्ले बांधले.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED



शिवाजीचा किल्ला, रायगड

गोरिल्ला (गनिमीकावा) रणनीती ही लहान गटामध्ये शत्रूंवर हल्ला करण्याची एक युक्ती आहे. युद्धाच्यावेळी पकडलेल्या महिलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात येत होते. युद्धादरम्यान सैनिक मशिदी नष्ट करत नव्हते. पवित्र कुराणाची प्रत मिळाल्यास ती संबंधितांना सन्मानपूर्वक परत करावी लागत असे.

शिवाजी महाराजांचे व्यक्तीमत्व आणि कामगिरी

- आपल्या जीवनातील उच्च दर्जाचा राज्यकर्ता असलेला शिवाजी धर्मसहिष्णूता मानणारा होता.
- शिवाजी राजे हे लहानपणापासूनच चांगले नेते होते. शक्तीला शक्तीने आणि कपटाला कपटानेच सामोरे जाण्याचे चातुर्य त्याच्यांमध्ये होते.
- शिवाजी महाराजांची लष्करी व्यवस्था उत्तम होती. 'गनिमी कावा' हा त्यांच्या प्रतिभेचा पुरावा होता. शिवाजी महाराज एक आदर्श राजा होते.

शिवरायाचे गुरु रामदास स्वामी एकदा शिवाजी महाराजाकडे भिक्षा मागण्यासाठी आले आणि त्यांनी संपूर्ण राज्य त्यांच्याकडे स्वाधीन केले. रामदासानी हे मान्य केले आणि शिवाजी महाराजांकडे राज्य परत केले आणि ते म्हणाले पुन्हा तूच राज्य चालविण्यास योग्य आहेस. संत रामदासांच्या प्रेरणेनून महाराष्ट्रात सुमारे 1200 तालिम घरे उभारण्यात आली.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



@MPSC NOT TO BE REPUBLISHED

कालगणना (सा.श.)

बाबर - सा.श. 1526-1530

अकबर - सा.श. 1556-1605

औरंगजेब - सा.श. 1659-1707

शिवाजी - सा.श. 1627-1680

नवीन शब्द:

लढवय्या - शूर

पुतळा - मूर्ती

कोतवाल - किल्लेदार आणि शहर संरक्षक

जिझीया - मुसलमान राजानी प्रत्येक हिंदूना दरडोई लावलेला कर.

सरदार - मुख्याधिकारी

हिंदवी स्वराज्य - हिंदू स्वराज्य

छत्रपती - पदवी

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. अकबराला विरोध करणारा मेवाडचा प्रसिध्द राणा _____.
2. फत्तेहपूर सिक्री _____ राजाने निर्माण केले.
3. रामचरित मानस _____ यांनी लिहिलेली कृती.
4. शिवाजी महाराजांचा जन्म _____ मध्ये झाला.
5. शहाजहानच्या मुलाचे नांव _____.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

6. मोगलांच्या काळातील सांस्कृतिक देणग्या कोणत्या?
7. अकबराच्या राज्यकारभाराबद्दल विवरण करा?
8. मोगल साम्राज्याच्या ऱ्हासाची कारणे सांगा.
9. जिजाबाईनी शिवाजींचे भविष्य कसे घडविले?
10. विजयपूरच्या सुलतानाने शिवाजींना का विरोध केला?
11. शाहिस्तेखान कोण होता? शाहिस्तेखान आणि शिवाजी यांच्यातील संघर्षाचा परिणाम काय झाला?
12. शिवाजींचा राज्याभिषेक कोठे झाला? त्यावेळी त्यांनी कोणती पदवी धारण केली?
13. तुम्ही शिवाजींच्या कोणत्या गुणांची प्रशंसा कराल व का?



उपक्रम:

- मोगलांच्या वास्तूकृतीची चित्रे व माहितीसह संग्रह करा.
- मोगल काळातील ऐतिहासिक स्थळे नकाशावर दाखवा.
- अकबर आणि औरंगजेबाच्या धोरणातील विरोधाभासांवर चर्चा करणारा अहवाल तयार करा.
- नकाशात शिवाजी महाराजा संबंधित ऐतिहासिक स्थळे ओळखा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 16 भारतीय वैचारिकता आणि भक्तीपंथ

L8C1B4

धार्मिक- सामाजिक सुधारणा चळवळी

पाठाचा परिचय

- सा. श. 8 व्या शतकापासून 16 व्या शतकापर्यंत अनेक धर्मसुधारकांचा जन्म झाला. ते विचारशील होते आणि त्यांनी तर्कशुद्ध आधारावर धर्म आणि समाजाचे पुनरुत्थान केले.
- या पाठात सुधारणा चळवळीत अग्रभागी असलेले शंकराचार्य, रामानुजाचार्य, बसवेश्वर आणि मध्वाचार्य यांचे जीवन आणि सुधारणांचा थोडक्यात सारांश खाली दिला आहे.
- तुम्हाला पुरंदरदास आणि कनकदासांचे विचार माहित आहेत काय? त्यांनी समाजासाठी कोणते योगदान दिले? त्यांच्याप्रमाणे उत्तर भारतातील साधूसंतांनी स्वतःच्या शिकवणूकीने समाजात जागृती निर्माण केली.
- भक्तीपंथाचा आशय, अर्थ आणि लक्षणे सांगितली आहेत. श्रीचैतन्य आणि नानक, मीराबाई आणि सूफी संत यांचा परिचय दिला आहे. त्यासोबत भक्ती पंथाने विभिन्न पंथियांच्या मध्ये सुसंवाद साधला आहे आणि स्थानिक भाषेच्या संवर्धनासाठी केलेल्या योगदानाचे विवरण दिले आहे.

सामर्थ्ये

1. धार्मिक सुधारकांचे विचार आणि सुधारणा समजून घेणे.
2. त्यांचे चिंतन, विचार कितपत समर्पक आहेत याची जाणीव करून घेणे.
3. भक्तीपंथाच्या शिकवणुकीचा, सामाजिक समरसता निर्माण होण्यासाठी दिलेल्या योगदानाचा अर्थ समजून घेणे.
4. संतांची शिकवणूक समजून घेऊन आपल्या जीवनात त्याचा वापर करणे.

© KSEEB NOT TO BE REPUBLISHED

भारतात अनेक महापुरुषांचा जन्म झाला. ते केवळ धर्मोपदेशकच नव्हते तर सक्रीय समाज सुधारकही होते. त्यांच्या सुधारणांमुळे लोकांच्यामध्ये असणारे अज्ञान आणि वाईट संप्रदाय नष्ट झाले. त्यांचा प्रभाव अजुनही व्यापक आहे.

श्री शंकराचार्य

शंकराचार्यांचा जन्म केरळमधील कालडी या गावात झाला. प्रतिभावान असलेल्या शंकराचार्यांनी वयाच्या आठव्या वर्षीच चारही वेदांचे अध्ययन केले. शिवगुरु आणि आर्यांबा हे शंकराचार्यांचे आईवडील. शंकराचार्यांनी प्रतिपादित केलेल्या तत्वाला अद्वैत तत्वज्ञान असे संबोधले जाते.

शंकराचार्यांच्या सुधारणा



श्री शंकराचार्य

- शंकराचार्यांनी तत्कालीन हिंदू समाजात अनेक सुधारणा घडवून आणल्या आणि लोकांना ज्ञानाच्या मार्गावर नेले.
- अव्दैत सिधांताद्वारे मानवजात एक आहे. येथे सर्वजन समान आहेत हे तत्व प्रतिपादीत केले.
- जातीच्या नांवावर होणारी भांडणे थांबवून ते समाज सुधारक बनले.
- शंकराचार्यांनी बद्री (उत्तराखंड), द्वारका (गुजरात), पूरी (ओडिसा) तसेच कर्नाटकातील शृंगेरी येथे पिठांची स्थापना केली. हे पीठ भारतीयांना भावनात्मक आणि धार्मिकरित्या जोडण्याचे केंद्र बनले.
- शंकराचार्यांनी अनेक शास्त्रीय ग्रंथ लिहिले. त्यांची 'भजगोविंदम्' ही कृती आजही लोकप्रिय आहे. शंकराचार्यांनी आपल्या 32 वर्षाच्या आयुष्यात जे काही साध्य केले ते आश्चर्यकारक आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

श्री रामानुजाचार्य



श्री रामानुजाचार्य

रामानुजाचार्यांचा जन्म चेन्नई जवळील श्रीपेरंबुदूर येथे झाला. कांची या नगरात त्यांनी शास्त्र अध्ययन केले. रामानुजांचे वडील केशव दिक्षित व आई कांतीमती. त्यांनी प्रतिपादित केलेल्या तत्वज्ञानाला विशिष्टाद्वैत असे संबोधले जाते.

रामानुजांनी देशाच्या चारही दिशांना प्रवास करून श्री वैष्णव धर्माचा प्रचार केला. मुक्तीसाठी भक्ती आणि शरणागती महत्वाची आहे हे सांगितले. कर्नाटकचा होयसळचा राजा विष्णूवर्धन यांनी त्यांचे स्वागत केले.

रामानुजाचार्यांच्या सुधारणा



चेलूवनारायण देवालय, मेलूकोटे

- रामानुजाचार्यांनी जातीय समरसता वाढविली.
- जातीवादाचा निषेध करून सर्व जातींना भक्ती तत्वाचा उपदेश केला.
- मुक्तीसाठी भक्ती आणि शरणागती अत्यंत महत्वाचे आहे असे सांगीतले.
- कोणतीही इच्छा न ठेवता भगवंताला शरण जाण्यास सांगीतले.
- भक्ती मार्गाने मोक्ष प्राप्ती होते असे प्रतीपादन केले.
- रामानुजाचार्यांनी मेलूकोटे आणि दक्षिण भारतातील अनेक भव्य देवालयांची निर्मिती केली.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

श्री बसवेश्वर



श्री बसवेश्वर

कर्नाटकाच्या सामाजिक आणि धार्मिक चळवळीत बसवेश्वरांनी अतिशय क्रांतीकारी भूमिका बजावली. बसवेश्वर विजयपूर जिल्हयातील बसवण बागेवाडीचे होते. बालपणी उपनयन संस्काराऐवजी लिंगदिक्षा घेतली. त्यांचा विद्याभ्यास कुडलसंगम येथे झाला.

बसवेश्वरांचे आई वडील मादलांबिका आणि मादरस हे बसवण बागेवाडीतील शैव ब्राम्हण होते. बसव तत्वाला शक्तीविशिष्टाद्वैत असे संबोधतात.

कल्याणमधून राज्य चालविणाऱ्या कलचुरी राजघराण्यातील बिज्जळाने बसवेश्वरांना खजिनदार म्हणून नियुक्त केले. कल्याणमध्ये बसवण्णांनी क्रांतीकारी विचारांना चालना देण्यास सुरुवात केली. सांप्रदायिकांनी या विचारांना विरोध केला. या गोष्टीमुळे दु:खी झालेले ते कल्याण सोडून कुडलसंगमला गेले. ते नंतर कुडलसंगममध्येच समाधिस्थ झाले.

@KSEBS NOT TO BE REPUBLISHED

बसवेश्वरांच्या सुधारणा

- बसवण्णांनी जतिरहित आणि वर्गरहीत समाजाच्या निर्मितीसाठी लढा दिला.
- 'कायकवे कैलास' (काम हीच पूजा) ही त्यांची मुख्य शिकवण आहे.
- बसवेश्वरांनी जातीयता, मुर्तीपूजा, यज्ञयागादींचे खंडन केले. 'शरीर हेच मंदिर' असे सांगितले.
- स्त्री ही आई तीच सर्वस्व असते. असे त्यांनी विचार ऐकवून स्त्रियांचा आत्मविश्वास वाढविला.
- त्यांनी बसवकल्याण मध्ये 'अनुभव मंटप' ची स्थापना केली. हेच वचनकारांचे व्यासपीठ झाले.
- बसवेश्वरांनी हजारपेक्षा जास्त वचनांची रचना केली त्या वचनांचा शेवट 'कुडल संगम देव' या शब्दाने होतो.

- वचन चळवळीतील प्रमुख असलेले श्री बसवेश्वर यांनी मानवतेच्या कल्याणासाठी दिलेला संदेश हा कालातीत आहे. या पार्श्वभूमीवर कर्नाटक सरकारने दिनांक 13.02.2024 पासून विश्वगुरु बसवण्णा यांना कर्नाटकाचे सांस्कृतीक नायक म्हणून घोषीत केले आहे.

कृती: तुम्हाला महत्वाच्या वाटणाऱ्या बसवण्णाच्या तीन वचनांचा संग्रह करा. त्यामध्ये दिसून येणाऱ्या अध्यात्म तत्वाचा अर्थ समजून घ्या. त्या विचाराला अनुसरून दहा वाक्ये लिहा.

कायक - म्हणजे भक्तीने केलेले कार्य होय. या कार्यामुळे मिळालेल्या फळाचे समान वाटप करून घेणे हेच दासोह. बसवेश्वरांना समाजात 'कायक' कामाची संस्कृती रुजवायची होती.

वचनसाहित्य: 'वचन' हा एक विशिष्ट साहित्य प्रकार आहे. वचन हे गद्यासारखे वाचन करता येते. तसेच पद्यासारखे गाताही येते. जेडर दासिमय्या, अल्लमप्रभू, चन्नबसवण्णा, अक्कमहादेवी इत्यादी वचनकार होऊन गेले. त्यानी सर्व जाती धर्मांना सामावून घेतले होते. वचनाचे प्रकटपणे चिंतन आजही चालू आहे.

श्री मध्वाचार्य



श्री मध्वाचार्य

मध्वाचार्यांचा जन्म उडुपी जवळील पाजक (बेल्ले) या गावी झाला. संन्यास स्वीकारलेल्या मध्वाचार्यांनी आपल्या तत्वांचा प्रसार करण्यासाठी दोनवेळा संपूर्ण भारत भ्रमण केले. विष्णू हे त्यांचे आराध्य दैवत होते.

तुळू ब्राम्हण असलेले मध्यगेह भट्ट व वेदवती हे त्यांचे आईवडील. त्यांनी द्वैत तत्वज्ञानाचे प्रतिपादन केले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

मध्वाचार्यांच्या सुधारणा:

- मध्वाचार्यांनी द्वैत तत्वज्ञानाशी संबंधित अनेक कृतींची संस्कृतमध्ये रचना केली.
- उडुपीमध्ये अष्टमठांची स्थापना केली.
- त्यांनी सरळ अशा भक्तीमार्गाचा उपदेश केला.



श्रीकृष्ण देवस्थान उडूपी

श्रीकृष्णाची पूजा अष्टयतींनी दोन महिन्यातून एकदा पर्यायाने करावी याची व्यवस्था मध्वाचार्यांनी केली. या पर्यायाचा कालावधी वादीराजांनी दोन वर्षासाठी विस्तारित केला.

अष्ट मठांसह उत्तरादी, व्यासराज आणि राघवेंद्र हे मठ मध्वाचार्यांच्या अनुयायांचे मुख्य धार्मिक केंद्र बनले आहेत.

मध्वाचार्यांच्या उपदेशाने कर्नाटक, आंध्र, तामिळनाडू आणि महाराष्ट्रातील जनता प्रभावित झाली.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

भक्ती पंथ

आपली भूमी संत मुनींची आहे. शेकडो संतांनी येथे वेळोवेळी जन्म घेतला आहे. त्यांनी सामाजिक एकोपा घडवून आणला आणि लोकांना योग्य मार्गावर चालण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी समाजातील वाईट चालिरिती उघड केल्या.

संतांनी भक्तीमार्गाचा उपदेश केला. त्यांचा असा विश्वास होता की भक्ती हाच देवाची दया मिळविण्याचा एकमेव मार्ग आहे. देवाकडे जाण्याचा हा दृष्टीकोन भक्ती पंथ म्हणून ओळखला जातो.

भक्ती पंथाचे सार:

- भक्तीपंथाने उच्च आणि निच या भेदभावाचा निषेध केला. सर्व मानव प्राणी समान आहेत हे प्रतिपादित केले.
- भक्ती संतांनी कालबाह्य रूढी आणि प्रथांचा विरोध केला. आणि त्याचे खंडन केले.
- धर्म म्हणजे प्रेम आणि मानवजातीची सेवा, अशी सूफी संतानी घोषणा केली. देव अनेक नसून एकच आहे अशी त्यांची धारणा होती.
- या संतांनी लोकांच्या एकतेसाठी कार्य केले.

भक्ती संत

श्रीचैतन्य: चैतन्य यांचा जन्म पश्चिम बंगालमध्ये झाला. त्यांनी जातीभेदाचा तीव्र विरोध केला. मुक्तीसाठीचा एकमेव मार्ग म्हणजे भक्ती होय अशी शिकवण त्यांनी दिली.



श्री चैतन्य

प्रेम, बंधुता आणि दानशिलत्व हा चैतन्यांच्या उपदेशाचा सारांश आहे. चैतन्य यांनी भारतभर तीर्थयात्रा केली. आणि प्रेमाचा संदेश दिला.



गुरु नानक

गुरु नानक : गुरु नानक हे शीख धर्माचे संस्थापक होत.

यांचा जन्म सध्याच्या पाकिस्तानातील पंजाबमध्ये झाला. गुरुनानक यांनी हिंदू-मुस्लिम धर्मातील समान विचार लोकांमध्ये ठासून मांडले. 'गुरु ग्रंथ साहेब' या शिखांच्या पवित्र ग्रंथामध्ये 'जपजी' नावाने ओळखली जाणारी गीते आहेत. देवाचे नामस्मरण करणे व चांगले कार्य करण्याला शिखपंथ महत्व देतो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

या मध्ये स्त्री-पुरुषांमधील समानतेबद्दल जोर देऊन सांगितले आहे. राजेमहाराज व पैगंबरांना जन्म देणाऱ्या स्त्रिया पुरुषांपेक्षा कनिष्ठ कशा असू शकतात? असा नानकांनी सवाल केला. "माझ्याकडे लाखो जीभ असल्या तरी त्या सर्व जीभेवर एका भगवंताचे नामस्मरण करीन" असे नानकांनी सांगितले. भारत भ्रमण करताना ते कर्नाटकला देखील आले होते. त्यांनी वास्तव केलेल्या बीदरमधील खोलगट स्थळाला नानक झरा (गोड पाण्याचा झरा) म्हणून संबोधतात.

मीराबाई: 'कलियुगातील राधा' या नावाने प्रसिध्द असलेल्या मीराबाई भारत देशातील एक महान किर्तनकार होत्या. त्यांचा जन्म राजस्थानातील रजपूत राजघराण्यात झाला. आजोबांनी दिलेल्या श्रीकृष्णाच्या मुर्तीसोबत दिवस घालविणे त्यांना खूप आवडायचे. श्रीकृष्ण हेच त्यांचे आराध्यदैवत होते. यांच्या कृष्णभक्तीला सासूचा कठोर विरोध होता. या त्रासाने कंटाळलेल्या मिराबाईने राजभोगाचा त्याग करून श्री कृष्णाच्या क्षेत्रामध्ये म्हणजे वृंदावनाला गेल्या. त्यांनी रचलेल्या किर्तनामध्ये भक्ती, प्रेम ओसंडून वहात होते. गिरीधर गोपाल हे त्यांच्या भगवंताचे नाव होते. त्यांच्या शेकडो भजनामुळे मीराबाई जनमानसात अजरामर झाल्या.



मीराबाई

© MTBS NOT TO BE REPUBLISHED

इतर प्रमुख भक्ती संत

- **कबीरदास:** कबीरांनी जातीव्यवस्थेतील अन्याय, मुर्तीपूजा, तीर्थयात्रा, उपवास, व्रत आणि इतर सर्व धार्मिक विधींचा निषेध केला. त्याने आपण अल्लाह आणि रामाचे अपत्य असल्याचे जाहीर केले.
- **तुलसीदास:** 'रामचरितमानस' हे तुलसीदासांचे प्रसिद्ध महाकाव्य आहे.
- **सूरदास:** हे संत कवी होत. ते जन्मतः अंध होते. सुरसागर ही त्यांची प्रसिद्ध कृती होय.

सूफी पंथ: सुफी पंथाचा उदय अरेबियामध्ये होऊन भारतामध्ये प्रवेश झाला. गरिबीचे प्रतिक म्हणून सुफी संत साधे लोकरी कपडे घालत असत. म्हणून त्यांना सुफी असे संबोधले जाते. कालांतराने योग, वेदांत आणि बौद्ध धर्माच्या मतांच्या चिंतनाने सुफीसंत प्रभावित झाले. अनेक सुफी संत (उदाहरणार्थ- बाबा बुडन) दत्तात्रेयांचे उपासक. विजापूरचे बुडन-अल-दिन या सुफी संताने आपल्या गाण्यात श्री कृष्णाची स्तुती केली आहे.

धर्म म्हणजे प्रेम, मानवाची सेवा हे सुफी संतांचे मूळ तत्व आहे. त्यांनी आपली भक्ती, गायन आणि नृत्याद्वारे व्यक्त केली. या दोन्ही प्रथा सनातनी मुस्लिमांनी निषिद्ध केल्या आहेत. सूफीमध्ये महिलादेखील होत्या. सूफी अनुयायी रबिहा या महिलेला आजही पूज्य अशा भावनेने पाहिले जाते.

निजामुद्दीन औलिया: हे भारताचे प्रमुख सूफी संत होय. यांनी दिल्ली मध्ये राहून गरिबीचे जीवन व्यतीत केले. गवताच्या काड्याची मशिदी हे त्यांच्या उपक्रमाचे केंद्रस्थान होते. दिल्लीच्या सुलतानानी दान म्हणून दिलेल्या गावाचा यानी त्याग केला. राजकारणापासून दूर राहिले. त्यांना भेटायला आलेल्या भक्तांना सद्गुण आणि करुणेचे (दयेचे) संदेश देत होते.



निजामुद्दीन औलिया

बंदेनवाज: बंदेनवाज हे कर्नाटकातील एक प्रसिद्ध सूफी संत होय. त्यांचा आकर्षक असा दर्गा कलबुर्गी येथे आहे. हिंदू लोक बंदेनवाज यांना केशव चैतन्य म्हणून बोलवत व त्यांची पूजा करत.

© KSEBS NOT TO BE REPUBLISHED

चिस्ती: सूफी पंथामध्ये चिस्ती हा एक प्रमुख पंथ होता. याची स्थापना मोइनुद्दिन चिस्ती यानी केली. यानी अजमेरला येऊन तेथेच आपल्या केंद्राची स्थापना केली. देवभक्ती, गुरुसेवा, सन्मार्गाने चालणे ही चिस्ती अनुयायांची लक्षणे होती. चिस्तींना हिंदू-मुस्लिम यातील एकतेबद्दल काळजी होती. यानी लोकांच्यासाठी स्थानिक भाषेतून ग्रंथरचना केली. आगऱ्याचे फत्तेपूर येथील सलीम चिस्ती प्रसिद्ध होते.



सलीम चिस्ती समाधी, आग्रा

भक्ती पंथांचे परिणाम:

- भक्ती संत हे हिंदू-मुस्लिम यांच्यातील समानता राखण्यास कारणीभूत झाले.
- भक्ती संतानी लोकांच्या स्थानिक भाषेत साहित्याची रचना केली. त्यामुळे भारतीय भाषा समृद्ध झाल्या.

©KBS NOT TO BE REPUBLISHED

कालगणना (सा.श.)

शंकराचार्य	- सा.श. 8 वे व 9 वे शतक
रामानुजाचार्य	- सा.श. 11 वे व 12 वे शतक
बसवेश्वर	- सा.श. 12 वे शतक
निजामुद्दीन औलिया	- सा.श. 1238-1325
मध्वाचार्य	- सा.श. 13 वे व 14 वे शतक
मोइनुद्दिन चिस्ती	- सा.श. 13 वे शतक
गुरु नानक	- सा.श. 1469-1538
श्री चैतन्य	- सा.श. 1486-1534

मीराबाई - सा.श. 1498-1546

बंदेनवाज - सा.श. 15 वे शतक

सलीम चिस्ती - सा.श. 16 वे शतक

नवीन शब्द

दिक्षा - मंत्रोपदेश

भंडार - खजाना

महसूल - कर

संप्रदाय - पूर्वीपासून आलेले आचार, विचार

झरा - गोड पाण्याचा झरा.

जाणून घ्या

❖ श्री चैतन्यचे जन्मस्थान: पश्चिम बंगालमधील नवद्वीप (नदिया). गुरु नानक यांचे जन्मस्थान: पाकिस्तानातील तळवंडी. मीराबाई: जोधपूरच्या राठोड घराण्यातील रतनसिंग यांची एकुलती एक मुलगी.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. गुरुनानक यांच्या गाण्यांना _____ असे म्हणतात.
2. शिखांचा पवित्र ग्रंथ _____.
3. रामानूजाचार्यांचा जन्म _____ येथे झाला.
4. कलीयुगातील राधा असे _____ यांना म्हणतात.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

5. शंकराचार्यांनी कोणत्या सुधारणा केल्या?
6. बसवेश्वरांची शिकवण काय आहे?
7. वचन साहित्याचे महत्व सांगा. काही वचनकारांची नावे सांगा.
8. भक्ती संतानी काय उपदेश केला?
9. भारतातील प्रमुख सुफी संत कोण?
10. भक्ती चळवळीचे परिणाम सांगा.
11. बंदेनवाज दर्गा कोठे आहे?
12. तुलसीदासांची प्रसिद्ध काव्य रचना कोणती?
13. गुरू नानकांचा प्रसिद्ध उपदेश कोणता?
14. भक्ती पंथाचे सार कोणते?

III. गटात चर्चा करून उत्तरे द्या.

15. भक्ती संतांच्या शिकवणीचे विश्लेषण करा.
16. समाजसुधारकांच्यामुळे झालेले बदल गटात चर्चा करा.

© KSEEB NOT TO BE REPUBLISHED

उत्तर भारतातील प्रसिद्ध राजघराणी

क्र.सं.	राज घराणे	संस्थापक	प्रसिद्ध राजे	राजधानी
1	मौर्य	चंद्रगुप्त मौर्य	अशोक	पाटलीपुत्र
2	कुशान	कुजलकड़ फिसस्	कनिष्क	पुरूषपुर
3	गुप्त	श्रीगुप्त	समुद्रगुप्त/2 रा चंद्रगुप्त	पाटलीपुत्र
4	वर्धन	पुष्यभूती	हर्षवर्धन	कनौज
5.	कार्कोट	दुर्लभवर्धन	ललितादित्य	परिहासपूर
6.	रजपूत			
(a)	गुर्जर प्रतिहार	हरिचंद्र	नागभट/मिहार भोज	उज्जयनी
(b)	चौहाण	वासूदेव चौहाण	तिसरा पृथ्वीराज चौहाण	दिल्ली
(c)	पाल	सिंहराज	धर्मपाल	मुडगागीरी
(d)	गुहील	बाप्पा रावळ	राणा कुंभ / राणा संग	मेवाड
(e)	परमार	उपेंद्र कृष्णराज	सियाखा	धारा
(f)	सोळंकी	पहिला मूळराज	पहिला भिमराय	अनहिलवाडा
(g)	चंदेल	नन्नूक	डंग	खजुराहो
7	अहोम	सुकाप्प	सुपात्छा	चिरायडाय
8	दिल्लीचे सुलतान			
(a)	गुलाम वंश	कुतुबुद्दीन ऐबक	इल्तमश	दिल्ली
(b)	खिलजी वंश	जलालुद्दीन खिलजी	अल्लाउद्दीन खिलजी	दिल्ली
(c)	तुघलक वंश	घियासुद्दीन	मोहम्मद बिन तुघलक	दिल्ली
(d)	सय्यद वंश	खिजर खान	खिजर खान	दिल्ली
(e)	लोदी वंश	बेहलोल लोदी	सिकंदर लोदी	दिल्ली
9	मोगल	बाबर	अकबर	दिल्ली
10	मराठा	शिवाजी	शिवाजी	रायगड

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम:

- शंकराचार्य, रामानुजाचार्य, बसवेश्वर आणि मध्वाचार्यांचे जीवनचरित्र वाचा.
- बसवेश्वरांच्या दहा वचनांचा संग्रह करा.
- काही वचनकार व त्यांच्या टोपन नावांचा संग्रह करा.
- शाळा समारंभात आचार्य, संत आणि शरणांच्या वेशभूषा धारण करा व त्यांच्या शिकवणी कथन करा.
- 'चोरी करू नका, मारू नका...' या वचनात कोणती मूल्ये आढळतात. ही मूल्ये आपल्या समाजात दिसून येतात का? नसल्यास कारणे देऊन चर्चा करा.
- शंकराचार्य, रामानुजाचार्य, आणि मध्वाचार्य यांच्या तत्वांचा संग्रह करा व लिहा.
- भक्ती संतांची चित्रे तपशिलांसह संग्रह करा.
- श्री चैतन्य, गुरु नानक, मीराबाई, तुलसीदास, कबीर, सुरदास आणि सूफी संतांचे जीवनचरित्र वाचा.
- मीराबाई यांची भजने ऐका.
- इंटरनेटवरुन सूफी पंथाबाबत अधिक माहिती मिळवा. भारताच्या विविध धार्मिक समाजावर त्यांचा प्रभाव आणि सध्याच्या संदर्भात त्यांची प्रासंगिकता यावर चर्चा करा आणि एका पानाचा अहवाल तयार करा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

नागरिक शास्त्र

पाठ 17 — लोकशाही

P7H8H3

पाठाचा परिचय


पूर्वी आपल्या देशावर राजघराण्यांची सत्ता होती. कालांतराने राजेशाहीची अधोगती झाली. पुढे लोकशाही आचरणात आली. या बदलांची कारणे समजून घेऊन लोकशाहीचे महत्व, निवडणूक भूमिका आणि निवडणूक प्रक्रियेचा आढावा इत्यादी या पाठात आहे.

सामर्थ्ये

1. राजेशाही आणि लोकशाहीचा अर्थ आणि त्यामधील फरक समजून घेणे.
2. लोकशाहीचे महत्व जाणून घेणे.
3. लोकशाहीत निवडणूकीची भूमिका आणि मतदानाचे महत्व समजून घेणे.
4. निवडणूक प्रक्रिया जाणून घेणे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ प्रवेश



1. डावीकडील चित्र बघ, सिंहासनावर कोण बसलेले आहे?

2. त्याच्या आजुबाजूला बसलेले कोण आहेत?

3. उजवीकडील चित्रातील व्यक्ती काय करत आहे?

4. तुम्ही कधीतरी मतदान केला आहात का?

एकेकाळी रत्नपुरावर चंद्रशयन नावाचा राजा राज्य करीत होता. त्याची राणी एका राजपुत्राला जन्म दिल्यानंतर मरण पावली. काही काळानंतर राजाने राजनर्तिकेशी विवाह केला. पुढे तिनेही एका राजपुत्राला जन्म दिला. दोन्ही भावंडानी गुरुकुलात प्रवेश घेतला आणि विद्या संपादन करुन ते ज्ञानी बनले. आपल्या उतारवयात राजाने मोठ्या राजपुत्राला युवराज म्हणून घोषित केले. यामुळे आपल्या मुलाला युवराजपद मिळेल ही राजनर्तिकेची आशा खोटी ठरली. तिने आपल्या मुलाच्या मनात वाईट विचार घातले. सत्तेसाठी भावाभावांमध्ये भांडण सुरु झाले. चिंतेमुळे राजा मरण पावला.

भावांमधील भांडणामुळे राज्यकारभार ढासळला. प्रजेच्या समस्या ऐकून घेणारे कोणी नव्हते. खून, दरोडे अशा घटना वाढल्या. अशामुळे प्रजा कंटाळली. त्या सर्वांनी मिळून आपल्या राज्याचा कारभार आपणच चालवायचा असा निर्णय घेतला. त्यासाठी आवश्यक कायद्यांची रचना केली. त्याचे पालन करण्यासाठी सर्वजण कटिबद्ध झाले. अशाप्रकारे रत्नपुरामध्ये राजाची राजवट (राजेशाही) संपुष्टात येऊन लोकांची सत्ता (लोकशाही) स्थापित झाली.

1. राजाने उत्तराधिकारी म्हणून कोणाला घोषित केले?

2. एखाद्या राजाच्या मृत्यूनंतर सिंहासनाचा अधिकार सामान्यपणे कोणाला मिळतो?

3. राजेशाहीत उत्तराधिकारासाठी भांडण निर्माण झाल्यास होणारे वाईट परिणाम कोणते?

4. राजेशाहीत राज्यकारभाराबावत तुमचे मत काय?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

राजेशाही: वरील कथेत आपण दोन प्रकारचे शासन ओळखू शकतो. ते आहेत राजेशाही आणि लोकशाही.

शासनाचे सर्व अधिकार एकाच व्यक्तीच्या हातात असतील तर त्याला 'राजेशाही पद्धत' म्हणतात. येथे सर्व काही राजाच्या इच्छेनुसार चालवले जाते. त्याच्या राजवटीला कालावधीची मर्यादा नाही. चाणाक्ष आणि शूरवीर राजाने राज्य केले तर राज्य बळकट होते. प्रजा सुखी होते. परंतू मूर्ख आणि दुर्बल राजाच्या राजवटीने राजेशाही संपुष्टात येते.

लोकशाहीचा अर्थ: लोकानी आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधीद्वारे चालणारी राजकीय व्यवस्था म्हणजे 'लोकशाही'. हे लोकांचे सरकार असून, लोकांच्या हिताचे रक्षण करणे हेच मुख्य उद्दिष्ट आहे.

महत्व: लोकशाही ही एक लोकप्रिय राजकीय व्यवस्था आहे. यामध्ये काही उत्तम अंश आहेत.

1. सरकार हे प्रजेच्या प्रतिनिधींचेच असते.
2. येथे सर्वांना समान संधी असते.
3. नियमितपणे निवडणूका होऊन, लोकप्रतिनिधी कार्य करतात.
4. येथे विविध विषयांवर चर्चा होऊन जनहितावर आधारीत निर्णय घेतले जातात.
5. लोकशाहीत लोक विवेकबुध्दीने निर्णय घेणे आवश्यक असते.

लोकशाही समोरील आव्हाने:

1. काहीजण मत मिळविण्यासाठी पैशांचे आमिष, आणि दबावतंत्राचा वापर करतात.
2. निवडणूकीमध्ये जात, धर्म, भाषा यांचासुद्धा प्रभाव पडतो.
3. निवडून आलेले लोकप्रतिनिधी स्वःताच्या स्वार्थासाठी पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात सामील होतात. अशा पक्षांतरामुळे सरकार अस्थिर होऊ शकते.
4. या व्यवस्थेमध्ये गुंडप्रवृत्तीच्या आणि अपराधी व्यक्तींची निवड होण्याचा संभव असतो.

@KVBS NOT TO BE REPUBLISHED

निवडणूक



मतदान



विद्युत मतयंत्र

1. लोक रांगेत का चालले आहेत?
2. तू कधीतरी असा प्रसंग पाहिला आहेस का?
3. मतपत्र अथवा मतयंत्रावर चिन्हे का दिलेली असतात?

लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींची निवड निवडणूकीच्या माध्यमातून केली जाते. मतदान हा निवडणूक प्रक्रियेचा एक मुख्य भाग आहे. भारतामध्ये अठरा वर्षे अथवा त्याहून अधिक वयाच्या लोकांना मतदानाचा अधिकार आहे.

मतदार गुप्त मतदानाद्वारे उमेदवार निवडतात. उमेदवारांना निवडणूक चिन्हे देण्यात येतात. ही चिन्हे पाहून निरक्षर व्यक्ती देखिल मतदान करु शकतात.

मतदानाचे महत्व: मतदान हे नागरिकांना आपणास योग्य असणाऱ्या प्रतिनिधीला निवडून आणून आपला अभिप्राय व्यक्त करण्यास सहाय्यक ठरते. हे सर्व वर्गातील लोकांना प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळवून देते.

निवडणूक प्रक्रिया: निवडणूका एका वेळापत्रकाप्रमाणे होतात.

1. निवडणूक अधिसूचना प्रकट करणे.
2. सुरवातीला उमेदवाराकडून उमेदवारी अर्ज दाखल करणे.

© KSBS NOT TO BE REPUBLISHED

3. अर्जाची छाननी.

4. निवडणूकीतून माघार घेणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागे घेणे.

5. मतमागणीसाठी उमेदवार व त्यांच्या पक्षाच्या नेत्याकडून निवडणूक प्रचार

6. ठराविक दिवशी मतदान

7. मतमोजणी आणि निकालाची घोषणा

8. विजयी उमेदवारांची यादी जाहीर करणे

नवीन शब्द:

मतदान - निवडणूकीमध्ये आपली निवड व्यक्त करणे, मत देणे.

वंशपरंपरागत शासन - एकाच घरातील व्यक्तीनी राज्यकारभार चालवणे.

मतपत्रिका - उमेदवारांची नांवे आणि चिन्हे मुद्रित केलेली पत्रिका.

गुप्त मतदान - ही एक अशी प्रणाली आहे की ज्याद्वारे नागरिकाने कोणत्या पक्षाला किंवा उमेदवाराला मतदान केले आहे हे जाहीर न करता मतदान करण्याची व्यवस्था.

मतदान केंद्र - मतदान करण्याचे ठिकाण.

©KEBS NOT TO BE REPUBLISHED

तुम्हाला माहित असू द्या

- सध्या मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक यंत्राचा वापर सुरु झाला आहे.
- भारतामध्ये निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला दिला आहे. हा आयोग स्वतंत्रपणे कार्य करतो.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. सर्व अधिकार एकाच व्यक्तीच्या हाती असतील तर त्याला _____ पध्दत म्हणतात.
2. मतदान करण्यास वयाची _____ वर्ष पूर्ण झाली पाहिजेत.
3. मत टाकण्याच्या ठिकाणाला _____ म्हणतात.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

4. लोकशाही म्हणजे काय?
5. लोकशाहीचे महत्व सांगा.
6. लोकशाही समोरील आव्हाने कोणती?
7. मतदानाचे महत्व काय?

III. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

8. निवडणूक प्रचार करण्यासाठी उमेदवार करीत असलेल्या पध्दती.
9. लोकशाहीच्या यशामध्ये आमची भूमिका.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम:

- भारतातील राजकीय पक्षांच्या निवडणूक चिन्हांचा संग्रह करुन अल्बम तयार करा.

पाठ 18 राज्य धोरण मार्गदर्शक तत्त्वे

Z3E2Q2

पाठाचा परिचय

आमच्या संविधानाच्या 4 थ्या भागातील कलम 36 ते 51 मध्ये राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांचा समावेश करण्यात आला आहे. संविधानाच्या आशयाची अंम लबजावणी करण्यासाठी निवडून आलेल्या सरकारला ही मार्गदर्शक सूत्रप्रमाणे आहेत. या पाठात त्याचे स्पष्टीकरण आणि महत्वपूर्ण चर्चा समाविष्ट आहे.

सामर्थ्ये


1. राज्य धोरण मार्गदर्शक तत्त्वांची उद्दिष्टे जाणून घेणे.
2. राज्य धोरण मार्गदर्शक तत्त्वे कल्याणकारी राज्य स्थापनेला कशी पूरक आहेत हे समजावून घेणे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

सुखीराज्य स्थापनेसाठी संविधानाच्या चौथ्या भागात गांधीवादी, समाजवादी आणि उदारमतवादी बौद्धीक तत्वांच्या अंमलबजावणीसाठी राज्यांना दिलेली मार्गदर्शी सूत्रेच राज्यधोरण मार्गदर्शक तत्वे आहेत. कोणतेही सरकार सत्तेवर आले तरी ही सूत्रे पाळली जावीत असा संविधानाचा नैतिक उद्देश आहे. तसेच हा भारताच्या सर्वांगिण विकासासाठी दिशादर्शक आहे.

राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांचे महत्व

राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे केंद्र आणि राज्य सरकारला संविधानाने दिलेले निर्देश होय. कायदे बनविताना, धोरणे आखून अंमलबजावणी करताना या तत्वांचा अवलंब करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य, समानता, बंधुता साध्य करण्यासाठी आणि सुखी राज्याच्या स्थापनेसाठी राज्य मार्गदर्शक तत्वे महत्वाची आहेत.



दुर्बलांना सामाजिक न्याय

भारतीय प्रजासत्ताक व्यवस्थेमध्ये खालील मार्गदर्शक तत्वांचा समावेश होतो.


1. **सामाजिक न्याय:** नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय प्रदान करून जनकल्याण साधणे.

2. **दुर्बलांसाठी सामाजिक न्याय:** दुर्बलांसाठी उपजिविकेची साधने प्रदान करणे, त्यांचे आर्थिक शोषणाचे निवारण आणि शैक्षणिक तसेच आर्थिक विकास करणे आणि त्यांना कायद्याची मोफत मदत करणे.

3. **महिला आणि बालकल्याण:** एकाच प्रकारच्या कामासाठी पुरुषांना, व महिलांना समान वेतन महिलांसाठी मातृत्व लाभ, बाल शोषण प्रतिबंध, मुलांच्या निरोगी वाढीस प्राधान्य आणि त्यांना मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे.



महिला आणि बाल कल्याण



मोफत आणि सक्तीचे शिक्षण

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

4. **कामगार कल्याण:** कामगारांच्या कल्याणाची काळजी घेणे. काम करण्याचा अधिकार काम करण्यासाठी अनुकूल वातावरण : कामगारांसाठी किमान वेतन, आणि त्यांना राज्यकारभारात सहभागी होण्यास संधी.



कामगार कल्याण



असहायांना मदत

5. **असहाय्यांना मदत:** वृध्द, आजारी दिव्यांग आणि बेरोजगारांच्या जीवनासाठी सरकारकडून मदत.

6. **सर्वासाठी समान कायदा:** भारतातील सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायदा जारी करणे.



दारू बंदी




पशु आपल्या देशाची संपत्ती

7. **मद्यपान निषेध:** मद्यपानामुळे आरोग्य बिघडते. कुटुंबाची आर्थिक स्थिती बिघडते, तसेच महिलांचे शोषण वाढते. यासाठी भारतीय संविधानाने राज्य सरकारला मद्यपानावर बंदी घालण्याचा आदेश दिला आहे.

8. **कृषी आणि पशुसंवर्धन संघटना:** राज्यात कृषी, व्यवसाय पशुसंवर्धन हे आधुनिक आणि वैज्ञानिक पध्दतीने करणे. विशेष करुन उत्तम जातीच्या पशुचे संगोपन करुन गाय आणि वासरे आणि इतर दूध देणारे प्राणी तसेच भार वाहणाऱ्या प्राण्यांची हत्या करण्याचा निषेध करण्यासाठी क्रम घटनेत सांगितले आहे. या करीता कर्नाटकमध्ये कर्नाटक पशुहत्या प्रतिबंध आणि पशुसंरक्षण कायदा 2020 (The Karnataka Prevention of slaughter and preservation of cattle Act - 2020) लागू केला आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



कृषी विकास



आधुनिक शेती

9. पर्यावरण: पर्यावरणाचे रक्षण आणि विकास - उदाः खाणकाम, औद्योगिक प्रदूषणापासून पर्यावरणाचे संरक्षण करणे.




पर्यावरण संरक्षण

10. ऐतिहासिक स्मारकांचे संरक्षण: ऐतिहासिक स्मारकांचे संरक्षण करणे हे शासनाचे आद्य कर्तव्य आहे. उदा. बदामी, बिदर, बेलूर, हळेबिडू, श्रवणबेळगोळ, सन्नती, मैसूरु, हंपी, पट्टदकल, विजयपूर इत्यादी.

11. आंतरराष्ट्रीय शांतता: सुरक्षा राखण्यातही देशाचा सहभाग असावा.

सामाजिक न्याय म्हणजे काय? जाती, धर्म, लिंग, भाषा, वर्ण प्रदेश आणि दर्जा यांच्यात भेदभाव न करता सर्व नागरिकाना संरक्षण देणे. आणि सर्वाना समान दृष्टीकोनातून पाहणे, म्हणजेच सामाजिक न्याय होय. मागासवर्गीयांच्या हिताचा आदर करणे. वेतन ठरविणे, वेठबिगारी पद्धत निर्मूलन करणे, मुलांचे शोषण, निर्मूलन, स्त्रियांना समान हक्क तसेच गौरव इत्यादी, सामाजिक न्यायात - समावेश आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



शोषण

राज्य घटनेने राज्यांना अनेक सल्ले व सूचना दिल्या आहेत. तरी ही त्याचे उल्लंघन झाल्यास नागरिकांना न्यायालयात तक्रार करता येत नाही. (उदा. सात दशकानंतर केंद्र सरकारने सुध्दा मद्यपानाचा निषेध कायदा अंमलात आणल नाही तरीसुध्दा या बाबत न्यायालयात तक्रार करता येत नाही).

कृती: आपल्या राज्यात राज्य मार्गदर्शक तत्त्वे कितपत लागू केली आहेत. आज वेगवेगळ्या प्रकारचे शोषण होत आहे. या विचारावर चर्चा सत्र आयोजित करून त्यामध्ये येणाऱ्या अभिप्रायाची यादी तयार करा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. राज्य धोरण मार्गदर्शक तत्वे म्हणजे काय?
2. महिला आणि बालकल्यांणाच्या स्थापनेसाठी राज्य घटनेने कोणत्या सूचना दिलेल्या आहेत?
3. राज्य धोरण मार्गदर्शक तत्त्वे, कृषी आणि पशु संगोपनाला महत्व देण्याचे उद्देश काय?
4. राज्यात मद्यपान बंदी करण्याची सूचना का देण्यात आली आहे?

II. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

5. दुर्बलांसाठी सामाजिक न्याय.
6. मद्यपान बंदी निषेध.
7. ऐतिहासिक वास्तूचे संरक्षण.
8. मुलांच्या शिक्षणाच्या अधिकाराची अधिक प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यासाठी काय केले पाहिजे?



उपक्रम:

- तुमच्या आजूबाजूच्या समाजातील सामाजिक आणि आर्थिकदृष्टया असुरक्षित लोकांकडे पहा आणि ते कमकुवत का आहेत. याची तुमच्या वर्गमित्रांशी चर्चा करा.
- आपल्या तरुण लोकांवर मद्यपानाचा आणि अंमली पदार्थांच्या सेवनाचे काय परिणाम होतात? या विषयावर चर्चासत्र आयोजित करा आणि अभिप्राय संग्रह करा.
- बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी बालकांचे हक्क आवश्यक आहेत. तुम्हाला माहित आहे. की, त्या हक्काचे 'उल्लंघन' करतात तेव्हा ते चाईल्ड हेल्पलाइन नंबर (मुलाची सहाय्यवाणी 1098) वर मोकत कॉल करू शकतात. या विषयावर चर्चेची व्यवस्था करून अभिप्राय संग्रह करा.

© KSBSB NOT TO BE REPUBLISHED

पाठ 19 मानव हक्क, मूलभूत हक्क आणि कर्तव्ये

Q4D4W9

पाठाचा परिचय

या पाठात मानव हक्क अर्थ आणि महत्व यांचा परिचय करून देण्यात आला आहे. तसेच आपल्या संविधानाने भारताच्या प्रत्येक नागरिकांना दिलेल्या हक्क व कर्तव्याचा परिचय करून दिला आहे.

सामर्थ्ये

1. मानव हक्क अर्थ आणि महत्व समजून घेणे.
2. स्वाभाविक हक्क आणि मूलभूत हक्क यामधील फरक समजावून घेणे.
3. मुलांच्या हक्कांचे महत्व समजून घेणे.
4. भारतीय नागरिकांना संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्कांचा अर्थ सम जून घेणे.
5. संविधानाने सांगितलेली अकरा मूलभूत कर्तव्य समजून घेऊन ती आपल्या जीवनात आचरणात आणणे.
6. आपल्याला मिळालेले हक्क उपभोगताना अडचण आल्यास ते हक्क पुन्हा मिळविण्याचे उपाय समजून घेणे.

@KTPS NOT TO BE REPUBLISHED

'हक्क' म्हणजे काय?

'हक्क' म्हणजे एका नागरिकाला मिळालेला अधिकार होय. यामध्ये 'स्वाभाविक हक्क' सुध्दा असू शकतात. (उदा - जगण्याचा हक्क, स्वसंरक्षणाचा हक्क) तसेच 'न्याय संमत हक्क' असू शकतील. (उदा- समानतेचा हक्क, शिक्षणाचा हक्क).

मानव हक्क

प्रत्येक मानवाला जन्मताच काही हक्क मिळालेले असतात. वंश, जात, भाषा, धर्म, लिंग किंवा इतर कोणत्याही गुण किंवा वर्णाचा विचार न करता स्वभावात कितीही फरक असला तरी या हक्कापासून कोणालाही वगळले जाऊ शकत नाही. मानवी अस्तित्वाचा एक भाग म्हणून हे हक्क आपल्या जीवनात अंतर्भूत आहेत. अशा हक्कांना आणि संधीना मानवी हक्क म्हणून संबोधून मानवी हक्कांना सार्वत्रिक मान्यता दिली आहे.

मानव हक्क संकल्पनेची उत्पत्ती:

जगातील सर्व तत्विक दृष्टीने मनुष्याचे श्रेष्ठत्व मान्य केले आहे. मनुष्य हे निसर्गाचे बालक आहे. सृष्टीतील सर्व चराचरा सोबत राहून त्याने आपली स्वतः ची एक जीवनशैली विकसित केली आहे. 'दुसऱ्यांना आपल्यासारखेच समजले तर यापेक्षा वेगळा स्वर्ग नाही'. या सर्वज्ञाच्या उक्ती प्रमाणे मानवी हक्काचे प्रतिपादन असलेले दिसून येते. पण मानवाने विकसित होत असताना नवनवीन शोध लावले, तसतसा स्वार्थ वाढू लागला, या पार्श्वभूमीवर प्रत्येक मनुष्याला स्वातंत्र्य, समानता, भेदभाव रहित मुक्त जीवन जगण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी मानवी हक्कांचा जन्म झाला. हेरॉल्ड जे लास्की यांच्या मते न्याययुक्त मानवीय सामाजिक स्थितीगती म्हणजे मानवी हक्क होय.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

आंतरराष्ट्रीय मानवी हक्काची सार्वत्रिक घोषणा:

मानवी इतिहासात भूतकाळात विविध वंश आणि धर्मामधील संघर्षामध्ये मोठ्या प्रमाणात मनुष्याची हानी झाली आहे. 20व्या शतकातील दोन महायुद्धामध्ये लाखो लोक जळून राख झाले. मोठ्या संख्येने लोकांना आपले प्राण गमवावे लागले. ही इतिहासाची विटंबना आहे. अशा प्रकारचे संघर्ष, हिंसाचार, भेदभाव नष्ट करण्यास आणि जगातील सर्व मानवतावादी आधारावर जगण्याच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने संयुक्त राष्ट्रसंघाने 10 डिसेंबर 1948 ला मानवी हक्काची सार्वत्रिक घोषणा केली.

मानवी हक्काचे महत्व:

1. व्यक्तीच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाला पूरक असतात
2. सन्माननीय जीवनाचा पाया आहेत.
3. मानवता आणि न्याययुत समाज निर्माण करण्यासाठी प्रेरणा आहे.
4. व्यक्ती आणि राज्यांमध्ये स्नेहपूर्वक मैत्री निर्माण करण्याचा सेतू आहे.
5. जागतिक जीवनाचा जिव्हाळा आहे.

मुलांचे हक्क

मानवी हक्कांमध्ये मुलांच्या हक्कांचाही समावेश आहे. प्रत्येक बालकाला नैसर्गिकरित्या काही सुखसोयी मिळालेल्या असतात. प्रत्येक मूल आपले बालपण आई-वडिलांसोबत घालविणे, शारीरिक संरक्षण, अन्न, शिक्षण, आरोग्य सुविधा, मिळवण्याचा अधिकार आहे. तसेच मुलांना वंश, लिंग, रंग,धर्म, आणि अपंगात्वाच्या आधारावर भेदभाव न करता नागरी हक्क आहेत. भारतीय संविधानाने 14 वर्षाखालील मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची तरतूद केली आहे. मूल शिक्षण सोडून कामाला जाणे हे मुलाच्या हक्काचे उल्लंघन आहे. बालकामगार पद्धत ही मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. मजुरी घेऊन काम करणे किंवा विना मजुरी काम करणे याला बालकामगारी पद्धत म्हणतात. बालकामगार पद्धत ही मुलांच्या हक्कांच्या विरोधात आहे. त्यामुळे 1986 मध्ये बालकामगार प्रतिबंधक कायदा लागू करण्यात आला. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्याला 3 महिने ते 1 वर्षापर्यंत तुरुंगवासाची शिक्षा, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED





मानवी हक्कांचे संरक्षण

अशाप्रकारे मानवी हक्क आणि मुलांच्या हक्कासाठी स्थानिक स्तरापासून ते जागतिक स्तरापर्यंत मानवी हक्क आयोग स्थापन करून कार्यरत आहेत. बाल हक्क संरक्षणासाठी 1098 ही मोकन सहाय्यवाणी आणली आहे.

यासह सर्व सजीवांना चांगले जीवन जगण्यासाठी उत्तम वातावरणाची आवश्यकता आहे. उत्तम आरोग्य, निवास, अन्न ,पाणी आणि स्वच्छतेच्या सुरक्षेसह सर्व समावेशक चांगल्या वातावरणाचे संरक्षण हे ही मानवी हक्कांचे संरक्षण आहे. असे संयुक्त राष्ट्र संघाने 2012 मध्ये घोषित केले असून त्याची अंमलबजावणी करणे ही सर्व राष्ट्रांची जबाबदारी आहे.

प्रत्येक नागरिकाच्या विकासासाठी आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी काही हक्क आणि कर्तव्ये असलीच पाहिजे. त्यासाठीच आपल्या संविधानाने नागरिकांसाठी सहा मूलभूत हक्क दिलेले आहेत.

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

मूलभूत हक्क

संविधानाने सांगितलेल्या तसेच कायद्याने ज्या हक्कांचे रक्षण केले आहे. अशा हक्कांना 'मूलभूत हक्क' असे म्हणतात. हे प्रत्येक नागरिकाला दिलेले संविधानात्मक हक्क आहेत. नागरिकांनी त्यांचे उल्लंघन करू नये.

व्यक्तीच्या विकासासाठी आणि राष्ट्राच्या समृद्धीसाठी कांही स्वातंत्र्य आणि मूलभूत हक्क आवश्यक आहेत. त्यामुळे संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला सहा मूलभूत हक्क दिले आहेत. ते पुढील प्रमाणे –

1. समानतेचा हक्क
2. स्वातंत्र्याचा हक्क
3. शोषणा विरुद्ध हक्क
4. धार्मिक - स्वातंत्र्याचा हक्क
5. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क
6. संविधानानुसार न्यायालयात दाद मागण्याचा हक्क

1. समानतेचा हक्क:

कायद्यासमोर सर्वजण समान आहेत. कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. सर्वांना समान संरक्षण मिळावे असा समानतेच्या हक्काचा आशय आहे.



कायद्यासमोर सर्वजण समान आहे

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

धर्म वंश, जात, लिंग, जन्मस्थळ या कारणावरून राज्यांनी कोणताही पक्षपात करू नये. दुकान, उपहारगृह, मनोरंजनाची स्थळे येथे प्रवेशासाठी कोणालाही निर्बंध घालू नये. सार्वजनिक विहिरी, तलाव, रस्ते आणि विश्रांती स्थळांचा वापर करण्यासाठी बंदी असू नये. सरकारी सेवेत सर्वांना समान संधी आहे. सार्वजनिक प्रार्थना स्थळांमध्ये त्या त्या जाती धर्माच्या व्यक्तीस प्रवेश व प्रार्थना करण्यास कोणत्याही प्रकारचा निर्बंध असणार नाही. समानतेच्या हक्काच्या पार्श्वभूमीवर लैंगिक, अल्पसंख्याकांच्या हक्काचा आदर करण्यासाठी कायदे तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ : भारत सरकारचा लैंगिक अल्पसंख्यांक हक्कांचा संरक्षण कायदा 2019 आणि कर्नाटक सरकारचे लैंगिक अल्पसंख्याक धोरण 2017 लागू केले आहे.

2. स्वातंत्र्याचा हक्क:

संविधानाने दिलेले स्वातंत्र्याचे हक्क पुढील प्रमाणे आहेत -

1. भाषण व विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य.
2. शांततेने सभेत सहभागी होण्याचे स्वातंत्र्य.
3. संघ संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य.
4. भारताच्या कोणत्याही भागात मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य.
5. भारताच्या कोणत्याही भागात वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य.
6. कोणताही उद्योग, व्यापार, नोकरी, धंदा, व्यवहार करण्याचे स्वातंत्र्य.



भाषण स्वातंत्र्य

कृती: लोकशाही पद्धतीत भाषण स्वातंत्र्याचे महत्व याबाबत चर्चासत्र आयोजित करून अभिप्राय संग्रह करा.

स्वातंत्र्याचा हक्क एक मुलभूत हक्क असला तरी त्याला मनाला येईल तसा वापर करता येणार नाही. कारण काही संदर्भात राज्यांना व्यक्ती स्वातंत्र्यावर काही निर्बंध घालता येतील असे संविधानातच सूचविले आहे. उदा. भाषण स्वातंत्र्य आहे म्हणून कोणत्याही व्यक्तीबद्दल अवास्तव किंवा निराधार बोलू नये.

3. **शोषणा विरुद्ध हक्क:** गरिबांचे, स्त्रियांचे, बालकांचे आणि दुर्बलांचे शोषण करू नये. हाच या हक्काचा उद्देश होय. शोषण थांबविण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने अनेक कायदे अस्तित्वात आणले आहेत. उदा. हुंडा देणे व घेणे कायद्याने गुन्हा मानलेला आहे. गुलामी किंवा वेटबिगारीस मनाई करण्यात आली आहे. खाणकाम, बिडी तयार करणे, फटाकड्या तयार करणे अशा अपायकारी ठिकाणी मुलांना कामावर ठेवण्यास मनाई आहे. बालकामगारी सरकारने निषेध केला आहे. बालकाने चौदा वर्षापर्यंत सक्तीने शिक्षण घेतले पाहिजे. महिला आणि मुलांच्या तस्करीचा निषेध केला आहे.



बाल कामगार पद्धतीला कायद्याने बंदी आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

4. **धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क:** भारतातील नागरिकांना जो धर्म योग्य वाटेल तो स्विकारण्याचे व आचारण करण्याचे स्वातंत्र्य आहे. सार्वजनिक शांतता शिस्त, आरोग्य, निती नियम आणि स्वच्छता यांना बाधा न आणता तसेच, इतर नियम लक्षात घेऊन आपल्या धर्माचे आचरण करण्याचा हक्क सर्वांना आहे. जबरदस्तीने किंवा फसवणूक तसेच अमिष दाखवून धर्मांतर करू नये. असे संविधानात सुचविले आहे.



धार्मिक स्वातंत्र्य

5. **सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क :** धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हिताचे संरक्षण करणे हा या हक्काचा मुख्य उद्देश आहे. कोणत्याही लोकांनी आपली भाषा, लिपी अथवा संस्कृतीचे रक्षण करण्याचे हक्क मिळविलेले आहेत. अल्पसंख्याकाना स्वत:ची शैक्षणिक केंद्रे स्थापन करून ती व्यवस्थित चालविण्याचा हक्क आहे. मात्र या शिक्षण संस्था राज्य सरकारच्या नियमानुसार चालविल्या पाहिजेत.



सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क

© IITES NOT TO BE REPUBLISHED

6. संविधानानुसार न्यायालयात दाद मागण्याचा हक्क: नागरिकांना दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास त्याविरुद्ध संविधानात्मक मार्गाने न्यायालयात दाद मागता येते. यालाच 'संविधानात्मक उपायाचा हक्क' असेही संबोधतात.

मुलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास अन्यायग्रस्त व्यक्ती उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयात जाऊन अन्याय निवारण्यासाठी दाद मागू शक्तात. मूलभूत हक्कासंबंधी सर्वोच्च न्यायालयात अथवा उच्च न्यायालयात दाद मागण्याच्या अर्जाला 'रिट अर्ज' असे म्हणतात.

मूलभूत कर्तव्ये

'मूलभूत हक्क व कर्तव्ये' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कर्तव्य म्हणजे नागरिकाने आपल्या देशासाठी करावयाची जबाबदारी होय. प्रत्येक नागरिकाने या मूलभूत कर्तव्याचे पालन स्वयंस्फूर्तीने केल्यास देशाची प्रगती सहजपणे होते.

संविधानामध्ये एकूण अकरा मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला आहे. ती पुढील प्रमाणे.

1. संविधान, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
2. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील स्फूर्तीदायी आदर्शांची जोपासना करणे.
3. भारताच्या विविधता आणि एकात्मतेचे रक्षण करणे.
4. देशाच्या संरक्षणासाठी पुढे येणे.
5. 'आम्ही सर्व भारतीय आहोत' हा बंधुभावना वाढविणे.
6. आपली समृद्ध सांस्कृतिक परंपरा तसेच ऐतिहासिक स्मारकांचे रक्षण करणे.
7. नैसर्गिक साधन संपतीचे संरक्षण व संवर्धन करणे.
8. वैज्ञानिक मनोभाव व वैचारिकता वाढविणे.

@MTBS NOT TO BE REPUBLISHED

9. सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसेचा त्याग करणे.

10. वैयक्तिक आणि सामूहिक विकास कार्यात पारंगत होऊन देशाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणे.

11. 6 ते 14 वयोगटातील मुलांना पालकांनी शिक्षण घेण्याची संधी प्राप्त करून देणे.



संविधान राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा आदर करणे.



देशाचे रक्षण



परिसर संरक्षण



आम्ही सर्व भारतीय

@KTBS NOT TO BE RE

कृती: परिसर संरक्षण व संवर्धनात विद्यार्थ्यांचे पात्र या विचारा संबंधी चर्चासत्र आयोजित करून अभिप्राय संग्रहित करा.

नागरिकांनी आपली मूलभूत कर्तव्ये योग्य रितीने पार पाडल्यास सरकार त्यांची न्यायालयीन विचारणा करत नाही. परंतु देशातील सर्व नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने मूलभूत कर्तव्यांचे पालन केले पाहिजे.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. हक्क म्हणजे _____.
2. मूलभूत हक्क_____ आहेत.
3. बाल कामगार निषेध कायदा _____ मध्ये अंमलात आणला.
4. आपली भाषा, संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी आम्हला _____ हक्क देण्यात आला आहे.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

5. मानव हक्क म्हणजे काय?
6. मुलांच्या हक्कांची यादी कर?
7. मूलभूत हक्क म्हणजे काय? ते कोणते.
8. मूलभूत कर्तव्याचे पालन आपण स्वयंस्फूर्तीने का केले पाहिजे?
9. समानतेचा हक्क म्हणजे काय?
10. सामाजिक आणि आर्थिक शोषण कसे होते? उदा. द्या.
11. कोणतीही तीन मूलभूत कर्तव्ये लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

III. गटात चर्चा करा उत्तरे द्या.

12. मूलभूत हक्कांचे महत्व.
13. शालेय परिसरात विद्यार्थ्यांनी पाळावयाची कर्तव्ये.
14. मानव हक्काचे महत्व.
15. मुलांच्या हक्काचे महत्व.



उपक्रम:

- मूलभूत हक्क व कर्तव्ये याबद्दल मुलाना एकदोन मिनिट भाषण करण्यास सांगा.
- नागरिकांकडून मूलभूत कर्तव्ये न केलेल्या प्रसंगाची माहिती मुलांकडून विचारून घेणे. उदा. गावच्या सार्वजनिक तलावात टाकावू वस्तू टाकतात. प्राचीन किल्ल्यांवर नावे लिहितात. मतदान न करणे.

© KBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 20 राष्ट्रीय एकात्मता

V9G1I3

पाठाचा परिचय

या पाठात राष्ट्रीय एकात्मता भारतीय विविधता, अनेकतेत एकता तसेच राष्ट्रीय एकतेबद्दल परिचय दिला आहे आणि राष्ट्रीय एकात्मतेला पोषक अंश, बाधक अंश याबद्दल चर्चा करण्यात आली आहे.

सामर्थ्ये

1 राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ समजून घेणे.
2 राष्ट्रीय एकात्मतेचे महत्व समजून घेणे.
3 भारतीय विविधतेबद्दल समजून घेऊन अभिमान बाळगणे.
4 विविधतेत एकतेची आवश्यकता जाणून घेणे.
5 राष्ट्रीय एकात्मतेला पोषक असणारे अंश ओळखणे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थः राष्ट्रीय एकात्मता म्हणजे एकाने दुसऱ्याबद्दल अथवा एका समाजाने दुसऱ्या समाजाबद्दल द्वेष, असूया आणि पूर्वग्रहदूषित असू नये, देशातील लोक आम्ही सर्व एक आहोत ही भावना असणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता.

एकाने दुसऱ्याचा गौरव करावा आणि परस्परांचा आदर करावा राष्ट्रातील सर्व नागरिक एकाच कुटुंबातील सदस्य ही भावना वाढीस लावणे. जात, मत, धर्म, लिंग असा भेदभाव न करता देशातील सर्व लोक एकच आहेत ही भावना वाढीस लावणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता.

एक सशक्त राष्ट्र निर्माण करण्यासाठी अशी भावना सर्वांमध्ये वाढीस लावणे आवश्यक आहे. सर्व भारतीय एकच आहेत ही भावना दृढ करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता.

महत्व: एका राष्ट्रातील जनतेमध्ये एकी निर्माण करण्यासाठी एकात्मता आवश्यक आहे. राष्ट्रहित साधण्यासाठी राष्ट्राची वृद्धी होण्यासाठी लोकांमध्ये आम्ही सर्व एकच आहोत अशी एकात्मतेची भावना निर्माण होणे आवश्यक आहे. देशाची अखंडता, बंधुता आणि समता यासाठी एकात्मता ही मुख्य प्रेरणा बनते.

भारतीय विविधता: भारत विविधतेने नटलेला देश आहे. भारताची विविधता ही येथील निसर्ग, सजीव, तसेच जनजीवनातील विविधतेत दिसून येते.

नैसर्गिक विविधता: भारतामध्ये अत्यंत उंच पर्वत श्रेणी, अति लांब नद्या तसेच विशाल मैदाने आहेत. त्याचप्रमाणे अति थंड व अति उष्ण प्रदेशसुद्धा आहेत. रणरणते वाळवंटही येथे आहे. घनदाट जंगल, शीतल सरोवरे, धबधबे, मनमोहक किनारपट्टी, शेकडो लहान लहान बेटे, ही निसर्गाने आम्हाला दिलेली देणगी आहे.

सजीवांची विविधता: भारतात सजीवांची विविधता भरपूर आहे. जगात इतकी सजीवांची विविधता आढळणारे देश क्वचितच आहेत.

आतापर्यंत 47,000 पेक्षा अधिक प्रकारच्या विविध वनस्पती येथे आढळल्या आहेत. येथे 90,000 पेक्षा अधिक प्रकारचे प्राणी आहेत. यामध्ये 1232 प्रकारचे पक्षी आणि 2546 प्रकारचे मासे यांचा समावेश आहे. रंगीबेरंगी जैविक संपदा हा भारताचा अमूल्य ठेवा आहे.

जनविविधता: विशाल अशा भारत देशात वेगवेगळ्या (समाजाचे) जातीचे लोक आहेत. त्यांचे रुप, शरीर रचना, भाषा, वेषभूषा, आहार, रितीरिवाज, आचार-विचार धर्म वेगवेगळे आहेत. आपल्या देशातील जनजीवनातील सौंदर्य - डोळे भरुन पाहायचे असल्यास संपूर्ण भारत फिरला पाहिजे.

विविधतेमध्ये एकता: वेगवेगळ्या भाषा संस्कृती आणि धर्म मानणाऱ्या लोकांच्या जीवन पद्धतीला विविधता म्हणतात. भारत हे विविधतेने नटलेले राष्ट्र आहे. United National Population Fund (संयुक्त राष्ट्रसंघाच्या लोकसंख्या निधी)21 एप्रिल 2023 रोजी प्रकट झालेल्या अहवालानुसार 2023 च्या मध्यापर्यंत भारत चीनला मागे टाकून जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल. सध्या तो जगामध्ये लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. आमचा देश भौगोलिक दृष्ट्या वैविध्यपूर्ण आहे. प्रत्येक नागरिक आपणाला

NOT TO BE REPUBLISHED © KTES

योग्य असलेल्या धर्माचे आचरण करू शकतो. प्रादेशिक भाषा बोलून समाजात एकत्रित गुण्यागोविंदाने राहतो. म्हणूनच भारतामध्ये या विविधतेत राहणाऱ्या लोकांमध्ये एकता दिसून येते. हे विविध भाषा संस्कृती आणि धर्मावर विश्वास ठेवणारे लोक इथे एकत्र राहतात. विभिन्न धर्म असलेल्या आपल्या देशात प्रत्येक नागरिक त्याच्या स्वतःच्या धर्माचे आचरण करू शकतात. या अशा विविधता असणाऱ्या देशात राहणाऱ्या लोकांमध्ये एकी असल्यामुळे विविधतेत एकता दिसून येते. आमच्या संविधानाने विविधता स्वीकारलेली आहे. विविधता ही देशाच्या एकतेसाठी बाधक नाही तर पोषक ठरते.

भारतात एकात्ममतेला पोषक अंश:

1. **धर्मनिरपेक्षता:** भारत एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. सर्वधर्म समभाव असलेले आहे. येथे सर्व धर्मांना समान संधी असल्यामुळे हे राष्ट्र एकात्मतेला प्रोत्साहन देते.

2. **प्रजासत्ताक:** भारत एक प्रजासत्ताक राष्ट्र आहे. येथे जात, धर्म, पंथ आणि स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता सर्वांना मतदानाचा हक्क पाहिजे असे तत्व संविधानाने अंगीकारले आहे. हा अंश देशाच्या एकात्मतेला पोषक आहे.

3. **राष्ट्रीय सण:** आमचे राष्ट्रीय सण आम्ही सर्व भारतीय एकत्र मिळून साजरे करतो. हे राष्ट्राच्या एकात्मतेच्या वृद्धीसाठी पूरक ठरते.

4. **आपली राष्ट्रीय चिन्हे:** आमची राष्ट्रचिन्हे असलेले राष्ट्रमुद्रा, राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज, राष्ट्रीय फूल, राष्ट्रीय पक्षी आणि राष्ट्रीय प्राणी इत्यादी सुद्धा आम्ही सर्व एक आहोत हे ओळखण्यास सहाय्यक ठरते.

5. **परस्पर सहकार्य:** केंद्र आणि राज्य सरकार समान ध्येय उद्देशानुसार कार्य करतात कोणीही संपूर्ण स्वावलंबी नसून राष्ट्राचा प्रत्येक भाग दुसऱ्या भागावर अवलंबून असतो. हा अंश देखील आम्ही सर्व एकाच राष्ट्राचे आहोत असे सूचित करतो.

इतकेच नसून जसे नैसर्गिक घटक, संपर्क जाळे, समूह माध्यमे, विविध संस्कृती, प्रांत, मते, भाषा इत्यादी वेगवेगळे असले तरी संपूर्ण राष्ट्राची जनता एकच अशी एकता दिसून येते.

© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

राष्ट्रीय एकात्मतेला आणि एकतेला बाधक अंश:

1. **जातीयता:** जातीयता म्हणजे दुसऱ्या जातीपेक्षा आपली जात उच्च मानणे. जातीयता ही देशाच्या एकात्मतेला बाधक आहे. ही जातीयता आज सर्व क्षेत्रामध्ये पसरली आहे. यामुळे संकुचित भावना वाढीस लागून जातीयता देशाच्या एकात्मतेला बाधक ठरते.

2. **धार्मिकवाद:** धर्माच्या श्रेष्ठतेच्या कारणासाठी संघर्षात उतरणे, धर्मासाठी भांडणतंटा करणे म्हणजेच धार्मिकवाद किंवा जातीय वाद होय. जातीयवाद समाजातील शांती भंग करतो. यामुळे जीवीत हानी आणि संपतीचा नाश होण्याचा संभव असतो इतकेच नाहीतर हा वाद लोकांच्यातील परस्पर प्रेम, सामंजस्य नष्ट करतो. वेगवेगळया लोकांमध्ये सामंजस्य नाहीसे करून हे देशाच्या प्रगतीस अडथळा निर्माण करतो.

3. **प्रादेशिक वाद:** संविधानानुसार आमची वेगवेगळी राज्ये असली तरी संघराज्य व्यवस्था असल्यामुळे प्रादेशिक भाषा, संस्कृती, प्रशासन व्यवस्था यांचे अस्तित्व महत्वाचे मानल्यामुळे राष्ट्राच्या अखंडतेला धोका निर्माण करणारा संकुचित प्रादेशिक वाद हितकारक नाही. आम्ही पहिला भारतीय त्यानंतर राज्य किंवा एका प्रदेशाशी संबंधित आहोत हे समजून घेतले पाहिजे. प्रादेशिक वाद हा प्रत्येकाचा वाद होऊ नये त्यावेळी तो राष्ट्राच्या अखंडतेला तीव्र धोका निर्माण करतो. प्रादेशिक विषमतेवर मात करण्याची संधी संविधानातच देण्यात आली आहे या पार्श्वभूमीवर प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठी कल्याण कर्नाटकाला 371(J) मान्यता दिली आहे आणि तेलंगणाला वेगळे राज्य घोषित केले आहे हे ओळखले पाहिजे.

राष्ट्रीय एकात्मतेला बाधक ठरणाऱ्या जातीयता, धार्मिक वाद आणि संकुचित प्रादेशिक वादावर मात केल्यास राष्ट्रीय एकात्मता वाढू शकते.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

अभ्यास

I. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे काय?
2. विविधता म्हणजे काय?
3. भारताच्या एकात्मतेसाठी पोषक अंशांची यादी करा.
4. जातीयवाद एकतेला कसा मारक ठरतो चर्चा करा.

II. गटात चर्चा करा उत्तरे द्या.

5. राष्ट्रीय भावैक्यता साधण्यासाठी कोणते निर्दिष्ठ उपाय करु शकतो?



उपक्रम:

- सध्या भारतात एकात्मतेच्या दृष्टीने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत याचे कारण काय? त्यावर उपाय कोणते? देशात एकात्मता कशी वाढवू शकतो याबद्दल चर्चा सत्र आयोजित करून सूचनांची यादी करा.

© BTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 21 राष्ट्रीय चिन्हे आणि राष्ट्रीय दिन

Y8L8P2

पाठाचा परिचय

या पाठामध्ये राष्ट्रचिन्ह, आपला राष्ठध्वज. राष्ट्रध्वजाची विशेषता, संहिता आपले राष्ट्रगीत, राष्ट्रीय गीत, राष्ट्रचिन्ह, राष्ट्रीय प्राणि, पक्षी आणि फूल, राष्ट्रीय सण आणि दिनोत्सव यांचा परिचय दिला आहे.

सामर्थ्ये

1. राष्ट्रध्वजाची विशेषता समजून घेणे.
2. राष्ट्रचिन्हांचे विवरण आणि महत्व समजून घेऊन त्याचा गौरव करणे.
3. राष्ट्रगीत आणि राष्ट्रीयगीत यांची पार्श्वभूमी आणि त्यांचे महत्व सम जून घेणे.
4. राष्ट्रीय सण व जयंती यांच्या आचरणाचे महत्व समजून घेणे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

राष्ट्रीय चिन्हे:

सामान्यपणे प्रत्येक देश आपली संस्कृती परंपरेची वैशिष्ट्ये प्रतिबिंबीत करण्यासाठी काही बोधचिन्हांचा अधिकृतपणे उपयोग करतात. त्यांना राष्ट्रीय बोघचिन्हे असे म्हणतात.

मुख्यत: राष्ट्रध्वज आणि राष्ट्रचिन्ह ही प्रत्येक देशाची राष्ट्रीय बोधचिन्हे असतात. राष्ट्रास आपले एक स्वतंत्र राष्ट्रगीत असते. काही देशात राष्ट्रीय प्राणी, राष्ट्रीय पक्षी आणि राष्ट्रीय फूल ही राष्ट्रीय बोधचिन्हे ठरलेली आहेत. नागरिकांमध्ये देशाभिमान, भावैक्यता यांची मुळे खोलवर रुजविण्यासाठी हे सर्व पोषक ठरतात.

आपला राष्ट्रध्वज:

राष्ट्रध्वज हा राष्ट्राचे एक बोधचिन्ह आहे. राष्ट्रध्वज स्वातंत्र्य, देशप्रेम, एकता आणि निष्ठेचे प्रतिक आहे. त्यांच्या दर्शनाने प्रजेमध्ये देशप्रेम, देशाभिमान, धैर्य, त्यागभावना प्रत्येकामध्ये प्रेरित होतात.

स्वतंत्र भारताचा तिरंगा ध्वज:

आपल्या भारताचा राष्ट्रध्वज तिरंगा असून सर्वात वर केशरी, मध्यभागी पांढरा आणि खाली गडद हिरवा हे रंग आहेत. पांढऱ्या रंगाच्या मध्यभागी नीलवर्णाचे चक्र आहे. या चक्रात 24 आरे आहेत. चक्राचा व्यास पांढऱ्या पट्टीच्या रुंदीइतकाच आहे.

राष्ट्रध्वज आयताकार आहे. त्याच्या लांबी रुंदीचे प्रमाण 3:2 इतके असते. तिन्ही रंगाच्या पट्ट्या समप्रमाणात असतात. ध्वजाचे कापड रेशमी किंवा खादी असावे. शिवाय ते कापड हातमागाचे असावे त्याचे सूत हातानेच तयार केलेले असावे.

राष्ट्रध्वजाची वैशिष्ट्ये:

आपल्या राष्ट्रध्वजातील तीन रंग काय सुचवितात? केशरी रंग धैर्य, त्याग व निस्वार्थतेचे प्रतिक आहे. पांढरा रंग सत्य, शांती व जीवनातील पावित्र्याचे प्रतिक आहे. हिरवा रंग आपल्या देशाच्या नैसर्गिक संपत्तीचे संकेत असून कृषी, औद्योगिकतेची समृद्धी आणि वैभवाचे प्रतिक आहे. राष्ट्रध्वजावरील चक्र सारनाथाच्या अशोकस्तंभातील चक्राचे प्रतिरुप आहे. अशोक चक्र हे धर्म चक्र आहे. आम्हाला प्रगतीपथावर पुढे निरंतर चालण्यास स्फूर्ती प्रदान करणारे हे धर्मचक्र आहे.



राष्ट्रध्वज

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

राष्ट्रध्वज संहिता:

- राष्ट्रध्वज मलीन किंवा फाटका असू नये.
- ध्वजारोहण करताना केशरी रंग वरच्या बाजूला येईल असे ध्वजारोहण करावे.
- राष्ट्रध्वजापेक्षा उंचावर दुसरा कोणताही ध्वज फडकविला जाऊ नये.
- ध्वजस्तंभाच्या वरच्या टोकापर्यंत ध्वज चढवावा.
- केव्हाही सूर्योदयानंतर ध्वजारोहण करावे आणि सूर्यास्ताच्या अगोदर ध्वज उतररावा व व्यवस्थित घडी घालून ठेवावा.

- राष्ट्रीय दुःखवटा आचरण करताना राष्ट्रध्वज ध्वजस्तंभाच्या अर्ध्यावर फडकवावा.
- पथसंचलनावेळी राष्ट्रध्वज उजव्या हातात धरावा.
- राष्ट्रध्वज जमिनीला लागू देऊ नये.
- प्लास्टिक ध्वजाचा वापर करु नये.

आपले राष्ट्रगीत (Our National Anthem)

'जन गण मन' हे भारताचे राष्ट्रगीत आहे. रविंद्रनाथ टागोर यानी 1911 साली बंगाली भाषेत या गीताची रचना केली. हे गीत दीर्घ अशा पाच कडव्यांचे आहे. त्यातील पहिल्या कडव्याचा संविधान समितीने 24 जानेवारी 1950 रोजी राष्ट्रगीत म्हणून अंगीकार केला. हे राष्ट्रगीत 52 सेकंदात गायिले पाहिजे. काही संदर्भात संक्षिप्तपणे राष्ट्रगीताच्या पहिल्या व शेवटच्या ओळी मात्र गायिल्या जातात. त्यास 20 सेकंद लागतात.

राष्ट्रगीताचा मान राखणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. राष्ट्रगीताचा अपमान करणे किंवा त्यामध्ये व्यत्यय आणणे हा अपराध शिक्षेस पात्र आहे.


- राष्ट्रगीत गाताना आपण ताठ व शिस्तीत उभे रहावे.
- योग्य चालीत, न चुकता हे गीत म्हणावे.

आपले राष्ट्रीय गीत (Our National Song)

संविधानामध्ये राष्ट्रगीताला समसमान स्थानमान असलेले गीत म्हणजे वंदे मातरम् हे राष्ट्रीयगीत. समारंभामध्ये प्रार्थना म्हणून आणि जन गण मन हे शेवटी मंगलस्त्रोत्र म्हणून गाईले जातात. वंदे मातरम् हे गीत प्रसिद्ध साहित्यिक बंकीम चंद्र चटर्जी यांच्या 'आनंदमठ' या कादंबरी मध्ये आहे. या गीताला स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रास्तवनाचा दर्जा मिळाला होता. देश प्रेम, आणि राष्ट्ररक्षणासाठी लोकांनी आपला जीव धोक्यात घालून शेवटच्या श्वासापर्यंत 'वंदे मातरम्' गाईले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

आमचे राष्ट्रचिन्ह:



राष्ट्रचिन्ह

आपल्या राष्ट्रचिन्हाचे निरीक्षण करा. हे सारनाथ येथील अशोकस्तंभाच्या वरच्या भागाची प्रतिकृती आहे. वर्तुळाकार आसनावर सिंह असल्यामुळे त्याला 'सिंहमुद्रा' असे म्हणतात. सारनाथ येथील सिंहमुद्रा ही आपल्या देशातील राष्ट्रचिन्ह किंवा राष्ट्रमुद्रा बनली आहे. सारनाथ येथील मूळ शिल्पकृती स्तंभावरील चार सिंह चार दिशेला तोंड करुन पाठीला पाठ लावून आहेत. स्तंभाचा पाया गोलाकार आहे. त्याच्या चारही दिशाना एक एक चाक आहे. त्या चक्राच्याम ध्ये हत्ती, बैल, घोडा, सिंह यांच्या प्रतिमा आहेत. स्तंभातील चक्राला धर्म चक्र असेही म्हणतात. आपल्या राष्ट्रध्वजावरील पांढऱ्या पट्टीच्या मध्यभागी हे चक्र आहे.

भारत सरकारने हे राष्ट्रचिन्ह 26 जानेवारी 1950 रोजी अंगीकारले आहे. या राष्ट्रचिन्हातील तीन सिंह मात्र दर्शनी दिसत आहेत. आसनावरील चक्राखाली देवनागरी लिपीत 'सत्यमेव जयते' (सत्याचा नेहमी विजय होतो) असे मुंडक उपनिषदातील वाक्य घेतले आहे.


© KRPS NOT TO BE REPUBLISHED

राष्ट्रीय प्राणी पक्षी आणि फूल

'वाघ' हा आपला राष्ट्रीय प्राणी आहे. शरीराने तो अत्यंत बळकट असून दिसायला आकर्षक आहे. 'मोर' हा आपला राष्ट्रीय पक्षी आहे. लाल आणि पिवळा रंग मिश्रीत पंख, डोक्यावर तुरा असलेला मोर हा अत्यंत मनमोहक पक्षी आहे. भारतीय परंपरेतील महत्वाचे राष्ट्रीय फूल कमळ आहे.



राष्ट्रीय प्राणी - वाघ



राष्ट्रीय पक्षी - मोर



राष्ट्रीय फूल - कमळ

राष्ट्रीय पंचाग: संपूर्ण भारतात अनेक प्रकारचे पंचांग वापरात आहेत. दैनंदिन जीवनामध्ये संपूर्ण राष्ट्रामध्ये एकाच प्रकारचे पंचांग लागू आहे, याची खात्री करण्यासाठी 22 मार्च 1957 रोजी 'राष्ट्रीय पंचांग' व्यवस्था सुरु केली. हे पंचांग तयार करण्यासाठी प्रसिद्ध दिवंगत शास्त्रज्ञ मेघनाथ शहा यांचा मोलाचा वाटा आहे. राष्ट्रीय दिनदर्शिकेत शक वर्ष स्वीकारले. शक वर्ष हे ख्रिस्त शकाच्या 78 वर्षानंतर सुरु होते. राष्ट्रीय पंचांगाची सुरुवात चैत्र महिन्यापासून सुरु होते. सामान्यपणे याची सुरुवात 22 मार्चला होते. मात्र लिप वर्षात ती 21 मार्च ला होते. भारत सरकार आपल्या पत्रव्यवहारात आणि दस्ताऐवज यामध्ये राष्ट्रीय दिनदर्शिकेतील तारीख आणि सामान्य शकेतील तारीख या दोहोचाही वापर करते.

राष्ट्रीय सण

देशाच्या सर्व प्रदेशामध्ये सार्वत्रिकपणे साजरे केले जाणारे सण म्हणजे राष्ट्रीय सण होय.

- **प्रजासत्ताक दिन:** 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय गणराज्याचे संविधान अंमलात आले. त्याच्या आठवणी करिता दरवर्षी 26 जानेवारी रोजी भारताचा प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. या रोजी विविध क्षेत्रामध्ये अतुलनीय सेवा बजावलेल्या व्यक्तिंचा सन्मान चिन्ह देवून गौरव केला जातो. प्रमुख अतिथीच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रपतीनी ध्वजारोहण केल्यानंतर पथसंचलनाला सुरुवात होते. देशाची राजधानी नवी दिल्ली येथे भव्य पथसंचलन होते. पथ संचलनात विविध राज्याव्दारे कार्यक्रम सादर केले जातात.




प्रजासत्ताक परेड (पथसंचलन)

© IBPS NOT TO BE REPUBLISHED

◆ **स्वातंत्र्य दिनः** आपल्या देशात दरवर्षी 15 ऑगष्ट रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करतात. दिल्लीमधील लाल किल्ल्यावर विशेष सोहळा साजरा केला जातो. स्वातंत्र्याची घोषणा झाल्या नंतर याच ठिकाणी तिरंगा ध्वज फडकविला गेला. त्याचप्रमाणे दरवर्षी याच ठिकाणी पंतप्रधानांच्या हस्ते लाल किल्ल्यावर ध्वजारोहण केले जाते. तेथे उपस्थित मान्यवर देशाला उद्देशून भाषणे करतात. स्वातंत्र्य दिन हा संपूर्ण देशात साजरा होणारा राष्ट्रीय सण आहे. संपूर्ण भारतामध्ये राष्ट्रध्वजारोहण, ध्वजवदंन हा कार्यक्रम साजरा केला जातो.

◆ **गांधी जयंतीः** मोहनदास करमचंद गांधी यांना जगामध्ये 'महात्मा' म्हणून ओळखले जाते. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य युद्धाला नवचैतन्य प्राप्त झाले.

@KTBS TO BE REPUBLISHED



महात्मा गांधी

त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी 02 ऑक्टोबर रोजी देशभरात गांधीजींचा जन्म दिवस साजरा केला जातो. विश्वसंस्थेनेही गांधीजीचा 2 ऑक्टोबर हा जन्मदिवस अंतरराष्ट्रीय अंहिसा दिन म्हणून घोषणा केली आहे. त्यांच्यासोबत याच दिवशी जन्मलेले लाल बहादूर शास्त्री यांचाही जन्मदिन साजरा केला जातो.

विशेष दिनोत्सव

◆ **आंबेडकर जयंती:** स्वतंत्र्य भारताची संविधान समर्पकपणे तयार करणाऱ्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म दिवस दरवर्षी 14 एप्रिल हा दिवस आंबेडकर जयंती म्हणून साजरा केला जातो. सामाजिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य निरर्थक असल्याचा डॉ बी. आर. आंबेडकर यांचा ठाम विश्वास होता. त्यांनी जातीभेदाचा अभ्यास केला आणि त्या नष्ट करण्यासाठी संघर्षाची रूपरेषा आखली. महद आणि कालाराम चळवळी उभारल्या. त्यांनी तीनही गोलमेज परिषदेच्या बैठकामध्ये भाग घेतला आणि बहुमूल्य अशा सूचना दिल्या.



डॉ बी.आर. आंबेडकर



डॉ.एस्. राधाकृष्णन



जवाहरलाल नेहरू



स्वामी विवेकानंद

© MKTBS NOT TO BE REPUBLISHED

◆ **शिक्षक दिन:** स्वतंत्र भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. एस् राधाकृष्णन हे प्रभावी व बुध्दीमान व्यक्तीमत्व होते. महान शिक्षक आणि तत्वज्ञानी असणारे राधाकृष्णन यांचा जन्म दिवस 5 सप्टेंबर हा 'शिक्षक दिन' म्हणून दरवर्षी साजरा केला जातो.

◆ **बालदिन:** स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा जन्म दिवस 14 नोव्हेंबर हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो. नेहरू हे निसर्गप्रेमी होते. त्यांना लाल गुलाबाचे फूल खूप आवडायचे. पंडित जवाहरलाल

नेहरू यांनी होमरूल चळवळीद्वारे स्वातंत्र्यलढ्यात प्रवेश केला.सा. श. 1929 मध्ये भरलेल्या लाहोर अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. औद्योगीकरण आणि नवभारताचे शिल्पकार असलेले भारताचे पहिले पंतप्रधान नेहरू यांना आपण पाहतो. स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजना आणि परराष्ट्र धोरण असलेल्या अलिप्त धोरणाचे व पंचशील धोरणाचे ते प्रतिपादक आहेत.

◆ **स्वामी विवेकानंद: राष्ट्रीय युवादिन:** स्वामी विवेकानंद (1863 - 1902) यानी तरुण पिढीला एक अद्‌भूत, चैतन्य देऊन संपूर्ण राष्ट्राला एका नवीन दिशेला घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. जातीधर्माच्या नावावर चाललेल्या अंधश्रध्दा यांचे खंडन करत क्रांतीकारक विचार मांडले. त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. स्वामी विवेकानंदानी संन्याशी जीवनाला समाज सेवेचे नवीन स्वरूप दिले. ''गरीब, अज्ञानी, अशिक्षित, रोगी हेच लोक आपले देव आहेत. त्यांची सेवा हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे असे समजा'', असे स्वामीजींनी आवाहन केले. केंद्र सरकारने त्यांचा जन्म दिवस (12 जानेवारी) हा 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून घोषित केला आहे. या निमित्ताने तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी कर्नाटक सरकारने नव युवनिती जाहीर केला आहे.

◆ **1 नोव्हेंबर कर्नाटक राज्योत्सव दिन:** बॉम्बे, मद्रास आणि हैदराबाद प्रांताम धील कन्नड प्रदेश आणि कोडगू प्रांताचा म्हैसूर प्रांतामध्ये समावेश करून 1 नोव्हेंबर 1956 रोजी कन्नड राज्याची स्थापना केली. त्यांचे म्हैसूर असे नामकरण करण्यात आले. त्याच्या आठवणीसाठी दरवर्षी 1 नोव्हेंबर रोजी कर्नाटक राज्योत्सव मोठया-आनंदात साजरा केला जातो. 1 नोव्हेंबर 1973 पासून तत्कालीन मुख्यमंत्री देवराज अर्स यांनी म्हैसूर राज्याचे 'कर्नाटक राज्य' असे नामकरण केले.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. आपल्या राष्ट्रध्वजातील पांढरा रंग _____ चे प्रतीक आहे.
2. राष्ट्रीय गीत _____ यांनी लिहिले.
3. मैसूरु राज्याचे कर्नाटक असे _____ मध्ये नामकरण करण्यात आले.
4. लाल किल्ल्यावर _____ हे ध्वजारोहण करतात.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

5. राष्ट्रीय चिन्हे कोणकोणती आहेत?
6. राष्ट्रध्वज संहितेमध्ये कोणते अंश आहेत.
7. राष्ट्रीय सण कोणकोणते?
8. शाळेत आचरण करण्यात येणाऱ्या विशेष दिनोत्सवांची नावे लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम:

- सध्या भारतात एकात्मतेच्या दृष्टीने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत याचे कारण काय? त्यावर उपाय कोणते? देशात एकात्मता कशी वाढवू शकतो याबद्दल चर्चा सत्र आयोजित करून सूचनांची यादी करा.
- विविध देशातील राष्ट्र ध्वजांचा संग्रह करा.
- दुसऱ्या राष्ट्रांच्या राष्ट्रगीतांचे श्रवण करा.
- राष्ट्रीय गीत तोंडपाठ करून ते म्हणा.
- तुमच्या गावामधील साजरे करणाऱ्या स्थानिक सणांबद्दल माहिती करून घ्या.

भूगोल

पाठ 22 आशिया खंड

E4W2N7

पाठाचा परिचय

आशिया खंडाचे स्थान, विस्तार आणि भौगोलिक रचना, प्रादेशिक विभाग, स्वाभाविक विभाग, प्रमुख नद्या आणि शेती, हवामान आणि वनस्पती, प्रमुख खनिजे, लोकसंख्या वाढ, विभागणी आणि घनता याबद्दलचा परिचय या पाठात दिला आहे.

सामर्थ्ये

1. आशिया खंडाचे स्थान, विस्तार, भौगोलिक रचना आणि वैविध्यतेची लक्षणे समजून घेणे.
2. प्रादेशिक विभागाची विभागणी आणि त्यांच्यामधील साम्य समजून घेणे.
3. आशियाच्या प्रमुख स्वाभाविक विभागाबद्दल माहिती समजून घेणे.
4. नद्यांची व्यवस्था आणि शेती यामधील संबंध समजून घेणे.
5. हवामान आणि नैसर्गिक वनस्पती यामधील संबंधाबद्दल माहिती सम जून घेणे.
6. प्रमुख खनिज संपती, त्यांची विभागणी, लोकसंख्येची वाढ, लोकसंख्या विभागणी आणि लोक संख्येची घनता याविषयी समजून घ्याल.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1. स्थान, विस्तार आणि भौगोलिक स्थान

परिचय: जगात आशिया खंड मोठा आहे. त्यामुळे येथील स्वाभाविक लक्षणे, हवामान, वनस्पती, वन्यप्राणी, मातीचे प्रकार इत्यादीमध्ये विविधता दिसून येते. या खंडामध्ये अति उंच पर्वत, विशाल व सुपीक मैदाने, वाळवंटी प्रदेश, नद्यांची मैदाने आणि सरोवरे दिसून येतात. त्याचप्रमाणे भाषा, धर्म, लोकसंख्येची विभागणी आणि लोकसंख्येची घनता यामध्येही आम्हाला विविधता आढळून येते. त्यामुळे आशिया 'वैविध्यपूर्ण खंड' म्हणून ओळखला जातो.

कृती: आशिया खंड वैविध्यपूर्ण खंड कसा आहे. हे नकाशात पाहून चर्चा करा.

स्थान: आशिया खंड 1^0-$16'$ उत्तर पासून 77^0- $41'$ उत्तर अक्षांश आणि 26^0-$04'$ पूर्वेपासून 169^0 - $40'$ पश्चिम रेखांश यांच्यामध्ये विस्तारलेला आहे. मलेशियाच्या थोडे दक्षिणेला विषुववृत्त आहे. कर्कवृत भारत आणि अरेबियातून गेले आहे.

विस्तार: आशिया खंडाचा एकूण भौगोलिक विस्तार सुमारे 44 मिलियन चौ. कि. मी. आहे. हा जगाच्या संपूर्ण विस्तारापैकी 33% भागाएवढा आहे. हा खंड पूर्णपणे उत्तर गोलार्धात आहे.

भौगोलिक रचना: आशिया खंड तीन बाजूने समुद्र आणि एका बाजूस जमिनीने वेढलेला आहे. भोवताली असलेले समुद्र म्हणजे उत्तरेला आर्क्टिक महासागर, पूर्वेला पॅसिफिक महासागर आणि दक्षिणेला हिंदूमहासागर, पश्चिमेला युरोपखंड आहे.

आशिया आणि युरोप खंडाची सीमा सांप्रदायाप्रमाणे काल्पनिक रेषा असून ती वेडीवाकडी आहे, आणि युरल पर्वत, कॅस्पियन समुद्र, ककासस पर्वत आणि तांबडा समुद्रामार्गे ओलांडून जाते.

© KTRS NOT TO BE REPUBLISHED



जगात आशियाचे स्थान

युरोप आणि आशिया खंडाला मिळून युरेशिया असे म्हणतात.



आशियाचे स्थान आणि भौगोलिक विस्तार

© MSCERT NOT TO BE REPUBLISHED


आशिया आणि आफ्रिकेची सीमारेषा सामान्यपणे सुवेझ कालव्यामार्गे व आशिया आणि ऑस्ट्रेलियाची सीमारेषा न्युगिनी आणि ऑस्ट्रेलियाच्या मधून जाते.

2. आशियाचे स्वाभाविक विभाग

आज आशिया खंडामध्ये 48 देश आहेत. ते खालील प्रमाणे पाच स्वाभाविक विभागामध्ये विभागलेले आहेत.

1. **पूर्व आशिया:** यामध्ये चीन, उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया, जपान, हाँगकाँग, तैवान आणि मंगोलिया देश येतात. हे उत्तरेकडे विशाल असा रशिया, दक्षिणेकडे दक्षिण आशिया आणि आग्नेय आशिया यांच्या मध्ये विस्तारलेले आहेत.

2. **आग्नेय आशिया:** यात मॅनमार, लाबोस, व्हिएतनाम, थायलंड, कंबोडिया, मलेशिया, इंडोनेशिया, सिंगापूर, बुन्हे आणि फिलिपाईन्स देश यांचा समावेश आहे. हे एक द्वीपकल्प आहे. हा बेटांच्या समुहाचा प्रदेश. उदाहरण - सुमात्रा, जावा, सुलावेशी, बोर्निया, पापूव इत्यादींच्या पश्चिमेला हिंदूमहासागर आणि पुर्वेला पॅसिफिक महासागर आहे.



आशियाचे स्वाभाविक विभाग

NOT TO BE REPUBLISHED © MKCL

3. **दक्षिण आशिया:** यात भारत, बांग्लादेश, भूतान, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका आणि मालदीव देश आहेत. यामध्ये भारत सर्वात मोठा देश आहे. भारताच्या दक्षिणेला हिंदूमहासागर आणि त्याचा उपभाग असलेले बंगालचा उपसागर व अरबी समुद्र यांनी वेढले आहे. उत्तरेला हिमालयाच्या पर्वतरांगा, पूर्वेला म्यानमार आणि पश्चिमेला अफगाणिस्तान आहे.

4. **नैऋत्य आशिया:** अफगाणिस्तान, बऱ्हेन, सैंप्रस, इराण, इराक, इस्त्राईल, जॉर्डन, कुवैत, लेबनॉन, ओमान, कतार, सिरिया, पॅलेस्टाईन, सौदीअरेबिया, अरब अमिराती, येमन आणि टर्की देश या विभागात येतात. हा विभाग तांबडया समुद्राच्या दक्षिण भागात असून पश्चिमेला भूमध्य समुद्र आणि पूर्वे ला भारत यांच्या मध्ये विस्तारलेला आहे. हा जास्तीजास्त वाळवंटी आणि कमी वाळवंटी भागानी बनलेले असला तरी, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू (गॅस) यांनी समृध्द आहे.

5. **मध्य आशिया:** हा कॅस्पियन समुद्रापासून चीन पर्यंत आणि कझाकिस्तान पासून इराण - अफगाणिस्तान पर्यंत विस्तारलेला आहे. या विभागातील प्रमुख देश म्हणजे कझाकिस्तान, किर्गिझस्तान, तजाकिस्तान, तुर्कमेनिस्तान, आणि उज्बेकिस्तान आणि सैबिरिया (रशिया).

3. स्वाभाविक विभाग

आशियाच्या स्वाभाविक विभागामध्ये उंच पर्वताच्या रांगा हे प्रमुख भूप्रदेश आहेत. सोबत विविध पठारी प्रदेश, पर्वतमय प्रदेश, मातीची मैदाने आणि व्दीप समुहांनी सामावलेला आहे.

प्रमुख स्वाभाविक विभाग : भू-रचना आणि भौगोलिक परिस्थितीच्या आधारावर आशिया खंड पाच प्रमुख स्वाभाविक विभागात विभागलेला आहे.

1. वायव्येकडील सखल मैदाने.
2. मध्यभागातील पर्वतमय प्रदेश.
3. दक्षिणेकडील पठारी प्रदेश.
4. नद्यांचा विशाल मैदानी प्रदेश.
5. बेटांच्या समुहाचा प्रदेश.

© MPBSTB NOT TO BE REPUBLISHED

1. **वायव्येकडील सखल मैदाने:** हाविभाग आशियाच्या स्वाभाविक विभागाम ध्ये अत्यंत महत्वाचा आहे. बेरींगच्या सामुद्रधुनीपासून कॅस्पियन समुद्रापर्यंत विस्तारलेला आहे. मध्य भागातील पर्वतमय प्रदेश आणि आर्क्टिक महासागर यांच्या मध्ये दिसून येतो. त्रिकोणी आकार असलेल्या विशाल सखल मैदानाला "सैबिरिया मैदान" असे म्हटले जाते. उत्तरेला साधारण उतार भाग आहे. या मैदानातून कांही नद्या वाहतात. उदा: लीन, ओब आणि येन्सी. या उत्तरेकडे वाहत जाऊन आर्क्टिक महासागराला मिळतात.




माऊंट एव्हरेस्ट

2. **मध्यभागातील पर्वतमय प्रदेश:** हा आशियाच्या दुसऱ्या क्रमांकाचा अत्यंत महत्वाचा स्वाभाविक विभाग आहे. वायव्येकडील सखल मैदानाच्या दक्षिण भागात आहे. मध्य आशियामध्ये असलेल्या पर्वतरांगाना "मध्यभागातील पर्वतमय प्रदेश" असे म्हणतात. हा आशिया मायनर पासून बेरींग सामुद्रधुनी पर्यंत विस्तारलेला आहे. येथे अनेक पर्वतरांगा पामीर ग्रंथी पासून सगळीकडे पसरलेल्या आहेत. पूर्व दक्षिण रांगामध्ये, हिमालय, कुनलून, काराकोरम, टियेनशान, आल्टाय, सयान, यब्लोनी, किंगान आणि स्टानवाय पर्वतश्रेणी मुख्य आहेत. पश्चिम श्रेणी मध्ये हिंदुकुश, किर्तार, सुलेमान, एल्बर्ज, जाग्रोस, ककासस, पोटीन आणि तारस पर्वतश्रेणी यांचा समावेश आहे.

घडीचे पर्वत हिमालय श्रेणीच्या पामीर ग्रंथीपासून आग्नेयेला पसरले आहे. ते जगातील अति उंच पर्वत आहेत. येथील माऊंट एव्हरेस्ट हे जगातील सर्वात उंच शिखर आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

या पर्वत रांगामध्ये अनेक पठारी प्रदेश आहेत. उदा: तिबेट, मंगोलिया, इराण, अनटोनिया पठारी प्रदेश इत्यादी. आशिया खंडातील अनेक नद्या उत्तर भागामध्ये उगम पावल्या आहेत



स्वाभाविक विभाग

3. **दक्षिणेकडील पठारी प्रदेश:** हा कठीण आणि स्फटीक दगडापासून तयार झालेला पुरातन पठारी प्रदेश आहे. त्यामधील प्रमुख प्रदेश म्हणजे अरेबिया, दख्खन (भारत) युन्नान (चीन) आणि शान (म्यानमार) ही प्रसिद्ध पठारे आहेत. अरेबियाचा पठारी प्रदेश हा एक द्वीपकल्प असून तो कोरडा प्रदेश आहे.

दख्खन पठारी प्रदेशाने भारताच्या द्वीपकल्पाचा जास्त भाग व्यापलेला आहे. भारतातील पर्वताच्या रांगा पश्चिमघाट आणि पूर्वघाट यामध्ये आहेत. पूर्व दिशेला उतार आहे. त्या कारणाने अनेक नद्या पूर्वदिशेला वाहतात.

चिनच्या नैऋत्येला युन्नान पठारी प्रदेश आहे. हा एक उत्तम प्रतीचा चुनखडीचा प्रदेश आहे. याचा पुढचा भागच शान (मॅनमार) चे पठार होय.

4. **नद्यांचा विशाल मैदानी प्रदेश:** हिंदू महासागर अथवा पॅसिफिक महासागराला मिळालेल्या कित्येक नद्या याच मैदानातून वाहतात. येथील वाहणाऱ्या नद्यामुळे पाण्याबरोबर येणारा गाळ साठून सुपीक मैदाने तयार झाली आहेत. या प्रदेशातील मैदाने म्हणजे सिरिया आणि इराकमधील तैग्रीस - युफ्रेटीस नद्यांची मैदाने, भारत व पाकिस्तानमधील सिंधू, गंगा नद्यांची मैदाने, म्यानम ारमधील इरवडी, इन्डोचायनामधील मिनाम व मिकांग चीनच्या चियांग जीयांग (यांगत्स), तसेच सिकीयांग व होयाँगहो नद्यांची मैदाने. या सर्व भागात दाट लोकवस्ती आहे.

5. **बेटांचा समुह प्रदेश:** आशिया खंडातील आग्नेय आणि पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्याला अनेक बेटांचे द्वीपसमुह आहेत. या उत्तरेकडील कमचटक पासून दक्षिणेकडील फिलिपाईन्स आणि बोर्निया रांगापर्यंत पसरले आहेत. ते पाच समुद्रानी वेढलेले आहे. उदा: ओकाटक समुद्र, जपान समुद्र, हळदी समुद्र, पूर्वचीन समुद्र आणि दक्षिणचीन समुद्र.

प्रमुख द्विपसमुह: क्युरेल, जपान, लाचू, फिलिपाईन्स आणि बोर्नीयो, याम धील जास्तीत जास्त ज्वालामुखी पासून तयार झाले आहेत. याचबरोबर सुपीक माती, खोल दऱ्या आणि शंखाकृती पर्वतांचा समावेश आहे.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

4. प्रमुख नद्या आणि शेती

आशियातील प्रमुख नद्या: आशिया खंडातील नद्याच्या जाळ्यामध्ये विविधता आहे. या खंडातील नद्यावरती स्वाभाविक विभाग आणि जलप्रवाहांचा अधिक प्रभाव पडतो. आर्क्टिक महासागर, पॅसिफिक महासागर आणि हिंदूमहासागराने आशिया खंडाला वेढले आहे. या खंडातून वाहणाऱ्या जास्तीत जास्त नद्या या सागरानाच जाऊन मिळतात. अशाप्रकारे महासागराना जाऊन मिळणाऱ्या नद्यांच्या आधारे आशियातील नद्यांचे चार भाग पडतात.

1. **हिंदू महासागराला जाऊन मिळणाऱ्या नद्या:** यातील मुख्य नद्या सिरिया आणि इराक देशातील तैग्रीस आणि युप्रेटीस नद्या पर्शियाच्या खाडीला जाऊन मिळतात. पाकिस्तान आणि भारतातील सिंधू, गंगा आणि ब्रम्हपुत्रा या नद्या हिमालयात उगम पावून दक्षिणेकडे वाहत जाऊन हिंदू महासागराला मिळतात. म्यानमार मधील सिट्यांग, साल्वीन आणि इरावटी नद्या बंगालच्या उपसागराला जाऊन मिळतात.

2. **पॅसिफिक महासागराला जाऊन मिळणाऱ्या नद्या:** या समुहातील रशियातील अमर, चीनची हो-यांग हो, चियांग जियांग (यांगत्से) आणि सिकीयांग नद्या पूर्वेकडे वाहत जाऊन अनुक्रमे ओकोटस्क, हळदी समुद्र आणि चीनच्या समुद्राला जाऊन मिळतात. इंडोचिनमधील मिनाम आणि मिकांग नद्या दक्षिणचीन समुद्राला जाऊन मिळतात.

3. **आर्क्टिक महासागराला जाऊन मिळणाऱ्या नद्या:** ओब, येन्सी आणि लीन या भागातील प्रमुख नद्या आहेत. या नद्या मध्यभागातील भागावर उगम पावून उतरेकडे वाहत जाऊन आर्क्टिक महासागराला मिळतात.

4. **अंतर्गत नद्या:** या समुहामध्ये असलेल्या नद्या अंतर्गत समुद्राला जाऊन मिळतात. उदा: व्होल्गा आणि युरल नद्या कॅस्पियन समुद्राला आणि आमुदरीय आणि सिरदरिया नदी अरल समुद्राला जाऊन मिळतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



आशियातील नद्यांची व्यवस्था

आशियातील शेती

शेती हा आशियातील प्रमुख व्यवसाय आहे. यथील 3/4 लोक शेती करतात. आशियातून जास्तीत जास्त प्रमाणात कृषी उत्पादने निर्यात होतात.

आशिया खंडातील शेती आणि नद्या यांचा जवळचा संबंध आहे. सैबेरिया सोडून उरलेली जास्तीत जास्त शेती नदी मैदानी प्रदेशात वसलेली आहे. याला येथील सुपीक माती आणि पाणी पुरवठ्याच्या सोई कारणीभूत आहेत.

आशियातील अनेक देशामध्ये शेतकरी मशागतीसाठी हाताने तयार केलेली उपकरणे आणि प्राणी यांचा उपयोग करतात. अलिकडे ते आधुनिक (Intensive) पध्दतीचा अवलंब करत आहेत.

प्रचलित असलेल्या पध्दती क्रमशः पाण्याची शेती, कोरडी शेती, बागायतीशेती, मिश्र शेती, स्थलांतरित शेती इत्यादी. अलिकडे आधुनिक शेतीची अवजारे (उपकरणे) रासायनिक खते, अधिक उत्पन्न देणाऱ्या बियाणांचा वापर इत्यादी पद्धतीचा अवलंब आशियातील काही देशामध्ये जास्त प्रमाणात होत आहे. तरी सुद्धा आजही अनेक देशामध्ये काही कारणामुळे उत्पन्न कमी आहे.

© MTBS NOT TO BE REPUBLISHED

पिके



भाताचे पीक

आशिया खंडामध्ये विविध प्रकारची पिके दिसून येतात. भात आणि गहू ही प्रमुख आहार धान्य पिके आहेत. चीन आणि भारत हे भात पिकविणारे प्रमुख देश असून जगातील एकूण भाताच्या उत्पादनापैकी 90% उत्पादन येथे करतात. जपान, बांग्लादेश, थायलंड आणि अग्नेय आशिया हे भात पिकविणारे इतर प्रमुख देश आहेत. चीन, भारत, पाकिस्तान आणि रशिया हे गहू पिकविणारे प्रमुख देश आहेत.

आशिया जगात रबर आणि चहा उत्पादनामध्ये अग्रेसर आहे. इंडोनेशिया, मलेशिया आणि थायलंड हे रबर पिकविणारे प्रमुख देश आहेत. चहा पिकविणारे प्रमुख देश म्हणजे चीन, इंडोनेशिया, मलेशिया, भारत आणि थायलंड होत.



चहाचे मळे



कॉफीचे मळे

आशिया खंडातील इतर पिके: म्हणजे कापूस, ताग आणि ऊस होय. चीन, भारत, पाकिस्तान, टर्की, तुर्कस्तान आणि उझबेकिस्तान हे कापूस पिकविणारे प्रमुख देश आहेत. बांग्लादेश, चीन आणि भारतात तागाचे उत्पादन होते. ऊसाचे पीक जास्त करून भारत, इंडोनेशिया, फिलिपाईन्स आणि बांग्लादेशात दिसून येते. जगात ऊस पिकविण्यात भारताचा दुसरा क्रमांक लागतो.

कॉफी, कोकम, विविध तृणधान्ये (राळा, नाचणा, बाजरी) इ. तसेच द्विदल धान्ये, तेलबिया, मसाल्याचे पदार्थ इ. उत्पादने करण्यासाठी आशिया खंड प्रसिद्ध आहे.

NOT TO BE REPUBLISHED

5. हवामान आणि नैसर्गिक वनस्पती

हवामान: आता सांगितल्याप्रमाणे आशिया खंडाचा विस्तार विशाल आहे. दक्षिणेकडील भूमध्य रेषेपासून ध्रुवीय प्रदेशापर्यंत विस्तारलेला आहे. परिणामी त्यामुळे आशिया खंडाच्या विविध भागामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे हवामान दिसून येते. आशियातील काही भागामध्ये जगातील अत्यंत थंड (ध्रुवीय भागातील) हवामान दिसून येते. तर काही भागात अति उष्ण हवामान (मध्यभागी आणि नैऋत्येला) आहे. तसेच अती उष्ण आणि अधिक पाऊस पडणारी ठिकाणे सुद्धा दिसून येतात. आशियाच्या हवामानातील विविधतेला काही गोष्टी कारणीभूत आहेत. उदा. विशाल विस्तार, अक्षांशाचा विस्तार, स्वाभाविक विभाग, मान्सून वारे इत्यादी.




वार्षिक तापमान विभागणी

© KTRSS NOT TO BE REPUBLISHED

तापमान: सामान्यपणे वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या कालावधीमध्ये हवामानात फरक पडतो. जानेवारी महिन्यामध्ये दक्षिणेकडील देशापेक्षा उत्तरेकडील देशामध्ये हवामान अतिशय थंड असते. सैबेरियातील वर्कोयानस्क हे अति थंडीचे ठिकाण आहे. जुलै महिन्यामध्ये सैबेरियातील उत्तर भाग आणि मध्य आशियातील उंच पर्वत आणि पठारी प्रदेश सोडून आशियाच्या बहुतेक भागात उष्णता जास्त असते. काही भागामध्ये तापमान 40^0 सेल्सियस पेक्षा जास्त असते.

पावसाळा: आशिया खंडात नैऋत्य मान्सून वाऱ्यापासून उन्हाळ्यामध्ये जादा पाऊस पडतो. परंतु मान्सूनचे वारे मध्य आशिया पर्यंत पोहचत नाहीत. तो भाग वर्षभर कोरडाच असतो. पश्चिम आशियातील देशामध्ये पश्चिमी वाऱ्यापासून (प्रती व्यापारी) पाऊस पडतो आणि चीनचा पूर्व भाग आणि फिलिपाईन्स, मलेशिया इत्यादी देशामध्ये उष्ण प्रदेशातून वाहणाऱ्या आवर्त वाऱ्यापासून पाऊस पडतो.



वार्षिक पावसाची विभागणी

© SKIBS NOT TO BE REPUBLISHED

हिवाळा: आशिया खंडाच्या जास्तीत जास्त भागामध्ये ऑक्टोबर पासून मार्चपर्यंत हिवाळा असतो. आशियाचा जास्त भाग उत्तर गोलार्धात आहे. या काळात उत्तरगोलार्धावर सूर्याची किरणे तिरपी पडतात. याचा परिणाम म्हणजे आशियाच्या बहुतेक भागात उष्णता अत्यंत कमी असून अति थंड हवामान असते.


मध्य आशियामध्ये वाऱ्याचा दाब जास्त आणि हिंदूमहासागरामध्ये वाऱ्याचा दाब कमी असतो. त्यामुळे जमिनीकडून समुद्राकडे वारे वाहतात. ते वारे कोरडेच असतात. ते पाऊस घेऊन येत नाहीत. म्हणून हिवाळ्यात पाऊस कमी पडतो.

उन्हाळा: हिवाळ्याच्या विरुद्ध उन्हाळ्यात परिस्थिती असते. याची सुरुवात एप्रिल मध्ये होते आणि सप्टेंबर मध्ये संपते. या काळात उत्तर गोलार्धात सूर्याची किरणे लंब रूपाने पडतात. त्यामुळे आशियाच्या जास्त भागामध्ये उष्णता अधिक असते आणि मध्य आशियात त्याची तीव्रता कमी असते. या काळात समुद्रावरून जमिनीकडे वारे वाहतात. ते कमी जास्त प्रमाणात आशिया खंडात सगळीकडे पाऊस पाडतात.

- जानेवारी महिन्यामध्ये सैबेरियाच्या वर्कोयानस्क येथे 51° से. आणि ओमियाक्नी या ठिकाणी 71° से. कनिष्ठ तपमानाची नोंद होते.
- भारताच्या मेघालय राज्यातील मासिनराम येथे जगात सर्वात जास्त पाऊस पडतो. (1187 सें. मी.)

नैसर्गिक वनस्पत्ती: आशिया खंडातील नैसर्गिक वनस्पती आणि हवामान यामध्ये परस्पर संबंध आहेत. जमिनीचे स्वरूप (भूस्वरूप) माती आणि मानवाचा हस्तक्षेप यांचा सुद्धा वनस्पतीचे प्रकार आणि विभागणी यावर प्रभाव पडतो. आशिया खंडातील वनस्पती मध्ये विविधता आढळून येते. त्यांचे सात प्रकारामध्ये वर्गीकरण करू शकतो.

@KTRS NOT TO BE REPUBLISHED



नैसर्गिक वनस्पती विभाग

1. **टंड्रा प्रदेशातील वनस्पती:** या वनस्पती अरुंद व लांब अशा आर्क्टिक किनारपट्टीच्या प्रदेशात आढळतात. येथील बहुतेक भाग हिमकण आणि बर्फाने अच्छादलेला असतो. त्यामुळे तेथे फक्त शेवाळ आणि दगडफूल या वनस्पती आढळतात.



तैगा अरण्ये

2. **सूचीपर्णी अरण्ये (कोनीफेरस अरण्ये):** सूचीपर्णी अरण्ये टंड्रा प्रदेशात आढळतात. त्याना 'तैगा अरण्ये' असेही म्हणतात. फर, स्प्रूस, लार्च, देवदार, पाईन इ. येथे आढळणाऱ्या मुख्य वनस्पती आहेत. या मऊ जातीच्या लाकडाच्या जातीच्या वनस्पती आहेत.

© KTES NOT TO BE REPUBLISHED

3. **समशीतोष्ण कटिबंधातील गवताळ कुरणे (स्टेपीस):** ही मध्य आशिया व वाळवंटी प्रदेश आणि ओसाड भागातील काही भागामध्ये आढळतात. पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे कमी उंचीचे गवत येते.

4. **वाळवंटी वनस्पती:** अशा प्रकारच्या वनस्पती उष्ण कटिबंध व समशीतोष्ण कटिबंधातील ओसाड जमिनीवर आढळतात. उदा. अरेबिया, इराण, थरचे वाळवंट इ. ठिकाणी आढळतात. येथे फक्त काटेरी झुडपे, निवडुंग आणि खुरटे गवत उगवते. ओयासिस जवळ खजूर आणि ताडाच्या जातीच्या वनस्पती आढळतात.

5. **मान्सून अरण्ये:** ही अरण्ये आशिया खंडाचा दक्षिण व नैऋत्य भाग आणि पूर्व आशियाच्या काही भागात आढळतात. येथे अति उष्णता आणि अति पाऊस पडत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अरण्ये आढळतात. साग, साल, शिसव, चंदन, बांबू आणखीन काही हार्डवूड (घट्ट) जातीच्या वनस्पती येथे वाढतात. त्यांची शरद ऋतूमध्ये पाने झडतात.

6. **विषुववृत्त प्रदेशातील अरण्ये:** ही अरण्ये पूर्व इंडीस आणि अधिक पाऊस पडणाऱ्या मान्सून प्रदेशात जास्त प्रमाणात आढळतात. ही अरण्ये सदाहरित अरण्ये आणि उंच वाढणाऱ्या वनस्पतीच्यामुळे तयार झाली आहेत. येथे वाढणाऱ्या प्रमुख वनस्पती म्हणजे महोगनी, एबोनी, रबर, बांबूची बेटे इत्यादी होय.



मान्सून अरण्ये

7. **मेडिटरेनियन वनस्पती:** या वनस्पती आशिया खंडाच्या नैऋत्य भागात आढळतात. येथे ऑलीव, ओक, सायप्रस, फिग जातीची झाडे आणि खुरटया वनस्पती वाढतात. ही झाडे कमी उंचीची असतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

6 प्रमुख खनिजे

लोखंड: लोखंडाची खनिजे ही लोखंड आणि पोलाद तयार करण्यासाठी लागणारा अत्यावश्यक कच्चा माल आहे. आशिया खंडात भरपूर लोखंडाची खनिजे असून जगातील 30% एवढे खनिजांचे साठे येथे आहेत. चीन हा लोखंडाची खनिजे उत्पादन करणारा प्रमुख देश आहे. भारत, टर्की, फिलिपाईन्स, मलेशिया, थायलंड, इंडोनेशिया, म्यानमार, व्हिएतनाम, कझाकिस्तान आणि पाकिस्तान हे लोखंड उत्पादन करणारे इत्तर प्रमुख देश आहेत. कोरिया, तैवान, श्रीलंका, जपान आणि नैर्ऋत्य आशियामधील राष्ट्रामध्ये अल्प प्रमाणात लोखंडाची खनिजे आढळतात.



विषुव वृत प्रदेशातील अरण्ये



प्रमुख खनिजे

© TOKTEBS NOT TO BE REPUBLISHED

मॅगनीज: हे एक लोहमिश्रित खनिज आहे. उच्च प्रतीचे पोलाद तयार करण्यासाठी हे अत्यावश्यक आहे. आशिया खंडात अधिक प्रमाणात मॅगनीजचे साठे आहेत. हे साठे ट्रान्स, ककासस, मध्य आशिया, सैबेरिया, चीन आणि भारतात मोठया प्रमाणात आढळतात. मॅगनीज उत्पादनामध्ये चीन अग्रेसर आहे.

बॉक्साईट: आशिया हा बॉक्साईटचे भरपूर साठे असणारा खंड आहे. हे साठे कझाकिस्तान आणि दक्षिण मध्य सैबेरिया मध्ये मोठया प्रमाणात मिळतात. त्याचप्रमाणे भारत, इंडोनेशिया, टर्की, मलेशिया, चीन देशामध्येही भरपूर बॉक्साईट मिळते.

दगडीकोळसा: दगडी कोळसा हे ज्वालाग्रही इंधन आहे. हे एक शक्तीचे उगम स्थान आहे. आशिया खंडामध्ये भरपूर प्रमाणात दगडी कोळसा सापडतो. परंतु ते ठिकठिकाणी कमी जास्त प्रमाणात आढळतात. दगडी कोळशाचे साठे चीन, भारत, इंडोनेशिया, सैबेरिया आणि मध्य आशियातील देशामध्ये अधिक प्रमाणात आढळतात.

जगामध्ये भरपूर प्रमाणात दगडी कोळशाचे साठे असणाऱ्या आणि उत्पादन करणाऱ्या देशामध्ये चीनचा जगात प्रथम क्रमांक लागतो. चीनच्या सर्व भागामध्ये (प्रांतामध्ये) दगडी कोळसा सापडतो. दगडी कोळशाच्या उत्पादनामध्ये आशिया खंडात भारत दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. सध्याच्या काळात सैबेरियामधील कुजे नेटसच्या आसपासचा भाग दगडी कोळशाचे उत्पादन करतो. उझबेकिस्तान, किर्घिस्तान, तजाकिस्तान, पाकिस्तान आणि जपान या देशामध्ये थोड्या प्रमाणात दगडी कोळशाचे साठे आढळतात.

पेट्रोलियम: पेट्रोलियम हे एक तेल इंधन आहे. स्वयंचलित वाहने, रेल्वे, जहाज आणि विमान याना लागणारे हे शक्तीचे साधन आहे. नैर्ऋत्य आशियामध्ये पेट्रोलियमचे भरपूर साठे आहेत. सौदी अरेबिया, इराण, इराक, कुवैत, बऱ्हेन, कतार, आणि संयुक्त अरब अमिराती (UAE) देशामध्ये जास्त प्रमाणात आढळतात. जगातील एकूण पेट्रोलियम साठ्यापैकी निम्मे साठे येथे आहेत. जगातील शे. 25% पेट्रोलचे उत्पादन येथे होते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पूर्व आणि आग्नेय आशिया मधील काही देशात पेट्रोलियमचे साठे आढळतात उदा: इंडोनेशिया, मलेशिया, चीन, तैवान, म्यानमार, सार्वाक, भारत, व्हिएतनाम इत्यादी.

सध्याच्या काळात सैबेरियाच्या काही भागात पेट्रोलियमचे उत्पादन वाढले आहे.

- पेट्रोलियम शब्द (Petroleum) 'petra' म्हणजे 'दगड' आणि 'Oleum' म्हणजे 'तेल' या दोन लॅटीन शब्दापासून तयार झाला आहे.
- सौदी अरेबिया हा जगात सर्वात जास्त पेट्रोलियम उत्पादन करणारा देश आहे.

मध्य आशियातील तुर्कस्तान, उझबेकिस्तान, कझाकिस्तान इत्यादी भागात देखील भरपूर पेट्रोल सापडते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रमुख उद्योगधंद्यांचे प्रदेश:

आशिया खंडाचा विस्तार विशाल आहे. खनिजे आणि कृषी संपत्तीने हा खंड समृद्ध आहे. तरीदेखील युरोप खंडाएवढे उद्योगधंदे येथे नाहीत. याला कारण म्हणजे नवीन तंत्रज्ञानाचा अभाव, भांडवलचा अभाव, पारंपारिक पद्धतीचा वापर आणि जास्त लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत.

प्रमुख उद्योगधंदे आणि उद्योगधंद्याला अनुरूप असलेल्या भागाला ''औद्योगिक प्रदेश'' असे म्हणतात. येथे उद्योगधंदे स्थापन करण्यासाठी अनुकूल असा काही भागच आढळतो.

आशियातील प्रमुख उद्योगधंद्याचे प्रदेश खालीलप्रमाणे

जपान: या देशात प्रमुख 4 औद्योगिक प्रदेश आहेत.

1. **किहीन प्रदेश:** टोकीओ, कावासकी. आणि याकोहामा या शहरात मोठया प्रमाणात उद्योग धंदे चालतात. कापड उद्योग, यांत्रिक उपकरणे, जहाज बांधणी, कागद तयार करणे आणि सिमेंट उत्पादन हे येथील प्रमुख उद्योगधंदे आहेत.

2. **हान्शीन प्रदेश:** ओसाक, कोबे आणि कियूटो या मोठ्या शहरामध्ये कापड उद्योग प्रमुख आहे.

3. **ऐसे कोल्ली प्रदेश:** हा प्रदेश नगोय शहराच्या भोवती विस्तारलेला आहे. येथे कापड आणि यांत्रिक उपकरणे तयार करण्याचे प्रमुख उद्योगधंदे आहेत.

4. **किट कियूशू प्रदेश:** युवाट, मोज, आणि कोकूर ही शहरे पोलाद, जहाज बांधणी, यांत्रिक उपकरणे, आणि कापड उद्योगासाठी प्रसिद्ध आहेत.

चीन: चीन हा शेती प्रधान देश आहे. हा उद्योगधंद्यात पुढारलेला आहे. कम्युनिस्ट सरकार आल्यानंतर उद्योगधंद्याना चालना मिळाली आहे.

या देशातील उद्योगधंद्याचे प्रदेश खालीलप्रमाणे:

1. **मंचूरिया प्रदेश:** येथे पोलाद, यांत्रिक उपकरणे आणि रासायनिक उद्योगधंदे प्रमुख आहेत.

2. **बिजिंग प्रदेश:** येथे यांत्रिक उपकरणे, जहाज बांधणी, कापड आणि रासायनिक उद्योग मुख्य आहेत.

3. **शान्शी बावटोव:** येथे लोखंड आणि पोलाद व शेतीची अवजारे तयार होतात.

4. **जांग झियांग:** या प्रदेशात कापड उद्योग, जहाज बांधणी आणि पोलाद तयार करणे इत्यादी उद्योग दिसून येतात.

5. **वुहान प्रदेश:** लोखंड तयार करणे, मोठ्या प्रमाणातील उद्योगधंदे, वस्तू तयार करणे.

NOT TO BE REPUBLISHED @SCERT

भारतातील उद्योग धंद्याचे प्रदेश:

1) हुगळी - कोलकत्ता प्रदेश
2) मुंबई-पुणे प्रदेश
3) अहमदाबाद - बडोदा प्रदेश
4) मदुराई - कोईमतूर - बेंगळूरु प्रदेश
5) छोटानागपूर प्रदेश,
6) दिल्ली - मिरत प्रदेश
7) विशाखापट्टण - गुंटूर प्रदेश
8) कोल्लम - तिरुवनंतरपूर प्रदेश.

दक्षिण कोरिया, हाँगकाँग, सिंगापूर आणि मलेशिया हे आशिया खंडातील इतर उद्योगधंद्याचे प्रदेश आहेत.

7. आशिया खंडाची लोकसंख्या


लोकसंख्येची वाढ: आशिया खंडाची लोकसंख्या सुमारे 476 कोटी इतकी आहे. ही लोकसंख्या जागतिक लोकसंखेच्या शे. 60 एवढी आहे. सद्याची लोकसंख्या मागील 3 शतकापेक्षा पाचपटीने वाढलेली आहे. सा.श.1950 मध्ये आशिया खंडाची लोकसंख्या फक्त 140 कोटी होती. आतापर्यंत लोकसंख्या वाढीचे प्रमाण जास्त होते. मात्र आता हे प्रमाण कमी झाले आहे.

लोकसख्या विभागणी आणि घनता: आशिया खंडात लोकसंख्येच्या विभागणी -मध्ये मोठ्या प्रमाणात असमानता आहे. नकाशा पहा. आशिया खंडाच्या जास्त भागामध्ये लोकसंख्या विरळ आणि कमी भागामध्ये जास्त लोकसंख्या आहे. हे तुम्ही पाहू शकाल.

आशिया खंडातील लोकसंख्येची सरासरी घनता प्रति चौ. कि.मी. 153 इतकी आहे. अत्यंत थंडीचे ठिकाण असलेले उत्तर आणि पूर्व सैबेरिया, वाळवंटी प्रदेश असलेला अरेबिया, इराण आणि थरचे वाळवंट (भारत) या भागात आणि अति उंच असलेल्या मध्य आशियातील भागामध्ये लोकसंख्या अत्यंत विरळ आहे.

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

आशिया खंडात दाट लोकवस्ती असलेल्या देशामध्ये भारतामधील सुपीक मैदानी प्रदेश, बांग्लादेश, चीन, जपान, कोरिया आणि जावा द्वीप (इंडोनेशिया) हे प्रमुख देश आहेत. यातील जास्तीत जास्त भाग सुपीक मैदानी प्रदेश, सपाट मैदानी प्रदेश आणि नदी काठच्या प्रदेशात आहेत. म्यानमार, थायलंड, फिलिपाईन्स, इराक, श्रीलंका, व्हिएतनाम, मलेशिया आणि कंबोडीयात देखील लोकसंख्येची घनता वाढलेली आहे.



आशिया लोकसंख्या

नवीन शब्दः

शरत्काल, बिलियन, सूचीपर्णी अरण्ये (कोनीफेरस), ज्वालाग्रही इंधन, घडीचे पर्वत, ग्रंथी, चुनखडी, पाची, शिलावल्क, ओयॉसिस, कच्या वस्तू, तैगा, टंड्रा इत्यादी.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

हे तुम्हाला माहित असू दे.

- माउंट एव्हरेस्ट हे आशिया खंडातील सर्वात उंच शिखर आहे. (8848 मीटर)
- मृत समुद्र आशिया खंडातील सर्वात खोल ठिकाण आहे.
- जगातील सर्वात जास्त हिमनद्या काराकोरम पर्वतश्रेणी मध्ये आहेत.
- जगात अती उंच असे तिबेटचे पठार आहे. त्याला "जगाचे छप्पर" असे म्हणतात.
- कॅस्पियन समुद्र जगातील अत्यंत विशाल समुद्र आहे.
- दक्षिण सैबेरियातील "बैकल सरोवर" सर्वात खोल सरोवर आहे.
- क्षेत्रफळ आणि लोकसंख्येच्या मानाने मालदीव हा देश आशियातील सर्वात लहान देश आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. आशिया खंड _____ गोलार्धात आहे.
2. आशियातील सर्वात उंच पर्वत _____.
3. आशियातील रबर उत्पादन करणारा प्रमुख देश _____.
4. समशितोष्ण प्रदेशातील गवताळ कुरणाना _____ असे म्हणतात.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

5. ''आशिया खंडाला वैविध्यपूर्ण खंड'' का म्हणतात?
6. आशिया खंडाची भौगोलिक परिस्थिती लिहा.
7. आशिया खंडाचे स्वाभाविक विभाग कोणते?
8. आशिया खंडात कोणत्या ऋतूमध्ये जास्त पाऊस पडतो?

9. आशियातील प्रमुख आहार पिके कोणती?

10. आशियातील प्रमुख ज्वालाग्रही इंधनाची नावे लिहा.?

11. आशिया खंडातील कोणत्या भागात लोकसंख्या विरळ आहे? का?



उपक्रम:

- तुमच्याकडे असलेल्या ॲटलासच्या सहाय्याने आशिया खंडाच्या नकाशाचा अभ्यास करून पर्वत, पठारी प्रदेश, मैदानी प्रदेश, आणि नद्या ओळखा व यादी करा. ते तुमच्या वहीतील नकाशात दाखवा.
- आशिया खंडातील प्रमुख नद्या आणि त्यांच्या उपनद्या, यांचे विवरण उदा:उगमस्थान, लांबी, उपनद्या, धरणे इ. माहिती आणि चित्रांचा संग्रह करा.
- तुम्ही रहात असलेल्या आजूबाजूच्या परिसराचे निरीक्षण करा. तेथील पिके, वनस्पती, आणि पाण्याची ठिकाणे याबद्दल यादी करा.

©MSBSHSE NOT TO BE REPUBLISHED

पाठ 23 युरोप खंड

K1M6Q9

पाठाचा परिचय

या पाठात युरोप खंडाचे स्थान, विस्तीर्ण, भौगोलिक रचना. नैसर्गिक आणि हवामानाचे विभाग, वनस्पती, शेती, दुग्धव्यवसाय आणि मासेमारी, खनिज संपती आणि उद्योगधंदे व लोकसंख्या वाढ, विभागणी, लोकसंख्येची घनता याबद्दल माहिती दिली आहे.

सामर्थ्ये

1. युरोपचे स्थान, क्षेत्रफळ आणि भौगोलिक रचना याबदल माहिती समजून घेणे.
2. युरोप खंडाचे नैसर्गिक आणि हवामानाचे विभाग समजून घेणे.
3. वनस्पती वर्गावर हवामानाच्या होणाऱ्या प्रभावाबद्दलची तुलना करणे.
4. खनिज संपतीवर युरोपातील उद्योगधंदे अवलंबून आहेत हे ओळखणे.
5. युरोपमधील लोकसंख्येची असमान विभागणी, लोकसंख्येची घनता आणि स्थलांतरावर नियंत्रण ठेवणाऱ्या गोष्टी बद्दल समजून घेणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


प्रस्तावना: जगातील दाट लोकवस्ती आणि शहरीकरण झालेल्या भूखंडामध्ये युरोप हा आहे. समृद्ध आणि औद्योगिकरण झालेला खंड आहे. विस्ताराच्या दृष्टीने जगात सहावा क्रमांक लागतो. हा अनेक भाग असलेला आणि वैविध्यपूर्ण भौगोलिक रचना असणारा, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय व्यवस्था लाभलेला खंड आहे. युरोप खंड अनेक लहान मोठे 56 देश मिळून बनलेला आहे.

1. स्थान, विस्तार आणि भौगोलिक रचना

स्थान: युरोप खंड 10 डिग्री पश्चिमे पासून 60 डिग्री पूर्व रेखांशापर्यंत आणि 36 डिग्री उत्तरेपासून 72 डिग्री उत्तर अक्षांशपर्यंत पसरलेला आहे.

विस्तार: युरोप हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा लहान खंड आहे. त्याचा एकूण विस्तार 10.4 मिलियन चौ. कि. मी. इतका आहे. हा भारताच्या विस्तारापेक्षा तीन पटीने मोठा आहे. या खंडाने पृथ्वीच्या एकूण विस्तारापैकी शे. 7 भाग व्यापलेला आहे. परंतु जगातील लोकसंख्येमधील 1/4 लोकसंख्या आहे.

भौगोलिक रचना: युरोप खंड आशिया खंडाचा पर्यायी द्विप असून या खंडाच्या तिन्ही बाजूने पाणी आहे. उत्तरेला बेरेंट समुद्र, पश्चिमेला अटलांटिक महासागर आणि दक्षिणेला मेडीटरेनियन समुद्र यांनी वेढलेला आहे.



जगात युरोप खंडाचे स्थान

युरोप खंडाच्या पूर्वेला आशिया खंड असून तो युरल पर्वत, ककासस पर्वत आणि कॅस्पियन समुद्र यामुळे युरोप खंडापासून वेगळा झाला आहे. युरोप खंडाच्या दक्षिणेला आफ्रिका खंड आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

परंतु वर उल्लेख असल्याप्रमाणे भौगोलिक स्वरूपावरून युरोप आणि आशिया खंडामधील सीमाभाग निश्चित नाही. म्हणून याला 'युरेशिया' या एकाच नावाने ओळखले जाते.



युरोपचे स्थान विस्तार आणि भौगोलिक रचना

2. भौगालिक परिस्थिती

युरोप हा वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक परिस्थितीने बनलेला खंड आहे. या खंडाच्या पश्चिम आणि दक्षिण भागामध्ये बर्फाच्छादित शिखरांचे पर्वत, दऱ्या, खोलदऱ्या आणि लहान मैदाने आहेत. परंतु या खंडाच्या पूर्व भागातील जास्त भाग सपाट पृष्ठभागांनी व्यापला आहे. काही ठिकाणी थोडाफार बदल दिसून येतो.



एलब्रुस शिखर

NOT TO BE REPUBLISHED © BSTBP

युरोप खंडातील अतिउंच ठिकाण म्हणजे 'माऊंट एलब्रुस शिखर' (5633 मीटर) असून ते ककासस पर्वत रांगा मध्ये आहे. अत्यंत खोल ठिकाण म्हणजे कॅस्पियन समुद्र असून तो समुद्रसपाटीपासून 28 मी. खोल आहे.

वास्तविक पाहता आशिया भूखंडामध्ये युरोप हे एक मोठे पर्यायी द्वीप आहे. या खंडात स्कॉडीनेविया, ऐबिरिया, जटल्याँड, बाल्कन इ. असे अनेक पर्यायी द्वीप आहेत. त्यामुळे युरोपला ''पर्यायी द्वीपांचा पर्यायी द्वीप'' असे म्हणतात.

युरोपमध्ये सुमारे 80,500 कि. मी. लांबीची समुद्रांची किनारपट्टी आहे. ती आशिया खंडातील किनाऱ्यापेक्षा लांब आहे. या खंडाच्या किनारपट्टीवर हजारों 'द्वीपकल्प' आहेत. त्यामध्ये ब्रिटन आणि आयर्लंड मोठे द्वीपकल्प आहेत. तसेच शेटलँड, फैरोस, सिसिली, सार्डीनिया, ओर्केनी, कोर्सिक, क्रेट आणि चानेल द्विप ही इतर प्रमुख द्वीप आहेत.


स्वाभाविक विभाग

वरील लक्षणांच्या आधारे युरोपचे सामान्यपणे 4 विभाग पडतात.

1. वायव्येचा उंच प्रदेश
2. उत्तर युरोप मधील मैदाने
3. मध्य भागातील उंच प्रदेश
4. दक्षिणेकडील पर्वतमय प्रदेश

1. **वायव्येचा उंच प्रदेश:** हा स्वाभाविक विभाग अत्यंत प्राचीन पर्वत श्रेणींचा असून फिनलँड, स्वीडन, नॉर्वेतील काही भाग मिळून आईसलँड आणि ब्रिटन पर्यंत विस्तारलेला आहे. हे अवशेषांचे पर्वत आहेत. हिमनद्या विरघळल्यामुळे त्यांची उंची कमी आहे. हे पर्वत प्राचीन शिलापासून बनलेले आहेत. स्कांडी नेवियामध्ये याची उंची सामान्यपणे 2000 मीटर आणि आयर्लंड आणि स्काटलँड मध्ये यांची उंची फक्त 600 मीटर इतकी आहे. नॉर्वेमधील "गोल्डोपिग्गेन (2469 मी.) शिखर" या प्रदेशातील सर्वात उंच शिखर आहे. स्कॉटलँड मधील "बेन्नेवीस" (1343 मी.) आणि वेल्स मधील स्नोडोन (1085 मी.) ही इतर शिखरे आहेत. हा भाग उत्तरेकडे साधारण उतरता आहे. येथूनच अनेक नद्या वाहतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



स्वाभाविक विभाग

2. उत्तर युरोपमधील मैदाने: या भागाला 'मध्य भागातील सखल मैदान' असे संबोधतात. हा पूर्वेकडील युरल पर्वतापासून पश्चिमेला अटलांटिकच्या किनाऱ्यापर्यंत विस्तारलेला आहे. युरोपातील जास्तीत जास्त भाग या प्रदेशात आहे. यामध्ये युरोपियन रशिया, पोलंड, उत्तरजर्मनी, नेदरलँड (हॉलंड), डेन्मार्क, बेल्जियम उत्तर फ्रान्स आणि इंग्लंडचा पूर्व भाग यांचा समावेश आहे.

या प्रदेशाचा पूर्व भाग रुंद असून पश्चिमेकडे अरुंद होत गेला आहे. नेदरलँड आणि बेल्जियम देशातील काही मैदाने समुद्र सपाटीपेक्षा खाली आहेत. येथील वाहणाऱ्या नद्यांच्या एकत्रीकरणामुळे ही मैदाने तयार झाली आहेत.

ही मैदाने भारतातील गंगा - सिंधू नदीच्या मैदानासारखी समपातळीत नाहीत. काही भागात ही मैदाने साधारण उताराने एकत्र झाली आहेत. तर काही ठिकाणी पर्वत आणि डोंगर रांगामुळे वेगळी झाली आहेत. येथे जग प्रसिद्ध अशा सुपीक शेतजमिनी आहेत.

© MTBS NOT TO BE REPUBLISHED

3. मध्य भागातील उंच प्रदेश: हा भाग पुरातन दगडापासून बनलेला असून काही ठिकाणी पुरातन पर्वत, डोंगर आणि सपाट भूभाग सामावलेला आहे. त्यांची समुद्र सपाटीपासूनची उंची सरासरी 600 मीटर पेक्षा जास्त नाही.

हा भाग पश्चिमेकडे आयर्लंड पासून पूर्वेकडे रशिया पर्यंत विस्तारलेला आहे. यामध्ये स्पेन आणि पोर्तुगाल मधील मेसेट, फ्रान्स मधील मध्य मासिफ व ओस्जेस, जर्मनीचा ब्लॉकफॉरेस्ट व जेक आणि स्लोव्हेकिया गणराज्यात असणाऱ्या काही उंचीच्या पर्वत श्रेणी सामावलेल्या आहेत.



ब्लाँक शिखर

या प्रदेशातील काही भाग अरण्यांनी व्यापलेला आहे. येथील जास्तीत जास्त भाग दगडगोट्यांनी बनलेला असल्यामुळे येथील माती शेतीला उपयुक्त नाही. मात्र नद्या नाल्यानी उत्तम अशी शेत जमीन दिलेली आहे.

4. दक्षिणेकडील पर्वतमय प्रदेश: या विभागाला 'अल्पाईन पर्वतांचा भाग' म्हणून संबोधले जाते. यामध्ये सियेर्रमोरेन (स्पेन), फ्रान्स आणि स्पेन च्या मध्यभागी सिमेसारखा पिरनीस पर्वत अशा अनेक पर्वतांच्या रांगा आहेत. या पश्चिमेतील अटलांटिक किनाऱ्यापासून पूर्वेकडे कॅस्पियन समुद्रापर्यंत एकास एक अशा समांतर रांगांमध्ये पसरले आहेत. हे हिमालयाप्रमाणे घडीचे पर्वत आहेत.

या प्रदेशात 'आल्प्स' पर्वत मुख्य आहे. येथील 'माऊँट ब्लॉक' (4807 मीटर) शिखर अति उंच आहे. फ्रान्सचा आग्नेय भाग, इटलीचा उत्तरभाग स्विझर्लंडचा बहुतेक भाग, जर्मनी, ऑस्ट्रेलिया आणि स्लोवेनिया या प्रदेशात आल्प्स पर्वतांच्या रांगा विखुरलेल्या आहेत. इटलीच्या जास्त भागामध्ये अपनाईन पर्वत, क्रोसिया, बोस्निया आणि युगोस्लाविया मध्ये डिनारिक अल्प्स, बल्गेरियाच्या बाल्कन आणि उत्तर स्लोवेनियामध्ये कार्पेथियन पर्वत आहेत.

© KSTB NOT TO BE REPUBLISHED

3. नैसर्गिक हवामान आणि वनस्पती

युरोपच्या हवामान प्रदेशाबद्दल चर्चा करण्याअगोदर येथील सामान्य हवामान परिस्थितीची माहिती करून घेऊ. या खंडातील जास्त भाग समशीतोष्ण कटिबंधातील हवामानाप्रमाणे आहे. याला 'हितकारक हवामान' असेही संबोधतात. हे प्रमुख वायुगुण नियंत्रण घटकांचे परस्पर प्रक्रियेचे फळ आहे. याला अक्षांश भौतिक परिस्थिती, वारे आणि स्थान कारणीभूत आहेत. तरीसुद्धा अटलांटिक महासागरातून वाहणाऱ्या वाऱ्यांचा या खंडातील जास्तीत जास्त हवामानावर प्रभाव पडतो. याला मुख्य कारण म्हणजे गल्फस्ट्रीम समुद्राचा उष्ण प्रवाह आणि जोराने वाहणारे पश्चिमीवारे आहेत.


सामान्यपणे दक्षिण युरोपातील थंड असणाऱ्या अल्पकाळ उन्हाळ्यापेक्षा उत्तरेतील हिवाळा दिर्घकाळ आणि थंड असतो. तसेच पश्चिम युरोपपेक्षा पूर्व भागात हिवाळा दिर्घकाळ आणि थंड असून उन्हाळा अल्पकाळ आणि उष्णतादायक असतो.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


हवामानाचे प्रदेश

हवामानावरून युरोपचे 4 प्रमुख भाग होतात.

1. **वायव्य युरोपचा सागरी हवामानाचा प्रदेश:** हा प्रदेश नार्वेच्या समुद्र किनाऱ्यापासून स्पेनचा उत्तरभाग आणि मध्ययुरोपच्या आतील भागापर्यंत विभागलेला आहे. हितकारक हिवाळा, उष्ण उन्हाळा आणि भरपूर पाऊस, ढगाळ वातावरण असल्यामुळे सूर्याचा प्रकाश दिवसा मंद असतो. हिवाळा आणि उन्हाळा या दोन्ही ऋतूमध्ये तापमान साधारणपणे (10 डिग्री से.ते 18 डिग्री से) इतके असून पावसाचे प्रमाण 75 सें.मी. आहे.



वार्षिक उष्णता विभागणी



वार्षिक पावसाची विभागणी

NOT TO BE REPUBLISHED @ KTRS

2. **खंडांतर्गत हवामानाचा प्रदेश:** हा भाग जास्त करून पोलंड, स्लोवेकिया, झेकगणराज्य, हंगेरी, रुमेनिया, आणि बल्गेरियामध्ये आढळून येतो. या हवामानाची लक्षणे म्हणजे तीव्र थंडीचा हिवाळा (-12 डिग्री से आणि 10 डिग्री से) उबदार उन्हाळा आणि पावसाची वार्षिक सरासरी 50 सें.मी. इतकी आहे. उन्हाळ्याच्या आरंभी येथे अति जास्त प्रमाणात पाऊस पडतो.

3. **भूमध्य समुद्र हवामानाचा प्रदेश (भुमध्य सागरी हवामान):** जास्त उष्णता, कोरडा आणि उन्हाने मिश्रीत हिवाळा व थोडा पाऊस पडणारा हितकारक हिवाळा असा हा प्रदेश. या हवामानाची प्रमुख लक्षणे पावसाच्या प्रमाणात समानता नाही. हिवाळ्यामध्ये तापमान सरासरी 8 डिग्री सेल्सियस असते आणि उन्हाळ्यात 22 डिग्री सेल्सियस पर्यंत वाढते. पावसाचे वार्षिक प्रमाण सरासरी 75 ते 100 सें. मी आहे. अशाप्रकारचे हवामान विशेषत: भूमध्य समुद्र प्रदेशासोबत दक्षिण युरोपमध्ये दिसून येते.

4. **पर्वतीय हवामानाचा प्रदेश:** अशा प्रकारचे हवामान आल्प्स आणि ककासस पर्वत या भागामध्ये दिसून येते. हा उंच भाग सूर्यकिरणांचे कोन आणि वाऱ्यापासून संरक्षण करतो. हिवाळ्यातील तापमान -4 डिग्री सेल्सियस आणि उन्हाळ्यातील 16 डिग्री सेल्सियस असते. पावसाचे सरासरी प्रमाण पर्वतातील भागामध्ये वाऱ्याच्या दिशेला 50 सें. मी. आणि वाऱ्याच्या विरुद्ध दिशेला 200 सें. मी. इतके असते. पर्वतांच्या अतिउंच भागातील तापमान पाण्याच्या गोठणबिंदू (0 डिग्री से.) पेक्षाही कमी असते.

NOT TO BE REPUBLISHED @KSTBS

नैसर्गिक वनस्पती

युरोपमध्ये फार वर्षापासून मानव रहात असून तेथे दाट लोकवस्ती आहे. त्यामुळे तेथील नैसर्गिक वनस्पती पूर्णपणे नष्ट झालेली आहे. जनवस्तीला प्रतिकूल भागामध्ये आणि उंच प्रदेशामध्ये फक्त वनस्पती दिसून येतात. खालीलप्रमाणे युरोपमध्ये वनस्पती वर्गाचे 6 प्रकार पडतात.

1. **टंड्रा वनस्पती:** दगडफूल आणि शेवाळ (Lichens and mosses) यांनी बनलेला आहे. हा भाग आयर्लंड, उत्तर नॉर्वे, स्विडन आणि फिनलँड यांच्या काही भागामध्ये अशाप्रकारच्या वनस्पती आढळून येतात. अशा वनस्पती आल्पस् तसेच उत्तर उरल पर्वताच्या उंचवट्याच्या भागात आढळून येतात.

2. **तैगा अरण्ये:** नॉर्वे, स्विडन आणि फिनलँड मधील सामावलेल्या ध्रुव प्रदेशाम ध्ये तैगा अरण्ये आढळून येतात. याला 'सूचिपर्णी अरण्ये' असेही म्हणतात. येथे थोड्याच प्रकारची झाडे वाढतात. उदा: स्काटसपैन, स्प्रूस आणि लार्च. याला काट्यासारखी पाने असून ती शंकूच्या आकाराची असतात.

3. **मिश्रअरण्ये:** दक्षिणेकडील मध्य भागात मिश्र वनस्पतीची अरण्ये आढळून येतात. तेथे पानझडीचे वृक्ष आणि सूचिपर्णी वृक्ष आढळतात. या मिश्र अरण्यात ओक, ॲश, आल्म, पाप्लर विलो, बीच इ. वनस्पती आढळतात.

4. **भूमध्य समुद्र वनस्पती:** या प्रकारची वनस्पती साधारणपणे भूमध्य समुद्र किनारपट्टीवर आढळून येते. या रुंद पाने असलेल्या 'सदाहरित वनस्पती' आहेत. कारण शरद ऋतूमध्ये त्या झाडांची पाने झडत नाहीत. कार्क, ओक, ऑलिव्ह, लारेल इ. वनस्पती येथे आढळतात

NOT TO BE REPUBLISHED @KSBSB

5. **गवताळ-कुरणे:** पानझडी अरण्यापासून दक्षिण भागामध्ये गवताळ कुरणे आढळून येतात. उदा: हंगेरी, बल्गेरिया, रूमेनिया आणि युरोपियन रशिया येथे झाडे विरळ असून स्टेपीज गवताळ कुरणाने बनलेला आहे.

6. **अल्पाईन वनस्पती:** युरोपच्या दक्षिण भागात उंच पर्वत श्रेणीमध्ये विभागलेला आहे. उदा: आल्प्स, पिरनीस, बाल्कन, कार्पेथियन आणि दिनारिक पर्वत.



स्वाभाविक वनस्पती वर्ग

© KSBB NOT TO BE REPUBLISHED

4. शेती, दुग्धव्यवसाय आणि मासेमारी

शेती: युरोपमध्ये शेती हा औद्योगिकरणाला मुख्य पूरक धंदा बनलेला आहे. हा खंड विशाल, मैदानी प्रदेश, सुपीक जमीन आणि उत्तम पाणी पुरवठयाच्या सोयीनी युक्त असून वैभवशाली आहे. येथील हवामान शेतीला पूरक असे आहे

स्कांडीनेवीयन देश सोडून युरोपमधील बहुतेक देश यांच्या विस्तारापैकी शे. 50 पेक्षा जास्त भाग शेतीने व्यापलेला आहे. युरोपमध्ये पिकणाऱ्या जमिनीचे सरासरी क्षेत्र 10 हेक्टर आहे.

पश्चिम युरोपीय देशामध्ये मिश्र शेतीची पद्धत रूढ आहे. यामध्ये पिकांची लागवड व पशुपालन हे दोन्हीही आहेत. येथील शेतजमीन जनावरांचा चारा, पिकांची लागवड, कुक्कुट पालन, डुकरे पाळण्यासाठी आणि विविध फळे भाजीपाला पिकविण्यासाठी उपयोग करतात.

भुमध्य सागरी हवामान असलेल्या दक्षिण युरोपमधील शेती भिन्न पद्धतीची आहे. ती एकदल धान्ये, फळे, भाजीपाल्याची लागवड आणि पशूपालन यामुळे ती एकमेकास पूरक आहेत.

मोठ्या बाजारपेठेवर अवलंबून असलेली एक विशेष प्रकारची शेती प्रगत झाली आहे. जास्त दाट लोकवस्ती असलेल्या शहरी प्रदेशातील जवळच्या भागात वाणिज्य आणि उत्तम प्रकारे एकत्रित झालेली शेती आढळून येते. एकूण युरोपच्या जनसंख्येच्या शे. 10 पेक्षा कमी लोक शेती कामात गुंतलेले आहेत.

भौतिक परिस्थिती, माती, हवामान, बाजारपेठ आणि शेतमजुरांची उपलब्धता यावर अवलंबून युरोपातील विविध भागामध्ये वेगवेगळ्या प्रकारची पिके घेतात.

गहू: हे युरोपमधील प्रमुख आहार पीक आहे पॅरीसचे मैदान, युरोपचे महामैदान, हंगेरीचे मैदान, सखल मैदानाचे देश आणि इटलीच्या पो नदीकाठचा प्रदेश हे युरोपमधील गहू उत्पादन करणारे प्रमुखप्रदेश आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

मका: हे युरोपमधील दुसऱ्या क्रमांकाने प्रमुख एकदल धान्याचे पीक आहे. फ्रान्स, इटली, हंगेरी, जर्मनी आणि स्पेन हे मक्का उत्पादन करणारे प्रमुख देश आहेत. राई हे आणखी एक आहार पीक आहे. त्याचा उपयोग ब्रेड आणि मद्य तयार करण्यासाठी करतात. पोलंड, जर्मनी, झेक गणराज्य आणि स्लोव्हेकिया गणराज्य हे प्रमुख राई उत्पादन करणारे देश आहेत.

बार्लीचे उत्पादनातही युरोप प्रमुख आहे. बार्लीचा उपयोग आहार धान्य म्हणून, जनावाराना आहार म्हणून आणि मद्य तयार करण्यासाठी करतात. काही ठिकाणी ओट पिकवितात. भात हे उन्हाळी पीक असून ते अत्यंत अल्प प्रमाणात पिकविले जाते. हे उन्हाळी पिक आहे.


बीट आणि बटाटे ही दोन्ही युरोपमधील प्रमुख पिके आहेत. बीट पासून साखर तयार करतात. तसेच जनावराना आहार म्हणून उपयोग करतात.

बटाट्याचे पीक मध्य आणि पूर्व युरोपमधील मैदानी प्रदेशात जास्त प्रमाणात पिकविले जाते. विश्वामध्ये सर्वात जास्त बटाट्याचे उत्पादन युरोपमध्ये होते जवस (Flax) हे युरोपमधील प्रमुख तंतूमय पीक आहे.

युरोपातील बेटावरील उतार जमिनीवर द्राक्षे, सफरचंद, अंजीर, लिंबू मणूके (Plum) डाळींब, चेस्टनट इ. फळांची शेती आढळते. बल्गेरिया हा देश गुलाब फुले, भाजीपाला आणि बागायती पिकांसाठी प्रसिद्ध आहे.

दुग्धव्यवसाय: हा युरोपमधील मिश्रशेती पद्धतीतील अत्युत्तम उद्योग आहे. थंड व दमट हवामान, दाट लोकवस्ती असलेली शहरे, चांगले रस्ते, रेल्वे वाहतुकीची व्यवस्था अत्युत्तम अशी जैविक - तंत्रज्ञानातील प्रगती, शेतीकरण, आर्थिक पाठबळ, दुग्धव्यवसायातील यांत्रिकीकरण आणि भरपूर चाऱ्याचा पुरवठा यामुळे युरोपमध्ये दुग्यव्यवसायाच्या प्रगतीला प्रोत्साहन मिळाले आहे.

© KTES NOT TO BE REPUBLISHED



दुग्धव्यवसाय

डेन्मार्क, नेदरलँड, स्वित्झरलँड, जर्मनी आणि ब्रिटनमध्ये दुग्धव्यवसायात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली आहे. यामध्ये सर्वात मोठ्या प्रमाणात डेन्मार्क मध्ये दुग्धव्यवसाय चालतो. युरोपमधील देश दूध व लोणी, तूप, चीज, चॉकलेट इ. दुग्धजन्य पदार्थांची निर्यात करतात.

मासेमारी: फार वर्षापासून युरोप हा देश आहाराचे आर्थिक उत्पन्न म्हणून म ासेमारी करीत आहे. कमी खोलिच्या समुद्र भागामध्ये मासेमारी चालते. प्रमुख मासेमारीचा प्रदेश वायव्य युरोपमध्ये आहे. तो आर्क्टिक वृत्ताच्या उत्तर भागापासून मेडिटरेनियन समुद्रापर्यंत विस्तारलेला आहे. उत्तर समुद्रात मोठ्या प्रमाणात म ासेमारी चालते. त्यामध्ये नॉर्वे, ब्रिटन, डेन्मार्क, स्विडन आणि जर्मनी देश येतात. डॉगर बँक आणि ग्रेट फिशर बँक हे दोन्ही प्रदेश उत्तर समुद्रातील मासेमारीची प्रसिद्ध केंद्रे आहेत. नॉर्वेचे लोक मासेमारीमध्ये तरबेज आहेत.

सिल व देवमासा या जातीचे मासे ध्रुवीय प्रदेशात पकडतात. नॉर्वे हा मोठया प्रमाणात मासेमारी करणारा आणि मासे निर्यात करणारा देश आहे.

शेतजमीन आणि आहार धान्याची कमतरता असल्यामुळे युरोपमध्ये मासेमारीची प्रगती झाली आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



युरोपमधील मासेमारीचे क्षेत्र

@MTBS NOT TO BE REPUBLISHED

5. खनिजे

खनिजे: युरोप खंडामध्ये विविध प्रकारची खनिजे आणि इंधने मिळतात.

या खंडामध्ये मोठ्या प्रमाणात लोखंडाच्या खनिजाचे उत्पादन होते. युरोपमधील बहुतेक देशामध्ये लोखंडाची खनिजे सापडतात. जगातील खनिजापैकी शे. 5 लोखंडाच्या खनिजाचे साठे या खंडात मिळतात. फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन आणि स्विडन हे लोखंडाची खनिजे उत्पादन करणारे प्रमुख देश आहेत.

बेल्गेरिया आणि पोलंड हे तांबे उत्पादन करणारे प्रमुख देश आहेत. युरोपमध्ये पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू अत्यंत कमी प्रमाणात सापडतो. उत्तरसमुद्र, फ्रान्स, इटली, नेदरलँड आणि जर्मनी हे पेट्रोलियम उत्पादन करणारे प्रमुख देश आहेत.



प्रमुख खनिज संपत्ती

दगडीकोळसा हे युरोपमधील विद्युतशक्तीचे प्रमुख साधन आहे. स्कांडिनेवीया आणि भूमध्य समुद्र देश सोडून या खंडात दगडी कोळशाचे साठे सापडतात. उत्तम प्रतिचा बिटूमिनस दगडी कोळसा युरोपियन रशिया, जर्मनी आणि ब्रिटन मध्ये मिळतो. काही ठिकाणी बॉक्साईट आणि पोटॅस सापडते.

@KTB NOT TO BE REPUBLISHED

प्रमुख उद्योगधंदे

लोखंड व पोलादाचे उद्योग: आधुनिक युग हे लोखंड आणि पोलादाचे युग असून यांचे उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात आहेत. काही उद्योगधंद्याना लागणारे लोखंड आणि पोलाद यांचे उत्पादन करतात. लोखंड आणि पोलादाचे उत्पादन करणारे प्रमुख देश म्हणजे

1) जर्मनी ऱ्होर, सार, वेसर, नदीकाठचा प्रदेश आणि बर्लीन प्रदेश.

2) ब्रिटन ब्लॉक कंट्री, शेफील्ड, इशान्य किनारपट्टी आणि वेल्स प्रदेश.

3) फ्रान्स लॉरेन्स, वायव्य आणि पूर्वेकडील प्रदेश, पोलंडमधील सैलिसिया आणि इटलीचा पो नदीचे खोरे आणि लंबार्डी मैदान.

कापूस कापड उद्योग: युरोपमध्येही शेतीवर आधारित उद्योगधंदे प्रगती पथावर आहेत. त्यामध्ये कापसापासून कपडे बनविण्याचा उद्योग आहे. युरोपमध्येही कापसाच्या (गिरणी) मिल आहेत. कच्चा कापसाचा माल बाहेरील देशातून आयात केला जातो. ब्रिटन हा देश आधुनिक कापड उद्योगधंद्याचे उगमस्थान आहे. येथील लंकाशायर, चेशायर, आणि डर्बीशायर, ही कापड गिरणीची प्रमुख केंद्रे आहेत. जर्मनी आणि फ्रान्स हे कापूस आणि तागाच्या वस्तू उत्पादन करणारे इतर प्रमुख देश आहेत.

उत्तम दर्जाची रेशीम, लोकरी कपडे आणि मानवनिर्मीत कपड्यासाठी ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, बेल्जियम आणि इटली हे देश प्रसिद्ध आहेत.

जहाज बांधणीचा उद्योग: हा एक मोठ्या प्रमाणातील तांत्रिक आणि विशेषकरून जहाज बांधणीचा उद्योग आहे. तंत्रज्ञानातील प्रगती, उत्तम बंदरांची सोय, उद्योगधंद्याची प्रगती इ. उद्योगांच्या वाढीसाठी प्रेरणादायक ठरल्या आहेत. जर्मनी हा युरोपमधील जहाज बांधणीचा प्रमुख देश आहे. स्विडन, ब्रिटन आणि फ्रान्स हे युरोपमधील जहाज बांधणी करणारे इतर देश आहेत.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

स्वयंचलित वाहनांचे उद्योगधंदे: येथे कार, ट्रक, बस, स्कूटर. आणि मोटर इंजिनच्या सहाय्याने इतर कोणतेही वाहन तयार करण्याचा उद्योग आहे. हा एक बांधणीचा उद्योग आहे. अत्युत्तम तांत्रिक आणि नफा देणारा उद्योगधंदा आहे. जर्मनी, फ्रान्स, इटली आणि ब्रिटन हे युरोपमधील स्वयंचलित वाहनाच्या उद्योग धंद्याचे प्रमुख देश आहेत.

6. युरोपमधील प्रमुख उद्योग धंद्यांचे प्रदेश

युरोपमधील प्रमुख उद्योगधंदे आणि उद्योग धंद्यांची केंद्रे यांचा एक प्रकारचा त्रिकोण तयार झालेला आहे. याला युरोपमधील उद्योगधंद्याचे हृदय म्हणतात. हा त्रिकोण उत्तर समुद्रापासून पोलंडमधील मध्यभाग आणि दक्षिण इटलीच्या पो नदी खोऱ्यापासून उत्तरेतील स्विडन पर्यंत व्यापलेला आहे.

खालील प्रमाणे युरोपमधील उद्योगधंद्याचे प्रमुख विभाग आहेत.

1. ब्रिटन मधील उद्योगधंद्याचा विभाग.
2. पश्चिमेकडील उद्योग धंद्यांचा त्रिकोणी विभाग.
3. पॅरीसच्या उद्योगधंद्याचा विभाग (यालाच 'फ्रान्सच्या उद्योगधंद्यांचे हृदय म्हणतात).
4. लोराईन सार उद्योगधंद्यांचा विभाग.
5. ऱ्हाईन नदी काठावरील विभाग.
6. सैलेसियाचा काठावरील विभाग.
7. दक्षिणेचा स्कॉडिनेवीयाचा विभाग. (स्टॉकहोमसह).
8. पूर्व जर्मनीपासून इशान्य झेक गणराज्य आणि स्लोवेकियाचा विभाग.
9. उतरेकडील इटलीच्या 'पो' नदी काठाच्या उद्योगधंद्यांचा प्रदेश.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

7. लोकसंख्या

युरोपच्या भौगोलिक क्षेत्रफळाचे निरीक्षण करून पाहिल्यास त्यामानाने तेथील लोकसंख्या जास्त आहे. युरोपियन रशिया सोडून जगातील 11%. भूभाग युरोपने व्यापलेला आहे. तरी सुद्धा जगातील लोकसंख्येची 1/5 लोकसंख्या येथे आहे. येथील एकूण लोकसंख्या 742 मिलियन (2023) इतकी होती. त्यामध्ये शहरातील लोकसंख्या जास्त आहे.

लोकसंख्या विभागणी: युरोपमध्ये लोकसंख्येच्या विभागणी मध्ये समानता नाही. जर्मनी, ब्रिटन, इटली आणि फ्रान्स हे युरोपमधील दाट लोकवस्तीचे देश आहेत. वायव्य युरोपमध्ये लोकांची संख्या कमी आहे. आल्प्स, ककासस, कमी प्रमाणातील कोरडा प्रदेश यासह, आग्नेय युरोपमधील भागामध्ये लोकसंख्या विरळ आहे.

युरोपमधील दाट लोकसंख्येचे देश म्हणजे बेल्जियम, लक्षंबर्ग, नेदरलँड इत्यादी. याला औद्योगिकरण, वाहतुकीच्या उत्तम सोयी, नैसर्गिक संपत्ती आणि नवीन तंत्रज्ञातील प्रगती ही प्रमुख कारणे आहेत.

लोकसंख्या वाढ: युरोपमधील बहुतेक राष्ट्रे कमी लोकसंख्या आणि लोखसंख्या वाढीचे प्रमाण कमी आहे. लोकसंख्येची वाढ एका प्रदेशाहून दुसऱ्या प्रदेशात बदलत जाते.

स्थलांतर: गेल्या 200 वर्षामध्ये युरोपियन लोक दुसऱ्या देशात स्थलांतर झाले आहेत. तसेच अनेक कारणामुळे बाहेरील देशातील लोक युरोपमध्ये स्थलांतरित होऊन तेथेच स्थायिक झाले आहेत.

दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर विविध खंड आणि देशातून लोक ब्रिटनमध्ये स्थलांतर होऊन आलेले आहेत. यामध्ये इटालीयन लोक जास्त प्रमाणात आहेत.

©MTBS NOT TO BE REPUBLISHED



लोकसंख्येची घनता

दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या अगोदर जर्मन लोक वेगवेगळ्या देशामध्ये स्थलांतर होऊन गेले आहेत. पोलंड, रुमेनिया, हंगेरी, झेक, स्लोविकिया आणि युगोस्लावियामध्ये जर्मन लोक अल्पसंख्यांक म्हणून दिसून येतात.

लोकसंख्येची घनता: युरोपमधील जनघनतेमध्ये विविधता आढळते. प्रगती पथावर असलेल्या नेदरलँड मध्ये प्रति चौ. कि. मी. ला 950 लोक असून आइसलँडमध्ये प्रति चौ. कि. मी. ला फक्त 3 लोक राहतात. उत्तर युरोपातील सखल प्रदेशात जास्त प्रमाणात जनघनता आहे.

@ NOT TO BE REPUBLISHED

युरोपमधील अत्यंत दाट लोकवस्ती असलेला प्रदेश म्हणजे उद्योगधंद्यांचे जिल्हे, बेल्जियम आणि जर्मन मधील दगडी कोळशाचा प्रदेश, ग्रेट लंडन, नेदरलँड, ऱ्हाईननदी काठचा प्रदेश, उत्तर इटली आणि स्पेनचा किनारपट्टीचा प्रदेश होय.

विरळ लोकसंख्या असलेला प्रदेश म्हणजे मध्य फ्रान्स, पर्वतमय प्रदेश, बाल्कन विभाग आणि स्कॉटलंडचा उंच भाग होय.

नवीन शब्द:

आल्विन, आल्प्स, स्वयंचलित, वाहन उत्पादने, गळीतधान्ये, घडीचे पर्वत, सागरीय हवामान, मासिख , मेसेट, स्थलांतर, पर्यायी द्वीप, तैगा, कापडउद्योग.

ते तुम्हाला माहित असू दे.

- ❖ स्क्वांडिनेवीय : हा उत्तर युरोपमधील भाग असून नॉर्वे, स्विडन आणि फिनलँड यांच्यामध्ये आहे.
- ❖ ब्रिटन अथवा ग्रेटब्रिटन: युरोपमधील अत्यंत मोठे बेट असून इंग्लंड, स्क्वॉटलंड, वेल्स यांच्यामध्ये आहे. उत्तर आयर्लंड मिळून हे संयुक्त राज्य (U.K). झाले आहे.
- ❖ सुमारे 500 वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून युरोपला 'जगाचे हृदय' म्हणून ओळखतात.
- ❖ ब्लॉक फॉरेस्ट हे अरण्य नाही. तो एक पर्वतमय प्रदेश आहे. तो दक्षिण जर्मनीमध्ये असून याचा अंतरभाग घनदाट असल्यामुळे सूर्याचे किरणही पोहचू शकत नाहीत. त्यामुळे हे नाव पडले आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. युरोपला आशियाचे _____ व्दिप म्हणतात.
2. युरोपचा प्रमुख पर्वत _____.

3. युरोपच्या हवामानावर प्रभाव पाडणारा प्रवाह _____.

4. युरोपचे प्रमुख पीक _____.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

5. युरोपचे भौगोलिक स्थान सांगा.

6. युरोपचे स्वाभाविक विभाग सांगा.

7. युरोपमधील हवामानाचे प्रमुख प्रदेश कोणते?

8. युरोपमधील नैसर्गिक वनस्पतींचे प्रमुख विभाग सांगा.

9. युरोपमधील दुग्धव्यवसायातील प्रमुख देशांची नावे लिहा.

10. युरोपमधील प्रमुख आहार धान्ये कोणती?

11. युरोपमधील मासेमारीचे प्रमुख विभाग सांगा.

12. युरोपमधील प्रमुख खनिजे कोणती?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम:

- नकाशामध्ये युरोपचे मुख्य स्वाभाविक विभाग दाखवा.
- शिक्षकांच्या मदतीने युरोपमधील प्रमुख पर्वत आणि शिखरे ओळखा.
- तुम्ही रहात असलेल्या आजूबाजूच्या परिसराचे निरीक्षण करून तेथील जमिनीचे स्वरूप, वनस्पती आणि पिके यांची यादी तयार करा.
- युरोपच्या नकाशात राष्ट्रांच्या राजधानीची नावे, पर्यटन स्थळे आणि उद्योगधंद्याचे प्रदेश ओळखा.

पाठ 24 आफ्रिका खंड

Q6Q3C3

पाठाचा परिचय

या पाठामध्ये तुम्ही आफ्रिकेचे भौगोलिक स्थान, विस्तार आणि भौगोलिक रचना, स्वाभाविक विभाग, नद्यांची व्यवस्था, हवामान, नैसर्गिक वनस्पती, प्राणी संपत्ती, शेती, उद्योगधंदे, मौल्यवान खनिजे, लोकसंख्या वाढ, लोकसंख्या विभागणी आणि लोकसंख्येची घनता याबद्दल माहिती करून घ्याल.

सामर्थ्ये

1. आफ्रिका खंडाचे स्थान, विस्तार, भौगोलिक रचना आणि स्वाभाविक विभाग याबद्दल माहिती समजून घेणे.
2. आफ्रिकेतील प्रमुख नद्या, हवामान, हवामानाचे प्रदेश, नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी संपत्ती याबद्दल माहिती समजून घेणे.
3. शेती, उद्योगधंदे आणि मौल्यवान खनिजे याबद्दल माहिती मिळविणे.
4. आफ्रिकेची लोकसंख्या, लोकसंख्या वाढ, विभागणी आणि लोकसंख्येची घनता याबद्दल माहिती मिळविणे.


© KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रस्तावना: आफ्रिका खंड हा आशिया खंडानंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाचा विशाल खंड आहे. हा लोकसंख्येमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. आजतागायत आफ्रिका खंडाला 'काळाखंड' असे संबोधले जात होते. ते या खंडावर मुख्यतः काळे लोक राहतात म्हणून नव्हे, तर पठारी प्रदेश, ओसाड जमिनी समुद्र किनाऱ्यापर्यंत विस्तारलेल्या आहेत, उत्तरेकडे सहारा वाळवंट आहे. तसेच त्याचा दीर्घ कालावधीपर्यंत शोध लागलेला नव्हता. म्हणून या खंडाला ''काळा खंड'' असे म्हणतात. या खंडात एकूण 54 (World population review.com) देश सामावलेले आहेत.

1. स्थान, विस्तार आणि भौगोलिक रचना.

स्थान: आफ्रिका खंड हा 37^0 उत्तर आणि 35^0 दक्षिण अक्षांश आणि 17^0 पश्चिम आणि 50^0 पूर्व रेखांशाच्या मध्ये वसलेला आहे. आफ्रिकेच्या पश्चिम भागात मुख्य रेखांश उत्तर-दक्षिण दिशेने स्पर्शून गेले आहे. विशेष म्हणजे या खंडातून मकरवृत, कर्कवृत आणि विषुववृत्त गेली आहेत. विषुववृत्त या खंडाच्या मध्यातून गेल्यामुळे याला "केंद्रीय खंड" असे म्हणतात.

विस्तार: आफ्रिकेचे एकूण क्षेत्रफळ 30.4 मिलियन चौ. कि. मी. आहे. याची दक्षिणोत्तर लांबी 8000 कि. मीटर आणि पूर्व पश्चिम रुंदी 7400 कि. मीटर इतकी आहे. अल-घिरम (ट्यूनिसिया) हे ठिकाण आफ्रिकेचे उत्तर टोक असून अगुल्हास हे ठिकाण (दक्षिण आफ्रिका) भूभागाचे दक्षिण टोक आहे.




जगाच्या नकाशात आफ्रिकेचे स्थान

भौगोलिक रचना: आफ्रिकेचा बहुतेक भूभाग कोणत्या ना कोणत्या तरी समुद्र किंवा महासागरानी सगळीकडून वेढलेला आहे. उत्तरेकडे मेडीटरेनियन समुद्र, पश्चिमेला अटलांटिक महासागर, पूर्वेला तांबडा समुद्र आणि हिंदू महासागर यानी वेढलेला आहे. पूर्वी या खंडाचा ईशान्य भाग सिनाय या द्वीपकल्पामुळे आशिया खंडाला

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

जोडलेला होता. तो आता सुवेझ कालव्यामुळे वेगळा झाला आहे. जिब्राल्टरच्या खाडीमुळे युरोप आणि तांबडया समुद्रापासून अरेबिया पर्यायीद्वीपापासून वेगळा झाला आहे. आफ्रिका खंडाचा समुद्र किनारा 30,500 कि.मीटर लांबीचा आहे.




आफ्रिकेचे स्थान व रचना

2. स्वाभाविक विभाग

आफ्रिका खंडाचे स्वाभाविक विभाग हे त्याच्या आंतरिक रचनेचे प्रतिबिंब आहे. संपूर्ण खंडच विशाल पठारी प्रदेश म्हणून ओळखला जातो. हा खंड प्राचीन स्फटिक दगडापासून बनलेला आहे. तो समुद्र किनाऱ्याजवळ लहान भाग असून तो एकदम उंच होऊन त्याचे पठार बनले आहे. यामुळे या खंडातील आतील भागात प्रवेश करणे कठीण आहे. पठारी प्रदेशाच्या (मैदानी प्रदेश) आग्नेय भाग उंच आहे आणि ईशान्येला वाढता उतार आहे. आफ्रिका खंडाच्या विस्तीर्णतेशी तुलना केल्यानंतर इतर खंडापेक्षा कमी उंचीचे पर्वत आणि सखल मैदानांनी बनला आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KRBS




आफ्रिकेची भौगोलिक रचना

आफ्रिकेचा समुद्र किनारा कमी जास्त प्रमाणात सरळ आहे. तो काही मोठी सखल मैदाने, नैसर्गिक बंदरे आणि लहान खाडयांनी बनला आहे. तेथे कोणत्याही खाडया (इरू) आणि भूशीर यांचा आत विस्तारलेला भाग नाही. तर समुद्राच्या आतील भाग लांबट निमुळता झाला आहे.

© MSBSHSE NOT TO BE REPUBLISHED

मोठ्या दुभंगलेल्या दरी : दोन सामान्य उंच असलेला भाग किंवा दोन सखल भागामधील जमिनीचा भाग खचल्याने निर्माण झालेल्या सपाट असलेल्या तळ खालच्या दरीला "दुभंगलेली दरी" असे म्हणतात. आफ्रिकेची मोठी 'दुभंगलेली दरी' अधिक लांबपल्याची आहे. (6900 कि.मी.) त्यामुळे त्याला 'मोठी दुभंगलेली दरी' असे म्हणतात.




मोठया दुभंगलेल्या दरी

इंग्लिश अक्षर Y आकारात असलेली भलीमोठी दुभंगलेली दरी म्हणजे आफ्रिका खंडाचा स्पष्ट दिसणारा स्वाभाविक विभाग आहे. हा दक्षिणेतील मोजांबिक पासून प्रारंभ होऊन मलावी, टांझानिया, केनिया आणि इथोपिया मार्गे जाऊन तांबडया समुद्रापर्यंत पसरलेला आहे. तेथून अक्यूबा खाडी, मृत समुद्र आणि गॅलीली समुद्रापासून पुढे जाऊन जॉर्डनच्या सिरियाच्या दरीमध्ये संपते.

आफ्रिकेची सखल मैदाने: आफ्रिकेमध्ये प्रमुख 5 सखल मैदानी प्रदेश आहेत. त्यांचे विवरण खालील प्रमाणे आहे.

1. **सुदानचा सखल मैदानी प्रदेश:** हा पांढरी आणि निळी नाईल नद्या वाहणारा प्रदेश आहे. या दलदलीच्या भागाला 'सड' (Sudd) असे म्हणतात.
2. **चाडचा सखल मैदानी प्रदेश:** हा भाग चाड सरोवराने वेढलेला आहे. हा सुध्दा दलदलीचा प्रदेश असून हा सहारा वाळवंटसुद्धा आक्रमितो.
3. **जोफ** (Djouf) **सखल मैदानी प्रदेश:** याने सहारा वाळवंटाचा पश्चिम भाग व्यापलेला आहे. तसेच मारिटानिया - माली सिमेपर्यंत विस्तारलेला आहे. यामधून नायजर नदी वाहते.
4. **कांगो (जैर) सखल प्रदेश:** हा भाग एक रचनात्मक भूस्वरूप झाला असून तो मैदानी प्रदेशाने वेढलेला आहे. यातून कांगो आणि तिच्या उपनद्या वाहतात. हा एक अरण्याचा प्रदेश आहे.
5. **कलहरी सखल मैदानी प्रदेश:** हा प्रदेश जास्त प्रमाणात वाळवंटी प्रदेश आणि स्टेपीजचा गवताळ कुरणांचा भाग आहे. हा मैदानी प्रदेशाने वेढलेला आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



सखल मैदानी प्रदेश

सरोवरे: आफ्रिका खंडाची आर्थिक प्रगती होण्यासाठी अनेक सरोवरे कारणीभूत आहेत. त्यामधील 8 सरोवर प्रमुख आहेत. पूर्व आफ्रिकेत भली मोठी आणि लांब अशी सरोवरे आहेत. ती सर्वसाधारणपणे दुभंगलेल्या दऱ्यांबरोबर संबंध प्रस्थापित झालेली आहेत. दुभंगलेल्या दऱ्यांच्या पश्चिमेला अलबर्ट, एडवर्ड, किवू, टांगानिक आणि न्यास सरोवरे आहेत. इतकेच नव्हे तर या दऱ्यांच्या पूर्वेला रुडाल्फ (टुर्कान) नट्रोन आणि इयासी सरोवरे आहेत.



किलीमांजारो पर्वत

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

टांगानिक सरोवर जगातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे खोल सरोवर आहे. हे सुमारे 1436 मीटर लांब आहे, दुभंगित दरीच्या दोन रांगाच्या मध्ये असलेले व्हिक्टोरिया सरोवर आफ्रिकेतील अत्यंत मोठे सरोवर आहे. ते सुमारे 69,481 चौ.कि. मीटर इतके विस्तारलेले आहे. येथूनच नाईल नदीचा उगम होतो.

पर्वत: आफ्रिका खंडात अनेक पर्वत आहेत. आफ्रिकेच्या सपाट मैदानांची मालिका खंडित करण्यासाठी कांही लहान लहान डोंगराच्या रांगा आहेत. त्यामध्ये ॲटलास रांगा, डेकन्सबर्ग पर्वत आणि किलीमांजारो पर्वत प्रमुख आहेत.

ॲटलास श्रेणी: आपल्या भारतातील हिमालय पर्वताप्रमाणे हे घडीचे पर्वत आहेत. हा दक्षिण युरोपमधील पर्वत श्रेणीचा पुढे विस्तारलेला भाग आहे. माऊंट टाब्काल हे सर्वात उंच शिखर आहे. ज्यामध्ये ॲटलास श्रेणी अल्जेरिया, मोराक्को आणि टुनेसियामध्ये पसरल्या आहेत.

डेकन्सबर्ग पर्वत: हे पर्वत आफ्रिकेच्या आग्नेय समुद्र किनाऱ्यापर्यंत पसरले आहेत. हे नावापुरतेच पर्वत असून त्या पठारी प्रदेशाच्या तिरकस कडा आहेत.

किलीमांजारो पर्वत: ही पर्वत श्रेणी आफ्रिकेच्या पूर्व भागात आहे. यामध्ये आफ्रिका खंडातील सर्वात उंच शिखर आहे. त्याची उंची 5,895 मीटर इतकी आहे. हे विषुववृत्ताच्या जवळ असले तरी त्याचे शिखर कायम बर्फाने आच्छादलेले असते. याला कारण त्याची उंची होय.

वर उल्लेख असलेले आहाग्गार, टिबेस्टी, रुवेंजोरी, केप श्रेणी आणि पूर्व आफ्रिका श्रेणी हे आफ्रिकेतील इतर पर्वत आहेत.

आफ्रिकेतील अत्यंत उंच शिखर किलीमांजारो आणि अत्यंत सखल प्रदेश असल सरोवर (जेबोटी) आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED


सुवेझ कालवा: दोन विशाल भूभागांना जोडणारा आणि दोन समुद्राना वेगळेकरणारा चिंचोळा भूभाग म्हणजेच 'कालवा' (भूकंठ). त्याच्यामध्ये सुवेझ कालवा प्रसिद्ध आहे.

सुवेझ कालवा हा भूमध्य समुद्र आणि तांबडा समुद्र यांच्या मधील लहान प्रदेश आहे. तो आफ्रिका आणि आशिया खंडाना वेगळे करतो. प्रस्तुत आफ्रिका खंडातील देशामधील इजिप्त देशाला या कालव्याचा भाग मिळालेला आहे. तो आफ्रिकेच्या ईशान्य भागात आहे. हा कालवा साधारणपणे मानवनिर्मित आहे. तो भूमध्य समुद्र आणि तांबडा समुद्र याना जोडतो. हा जगात जास्त जहाजे वाहतुक करणारा प्रमुख सागरी मार्ग असून युरोप आणि आशियाला कमी अंतराने जोडतो.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



सुवेझ कालवा



सुवेझ कालवा

3. जलसंपत्ती

आफ्रिकेतील नद्या : आफ्रिकेतील नद्याना स्वत:ची अशी, विविधता प्राप्त झाली आहे. बहुतेक नद्यांच्या दऱ्यांच्या पात्रात लांब असा खोल भाग तयार झाला आहे. त्यांच्या वेगवान प्रवाहामुळे (Rapids) धबधबे तयार झाले आहेत. पावसाळी ऋतूतच पाऊस पडत असल्यामुळे त्या नद्या या काळातच वाहतात.

या नद्या नौकानयनाला उपयुक्त नाहीत. सर्व काळात वाहणाऱ्या नद्या कमी आहेत. आतील भागात नद्या जास्त आहेत. आफ्रिका खंडात प्रमुख 4 नद्या आहेत. त्या म्हणजे नाईल, कांगो (जैरे), नैजर आणि जांबेजी नद्या होत. आफ्रिकेतील इतर महत्वाच्या नद्या म्हणजे सेनेगल, ऑरेंज आणि लिंपोपो या आहेत.


नाईल नदी: नाईल नदी ही जगातील अत्यंत लांब नदी असून ती 6,650 कि.मी. लांब वाहते. व्हिक्टोरिया सरोवरामध्ये नाईल नदीचा उगम झाला आहे. ती सहारा वाळवंटातून उत्तराभिमुख वाहत भुमध्य समुद्राला जाऊन मिळते. नाईल नदीकाठचा प्रदेश अत्यंत सुपीक आहे. हजारो लोकाना जगण्यासाठी सहाय्य झाले असून तेथील लोक त्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग करतात. अल-गजल नावाची डावीकडील उपनदी आणि सूबत निकी नाईल व अटबार या उजवीकडील काठाच्या उपनद्या आहेत.

निळ्या नाईल नदीचा उगम थाना सरोवरामध्ये (इथियोपिया) झाला आहे. आणि कार्टूम येथे पांढऱ्या नदीला सामावून घेते. नाईल नदीमुळे जगप्रसिद्ध अशी सुपीक भूमी निर्माण झाली आहे. या नदीवर बांधलेल्या धरणामधील 'अस्वान' धरण मोठे आहे.

कांगो नदी: कांगो किंवा जैर नदी आफ्रिकेतील दुसऱ्या क्रमांकाची लांब नदी आहे. आफ्रिकेतील लोक या नदीला विविध नावानी ओळखतात. या नदीच्या उगम स्थानामध्ये या नदीला 'लुआपुला' असे आणि उरलेल्या सगळीकडे 'लुआलाब' असे संबोधतात.

©MTBS NOT TO BE REPUBLISHED

कांगो नदी विषुववृत्ताजवळ उगम पावून प्रथम उत्तरेला त्यानंतर नैऋत्येला 4640 कि.मी. लांब वाहत जाऊन ॲटलांटिक महासागराला मिळते. ही आफ्रिकेच्या मध्यभागातील विषुववृत्त अरण्यातून वाहते. या नदीवर प्रसिद्ध लिविंगस्टन धबधबा निर्माण झाला आहे. परंतु नदीकाठी सुपीक भूमी नाही.



आफ्रिकेतील नद्या

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

नैजर नदी: आफ्रिकेतील तिसऱ्या क्रमाकांची लांब नदी आहे. ही नदी पश्चिम किनारपट्टीच्या उंच भागामध्ये उगम पावलेली आहे. ही सुद्धा अटलांटिक महासागराला जाऊन मिळते. ही वर्षभर भरून वाहणारी नदी नाही. या नदीची लांबी 4000 कि.मी. आहे.

जांबेजी नदी : ही आफ्रिकेतील चौथ्या क्रमांकाची प्रमुख नदी असून ही आफ्रिकेच्या दक्षिण भागातील महत्वाची नदी आहे. ही मध्यआफ्रिकेतील प्रदेशामध्ये उगम पावून आग्नेयेकडे वाहते व हिंदू महासागराला जाऊन मिळते. या नदीच्या पात्राच्या भरपूर जोराच्या प्रवाहामुळे धबधबे निर्माण झाले आहेत. यांच्यामध्ये विशिष्ट असा 'व्हिक्टोरिया धबधबा' आहे. या नदीचा प्रवाह काही ठिकाणी लांब अशा खोल भागातून वाहतो त्यामध्ये करीब कंदर प्रसिद्ध आहेत. या नदीची लांबी सुमारे 3500 कि. मी. इतकी आहे.



व्हिक्टोरिया धबधबा

सेनेगल नदी: ही नदी गिनीच्या घौटा जालोन पठारावर उगम पावते. तेथून वायव्येला 1640 कि.मी. वाहत जाऊन शेवटी ॲटलांटिक महासागराला जाऊन मिळते. मारिटानीया आणि सेनेगलच्या सीमेवरून वाहते.

4. हवामान, नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी संपत्ती

हवामान: अत्यंत लांब आणि रूंद असलेला आफ्रिका खंड उत्तर गोलार्ध आणि दक्षिण गोलार्धात पसरलेला आहे. म्हणून याला 'केंद्रीय भूखंड' असे म्हणतात. या खंडाच्या मध्यभागातून विषुववृत्त गेले असल्यामुळे सूर्याची किरणे लंबरुपाने पडतात. त्यामुळे या खंडामध्ये उष्ण कटिबंधातील हवामान आहे. सोबत आफ्रिकेच्या हवामानावर परिणाम करणारे इतर अनेक घटक आहेत. उदा. उंच पर्वत नसल्यामुळे, प्रवाह, पूर्व-पश्चिमेला अधिक विस्तार आणि रचना हे होय. सहाराच्या पश्चिम किनाऱ्यांच्या लांब पर्यंत वाहणारा (किनरी प्रवाह) आणि कलहरीचा पश्चिम किनारपट्टीला जुळवून घेत वाहणारा शीत समुद्र (बेंग्वल प्रवाह) किनारपट्टीच्या सखल मैदानी प्रदेशाना जुळवून घेत त्या भागातील तापमान कमी करते. हे दोन्ही शीत प्रवाह असल्यामुळे अधिक बाष्प आणत नाहीत. परंतु आग्नेय किनाऱ्याला मिळवून घेऊन वाहणारे मोसांबिक उष्ण सागरी प्रवाह अधिक बाष्प आणतात व अधिक पाऊस पाडतात.

उंच पर्वत नसल्यामुळे आणि विविध हवामानाच्या पट्ट्यांची कमतरता असल्यामुळे येथे उष्णकटिबंधातील हवेच्या मुक्त संचाराला वाव मिळतो. यामुळे हवामानातील बदल संथगतीने घडतात.

आफ्रिकेतील हवामानावर पावसाचा प्रभाव अधिक आहे. विषुववृत्ताजवळ पाऊस जास्त पडतो. या प्रदेशामध्ये वर्षात सरासरी 200 सें.मी. इतका पाऊस पडतो आणि विषुववृत्तापासून जसे दूरजावे तसे पावसाचे प्रमाण कमी कमी होत जाते. सहारा, कलहारी, आणि नामिबिया प्रदेशामध्ये पाऊस फक्त 15 सें. मी. इतकाच पडतो. तसेच कॅमरून हा आफ्रिकेतील अत्यंत ओलसर प्रदेश असून येथे वार्षिक सरासरी 1016 सें मी इतका पाऊस पडतो.

© KSEB NOT TO BE REPUBLISHED


हवामानाच्या परिस्थितीच्या आधारे आफ्रिका खंडाचे 8 स्वाभाविक विभाग पडतात ते खालील प्रमाणे.

1. विषुववृत्तीय उष्ण प्रदेश.
2. सॅव्हाना हवामानाचा प्रदेश.
3. उष्ण कटिबंधातील वाळवंटी प्रदेश.
4. भूमध्य समुद्राचा प्रदेश.
5. समशीतोष्ण कटिबंधातील गवताळ कुरणांचा प्रदेश.
6. उंचावरील हवामानाचा प्रदेश.
7. समशीतोष्ण कटिबंध हवामानाचा प्रदेश.
8. कोरडया हिवाळ्याचा समशीतोष्ण कटिबंध प्रदेश.

1. विषुववृत्तीय उष्ण प्रदेश: हा विषुववृत्ताच्या दोन्ही बाजूकडे पसरलेला सखल प्रदेश तसेच कांगो मैदानापासून गिनी प्रदेशापर्यंत विस्तारलेला आहे. येथील हवामान वर्षभर अतिउष्ण आणि पाऊस यानी युक्त आहे. येथे रोज दुपारच्या वेळी वळीव (downpour) पाऊस पडतो. तो सतत पडणारा पाऊस आहे अतीउष्ण व दमट या प्रकारचे हवामान हितकारक नसते.

2. सॅव्हाना हवामानाचा प्रदेश: या प्रदेशात सोमालिया, इथियोपिया, सुदान, चाड, आणि नैजर प्रांताचा समावेश झालेला आहे. या प्रकारचे हवामान सुदानमध्ये अधिक प्रमाणात दिसून येते. यामुळे याला 'सुदानचे नमुनेदार हवामान' म्हणून ओळखले जाते. येथे तापमान जास्त असते. येथे पाऊस सखल प्रदेशापेक्षा पूर्व भागातील उंच प्रदेशात कमी असून उन्हाळ्यात जास्त पाऊस पडतो.

© BSTB NOT TO BE REPUBLISHED



हवामानाचे प्रदेश

3. **उष्णकटिबंधातील वाळवंटी प्रदेश:** आफ्रिका खंडाच्या उत्तर आणि दक्षिण भागात वाळवंटे आहेत. या प्रदेशात उन्हाळयात अति उष्णता असते तर हिवाळ्यात अति थंडी असते. उन्हाळा आणि हिंवाळ्याच्या तुलनेत दिवसा आणि रात्रीच्या तपमानामध्ये मोठया प्रमाणात फरक असतो. पाऊस फार कमी असतो. आकाशात ढगांची रचना फार मनोहारी असते.

© KBS NOT TO BE REPUBLISHED

4. **मेडिटरेनियन हवामानाचा प्रदेश: (भूमध्य सागरी हवामान):** असे हवामान आफ्रिका खंडाच्या उत्तर किनारपट्टीचा प्रदेश आणि दक्षिणेकडील भागात आढळते. या प्रदेशात मोरोक्को, उत्तर अल्जेरिया आणि केप प्रांत यांचा सम वेश आहे. अतिउष्ण आणि कोरडा उन्हाळा व थंड आणि पाऊस पडणारा हिवाळा हे या हवामानाचे मुख्य लक्षण आहे असा एकच हवामानाचा प्रदेश आहे जेथे हिवाळ्यात पाऊस पडतो.

5. **समशीतोष्ण गवताळी कुरणांचा प्रदेश:** यालाच उच्च वेल्ड प्रदेश असे देखील म्हणतात. डच भाषेमध्ये वेल्ड (Veldts) म्हणजे 'क्षेत्र' असा अर्थ होतो. हे हवामान दक्षिण आफ्रिकेच्या अंतर्गत भागात आढळते. हा भाग समुद्र किनाऱ्यापासून दूर आहे. यामुळे हिवाळा आणि उन्हाळ्यातील तपमानात फार फरक असतो. उन्हाळ्यात तापमान जास्त आणि हिवाळ्यात थंडी असते. या दोन्ही काळामध्ये पावसाचे प्रमाण कमी असते.

6. **उंचावरील हवामानाचा प्रदेश:** यात इथियोपियाचा उंच भाग आणि पूर्व आफ्रिकेचा भाग समाविष्ट झाला आहे. समुद्र सपाटीपासून जास्त उंचीच्या प्रदेशात थंड हवामान असते. पावसाचे प्रमाण कमी असून फक्त उन्हाळ्यात अधिक पाऊस पडतो.


7. **समशीतोष्ण कटिबंध हवामानाचा प्रदेश:** हा प्रदेश ड्रेकन्सबर्ग पर्वताचा भाग व माडगास्कर द्वीप सामावून पूर्व किनाऱ्यापर्यंत विस्तारलेला आहे. येथील हवामानामध्ये उन्हाळ्यात अति उष्ण आणि पावसाळ्यात व हिवाळ्यात देखील थंड आणि कोरडे हवामान असते.

8. **कोरडया हिवाळ्याचा समशीतोष्ण कटिबंध :** हा प्रदेश आफ्रिकेच्या आग्नेय भागात सामावलेला आहे. अतिशय गरम आणि पाऊस पडणारा उन्हाळा, तसेच सौम्य व कोरडा हिवाळा ही या हवामानाची मुख्य लक्षणे आहेत. विषुववृत्त प्रदेशात तीव्र हवामानाच्या कटिबंधातील पावसाचे प्रमाण येथेही आढळून येते. परंतु उंची आणि दाट धुक्यामुळे तपमानामध्ये बदल होतो.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

नैसर्गिक वनस्पती

आफ्रिकेतील नैसर्गिक वनस्पतीमध्ये विविधता आहे कारण वनस्पती आणि प्राणी वर्गावर हवामान, माती, भौतिक परिस्थिती आणि मानवाचा संचार यांचा परस्परपूरक प्रभाव स्पष्टपणे आढळून येतो. या खंडाच्या जास्तीत जास्त भागामध्ये वनस्पतींचे स्वरूप मानवी कृत्याने बदलले आहे. बहुतेक अरण्ये आणि गवताळ कुरणे विविध उद्देशासाठी तोडलेली आणि पेटवली आहेत त्यामुळे आफ्रिका खंडातील प्रस्तुत वनस्पती वर्गामध्ये नैसर्गिकता नाही.



नैसर्गिक वनस्पती

© KBS NOT TO BE REPUBLISHED

विषुववृत्तातील अति उष्ण आणि बाष्पयुक्त हवामान हे तेथे घनदाट अरण्ये तयार होण्यास उपयुक्त झाले आहे. या प्रदेशात झाडे उंच उंच वाढतात. विषुववृत्तीय प्रदेशात सदाहरित अरण्ये असण्याचे मुख्य कारण म्हणजे तेथील झाडाना असणारी रुंद पाने आणि मोठमोठ्या वनस्पती होय.

विशेष लक्षणे असणारी झाडे येथे फार विरळ आहेत. तरीसुद्धा उष्ण कटिबंधातील मौल्यवान टणक (हार्डवूड) प्रकारची झाडे, रबर, बीटे, एबोनी, शिसम, नारळ, ताड करिमर इ झाडे वाढतात. मँग्रोव वनस्पती सुद्धा समुद्राच्या दलदलीच्या प्रदेशात वाढते.



बेअबॉब वृक्ष

विषुववृत्तावरील सदाहरित अरण्याच्या उत्तर आणि दक्षिण भागात (Baobab) बाभूळ आणि बेअबॉव वृक्षांची अरण्ये आहेत. कमी पाऊस असलेल्या अरण्य प्रदेशात काटेरी वनस्पती व गवताळी प्रदेश आहेत. काटेरी वनस्पती आणि पाईन, जेनिफर कार्क, सिडार, फीग व ऑलीव अशा प्रकारची झाडे विषुववृतीय हवामानाच्या प्रदेशात आढळतात.

पठारी प्रदेशाच्या उंचावरील भागात पर्वतीय वनस्पती आणि - सहारा तसेच कलहारी भागात वाळवंटीय वनस्पती आहेत. दक्षिण आफ्रिकेच्या कैरो भागात प्रसिद्ध खुरटया वनस्पती, नाईल नदीच्या खोऱ्यात सड नावाची विशेष वनस्पती आढळते.

प्राणी संपत्ती

आफ्रिकेतील वन्य प्राण्यामध्ये खूप विविधता आहे. तेथील हवामानाची परिस्थिती, भूलक्षणे, अरण्य, मातीचा प्रकार आणि आशिया तसेच युरोप खंडाच्या संपर्काचा यावर प्रभाव पडला आहे. भरपूर पाऊस असलेल्या अरण्य प्रदेशात बहुतेक प्राणी विशाल देहाचे आहेत. चिंपाझी, विविध प्रकारची माकडे, गोरीला, रानगायी, चिते आणि इतर खूर असलेले प्राणी येथे आढळतात.

सूसर आणि पाणहत्ती हे प्राणी नद्या आणि पाणतळ दलदलीच्या प्रदेशात आढळतात. आकर्षक विविध रंगाचे पक्षी येथे सर्वत्र आढळतात. उदाहरणार्थ : शहामृग, गरुड, बगळा इत्यादी.



प्रमुख वन्यप्राणी

झेब्रा, रानमांजर, जिराफ, गेंडा, हरीण, हत्ती, इंम्पाला, चित्ता आणि आफ्रिकन सिंह हे प्राणी उष्ण प्रदेशातील गवताळ आणि सॅव्हाना प्रदेशात आढळतात.

वाळवंटी प्रदेशात विंचू, उंट, पाल, वाळवंटीय कोल्हा, विविध प्रकारचे कीटक येथे आढळतात. त्याचप्रमाणे हरिणाच्या जातीतील सुंदर प्राणी, गाढव, घोडा व अड्डाक्ष (addax) इत्यादी प्राणी आढळतात. उंट हा फार महत्वाचा आणि सर्वाना परिचित वाळवंटी प्राणी आहे. याला वाळवंटातील जहाज असे म्हणतात.





इंम्पाला व अड्डवाक्ष

@KTE NOT TO BE REPUBL

शहामृग



हा आफ्रिकेतील मूळपक्षी असून तो कलहारी वाळवंट व आफ्रिकेच्या दक्षिणेकडील मैदानी प्रदेशात आढळतो. हा जगातील सर्वात मोठा पक्षी होय. याचे अंडे सर्वात मोठे असते. तो उडू शकत नाही. पण अत्यंत वेगाने पळू शकतो. तसेच हा पक्षी पायाना दोन बोटे असणारा जगातील एकमेव पक्षी आहे.

5. शेती आणि उद्योगधंदे

अनेक आफ्रिकन देशामध्ये, शेती हाच प्रमुख उद्योग आहे. सुमारे 75 टक्के लोक शेती करतात.

बहुतेक आफ्रिकन देशामध्ये विषुववृत्तीय प्रदेश वगळता शेती हाच जीवनाचा आधार आहे. आधुनिक रासायनिक खते आणि किटकनाशकांचा वापर फारच कमी आहे. बहुतेक भागात मशागतसुद्धा माणसेच करतात. प्रति हेक्टरी उत्पादनही खूपच कमी आहे.

बहुतेक शेती प्रदेशात आहारधान्याची लागवड हिच महत्वाची मानाली जाते. भात, मका, रताळे, शेंगदाणे, वाटाणा आणि पिष्टमय पदार्थाची पिके पिकवितात. विषुवृत्तीय प्रदेशात जास्तीतजास्त शेती हा व्यवसाय केला जातो. बुरुंडी प्रदेशात निर्यातीसाठी कॉफी पिकवितात, कोर्टे-डी-वोरे आणि घाना मध्ये कोको हे पिक पिकवितात. ग्याभिया देशात वाटाण्यासारखी कडधान्ये पिकवितात.

आफ्रिकेत पिकणारी इतर पिके म्हणजे ऊस, केळी, चहा तेलवर्गीय पिके आणि लिंबूच्या जातीतील फळे. हे सर्व मोठ्या बागामधून आणि पाण्याच्या प्रदेशात पिकवतात.

सेनेगल, मारिटानिया, माली, नैजर, चाड, उत्तर सुदान, ईथियोपिया व सोमालिया देशाना वरचेवर दुष्काळाचा सामना करावा लागतो. तेथील लोक भूकेने व्याकूळ झालेले असतात. आफ्रिका विविध जातीच्या फळांसाठी प्रसिद्ध आहे विषुववृत्तीय प्रदेशात लिंबूंच्या जातीच्या फळांची लागवड करतात. ऑलीव, लिंबू, संत्रे, द्राक्षे इ. पिके पिकवतात. पूर्व आफ्रिकेत मोसंबी पिकवितात. जांजीबार बेट आणि टांझानिया लवंग पिकासाठी प्रसिद्ध आहे.

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

येथे मका हे महत्वाचे पिक आहे. काही प्रदेशात भात व ऊस पिकवितात. फळांच्या पिकापैकी कॉफी, ताड, कोको, मध्यपूर्व आणि आफ्रिकेच्या इतर भागात पिकवितात. इथियोपियामध्ये कॉफीचे पिक हजारो वर्षापासून घेतले जाते. इजिप्त देशात कापूस पिकवितात.

युरोप जवळील केनिया, दक्षिण आफ्रिका आणि झिंबाब्वेमध्ये गायीपालन (संगोपन) हा मुख्य उद्योग आहे. जगातील 15% पशुधन आफ्रिका खंडात आहे.

शेती व्यवसाय मागासलेपणाची कारणे: आफ्रिकेतील शेती मागासण्याची अनेक कारणे आहेत. शेती करण्याची जुनी पद्धत, जीवनावश्यक शेती पद्धत, जुन्या कृषी अवजारांचा वापर, निरक्षरता, जुन्या चालीरीती, अपुरे भांडवल व परदेशी गुंतवणुकीचा अभाव ही कारणे आहेत.

उद्योगधंद्याच्या मंद विकासाची कारणे

- आफ्रिकेतील अनेक देश पाणी, अरण्य आणि खनिजाने समृद्ध आहेत. या नैसर्गिक संपत्तीची विभागणी समान नाही. येथील बऱ्याच देशानी शेतीचा अधिक अवलंब केला आहे.
- मागील अनेक शतकापासून आफ्रिकेतील नैसर्गिक साधनसंपती युरोपीयनांनी लुटून नेली. हेच येथील उद्योगधंदे मंद विकासाचे कारण होय. त्याचप्रमाणे उद्योगधंद्यासाठी आवश्यक सोयी सवलतीची कम तरता, कमी भांडवल, तंत्रज्ञानाचा व कुशल कामगारांची कमतरता, कमी उत्पादन तसेच राजकीय अस्थिरता यामुळे आफ्रिका देशात उद्योगधंद्यांची प्रगती दिसून येत नाही.
- अलिकडच्या काळात झिंबाब्वे, नायजेरिया, इजिप्त, अल्जेरिया आणि

@MTBS NOT TO BE REPUBLISHED

दक्षिण आफ्रिका या देशानी उद्योग धंद्याना चालना दिली आहे. स्वातंत्र्यानंतर आफ्रिकेतील अनेक देशानी लघू उद्योगाच्या प्रगतीला प्रोत्साहन दिले. वस्त्रोद्योग, औषधे आहार संस्करण व पेय उत्पादन उद्योगांना चालना दिली आहे.

- मोठया उद्योगामध्ये लोखंड आणि पोलाद, रबर, सिमेंट आणि पेट्रोलियम तयार करणे यासारखे उद्योग दक्षिण आफ्रिकेत केंद्रीकृत झाले. अल्जिरिया, ट्यूनिसिया, इजिप्त आणि झिंबाब्वे या देशात पोलाद उद्योग प्रगतीपथावर आहे. आफ्रिकेमधील इतर प्रमुख उद्योगधंदे म्हणजे विद्युत उपकरणे तयार करणे, वाहतुकीची साधने, ट्रॅक्टर तयार करणे आणि युद्धविमाने तयार करणे हे होते.

6. मौल्यवान खनिजे

हिरे आणि सोने

आफ्रिका खंड अपार खनिज संपत्तीने समृद्ध आहे. त्यापैकी मौल्यवान खनिजे म्हणजे हिरे, सोने आणि प्लॅटीनम यांचे जास्त प्रमाणात उत्पादन केले जाते.

हिरे: जगातील एकूण उत्पादनाच्या 80% हिरे आफ्रिका खंडात उत्पादित केले जातात. बोत्स्वाना जैर आणि दक्षिण आफ्रिका येथे हिऱ्याचे उत्पादन मोठया प्रमाणात केले जाते. इतर उत्पादकांमध्ये अंगोला, नामिबिया व घाना हे हिऱ्यांचे उत्पादन करणारे प्रमुख देश आहेत. हिऱ्याचे नैसर्गिक आणि औद्योगिक (उद्योगधंद्यात तयार केलेला हिरा) असे वर्गिकरण केले जाते. औद्योगिक हिरा मुख्यतः ग्लेझिंग पेपर आणि ग्लास कटिंग यासारखी उपकरणे तयार करण्यासाठी वापरला जातो.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



प्रमुख खनिजे

सोने: जगातील निम्मे सोन्याचेसाठे एकट्या दक्षिण आफ्रिकेत आहेत. वीटवाटर्सलँड (ट्रान्सवाल) आणि अरेंज फ्री स्टेट या राज्यात सोन्याच्या खाणी आहेत. या खंडातील एकूण सोन्याच्या उत्पादनापैकी 50% पेक्षा जास्त सोने यांचा पुरवठा दक्षिण आफ्रिका, झिंबाब्वे आणि कांगो (झायर) या गणराज्यातून केला जातो.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

7. लोकसंख्या

वाढ, विभागणी आणि घनता


जगातील आफ्रिका खंडात सर्वप्रथम मनुष्य दिसून आला आणि तेथेच तो उपकरणांचा वापर करण्यास शिकला असे समजले जाते. मानवशास्त्रज्ञांच्या व वैज्ञानिकांच्या मते होमोसेपियन हे आफ्रिका खंडातील केनिया आणि इथियोपिया मधील पूर्व सरोवराच्या जवळ आढळल्याचे समजते.

प्रामुख्याने निग्रो आणि त्यांचे मूळनिवासी गटागटाने राहत. आता आफ्रिकेत अनेक जाती आणि वर्ग आहेत. या खंडात वेगवेगळ्या लोकांचे भाषांचे आणि संस्कृतीचे मिलन झाले आहे.

सुमारे 1051 मिलियन लोक आफ्रिका खंडात राहतात. नायजेरिया, इजिप्त, इथियोपिया, जैरे आणि दक्षिण आफ्रिकेत लोकांची घनता जास्त आहे. गेल्या तीन दशकात आफ्रिकेतील काही राष्ट्रातून मरण प्रमाण कमी झाले आहे. त्याचे कारण म्हणजे आहाराचे जास्त उत्पादन, औषधांचा पुरवठा आणि स्वच्छता, राखण्यामध्ये झालेली सुधारणा होय. जन्मप्रमाण जास्त झाल्यामुळे लोकसंख्या घनता वाढली आहे. जगाशी तुलना केल्यास आफ्रिकेचे जननप्रमाण सरासरी प्रमाणापेक्षा जास्त आहे, सोमालिया, इथियोपिया, चाड, नायजेरिया माली या देशात माणसांची आयुरमर्यादा फार कमी म्हणजेच 50 वर्ष आहे.

विशेष बाब म्हणजे लोकसंखेच्या विभागणीमध्ये विसंगती दिसून येते. लोकसंख्येची विभागणी असमान झालेली आहे. आफ्रिकेच्या खाणींच्या प्रदेशात, नाईल नदीच्या खोऱ्यात, पूर्व आफ्रिकेचा उत्तर प्रदेश, मादागास्कर आणि उत्तरेकडील किनारपट्टी दक्षिण आफ्रिका, जिंबाब्वे आणि जैरे येथील शहरे व गिनिप्रदेशात लोकसंख्या दाट आहे. गिनीची किनारपट्टी या ठिकाणी लोकसंख्या दाट आहे.

© TBS NOT TO BE REPUBLISHED



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

लोकसंख्येची विभागणी

वाळवंटी प्रदेश, पर्वतमय प्रदेश आणि विषुववृतीय अभयारण्यात विरळ लोकसंख्या दिसून येते. लिबियाच्या सहारा आणि अल्जेरियामध्ये लोकसंख्येची घनता कमी आहे. येथील लोकसंख्येची घनता 15 लोक प्रती चौरस कि.मी. इतकी आहे.

आफ्रिकेच्या लोकांची चार गटात विभागणी करू शकतो:

1. पिग्मी, बुशमेन आणि मसायी. हे सहारा वाळवंटाच्या दक्षिण भागात राहतात.
2. अरब लोक हे उत्तर आफ्रिकेत राहतात
3. इंडियन हे दक्षिण आणि पूर्व आफ्रिकेत राहतात.
4. युरोपियन दक्षिण आफ्रिका आणि इतर सुपीक नद्यांच्या खोऱ्यात राहतात.

नवीन शब्द:

द्वीपकल्प, खाडी, वाळवंट, खाण, सरोवर, जीवनकाळ, लोकसंख्येची घनता, मुख्य रेखांश, कालवा, मकरवृत्त, यज्ञ

हे तुला माहित असू दे

- ❖ नाईल नदीचा बहुतेक भाग सहारा वाळवंटातून जातो पण ती सुकून जात नाही कारण नदीच्या खोऱ्यात भरपूर पाऊस पडतो.
- ❖ सहारा वाळवंटाने आफ्रिकेचा उत्तर भाग व्यापला असून ते जगातील सर्वात मोठे वाळवंट आहे.
- ❖ लिबियाच्या इल अजीजीयामध्ये जगातील जास्तीत जास्त तापमान 500 सेल्सियस नोंद झाली आहे.
- ❖ अड्डाक्ष नावाचा प्राणी हा उंच वर्तुळाकार शिंगे असणारे हरिण आहे. तो पाणी पीत नाही. त्याऐवजी आपल्याला आवश्यक पाणी हे तो खात असलेल्या गवत आणि वनस्पतीपासून मिळवतो.
- ❖ आफ्रिकेत बेयोबॉब नावाचा वृक्ष आहे. त्याचा आकार बाटलीसारखा असून त्याच्या खोडात पाणी भरलेले असते. ते 1000 ते 12000 लिटर इतके असते.

© KTDS NOT TO BE REPUBLISHED

काही प्रवासी या पाण्याचा वापर करतात.

- ❖ जगातील शेकडा 24% भाग कॉफीचे उत्पादन आफ्रिकेत होते
- ❖ जगात 50 % पेक्षा जास्त कोको आफ्रिकेत उत्पादित करतात.
- ❖ पीग्मी लोक जगात कमी उंचीचे (ठेंगू) असतात. ते कांगोच्या खोऱ्यात राहतात.
- ❖ आफ्रिका खंडातील लोक शक्तीशाली असतात परंतू सरासरी वयोमान कमी असते.
- ❖ आफ्रिका खंडात 800 पेक्षा जास्त भाषा बोलल्या जातात.
- ❖ आफ्रिकेत ग्रामीण लोकसंख्या जास्त आहे. येथील नगर वस्ती कमी आहे.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. आफ्रिकेला _____ खंड असे म्हणतात.
2. आफ्रिकेतील सर्वात लांब नदी _____.
3. आफ्रिकेतील अती उंच शिखर _____.
4. आफ्रिकेचा मोठा पक्षी _____.
5. सॅव्हाना हवामानाच्या प्रदेशाला _____ नमुनेदार हवामान म्हणून ओळखतात

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

6. आफ्रिकेला केंद्रीय खंड असे का म्हणतात?
7. कालवा म्हणजे काय? आफिकेतील महत्वाचा कालवा कोणता?
8. आफ्रिकेतील सखल मैदानी प्रदेशाची नावे सांग?

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

9. आफ्रिकेतील सर्वात उंच पर्वत शिखर कोणते?

10. आफ्रिकेतील विविध वनस्पतींची नावे सांगा?

11. आफ्रिकेतील प्रमुख आहार धान्य पिके कोणती?

7. आफ्रिकेतील कोणते देश हिऱ्यांचे उत्पादन करतात?



उपक्रम:

- आफ्रिका खंडातील प्रमुख सरोवरे नकाशात दाखवा
- आफ्रिकेचे प्रमुख पर्वत व नद्या नकाशात दाखवा
- कर्नाटकातील बेअबॉब वृक्षांच्या चित्रांचा संग्रह करा.
- आफ्रिकेतील अड्डाक्ष आणि आपल्या भारतातील हरिण यांची तुलना करून लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED